# माणूस

शनिवार १ जून ७४ । एक रुपया

हे सर्व पाहिले की वाटते, आम्ही, शिवाजी राजांच्या वारसांनी, त्यांची जेवढी बदनामी केली आहे तेवढी त्यांच्या तत्कालिन शत्रूंनीही केली नसावी....

—पेंढारकर



# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १ जून | अंक : पहिला |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


# अणुशक्तीचा योग्य वेळी दाखला

नरुभाऊ लिमये

साप्ताहिक माणूस तर्फे भारताच्या अणुस्फोटाचे स्वागत होईल अशा कल्पनेने २५ चा अंक उघडला तो श्री. प्रभाकर पाध्ये यांचे 'चिंतन' वाचावयास मिळाले ! त्यांनी सुरुवात चांगली केली. भारतीय राष्ट्रवाद्याला अभिमान वाटेल हे नमूद केले आणि शेवटी पंडितजींनी अणुस्फोटाला सतत विरोध केला होता, तो त्यांचा संकेत त्यांच्या कन्येने मोडला असे म्हणून पंडितजींचा (अणु विरोधी) संकेत आपल्या राष्ट्रीय शक्तीशी सुसंगत होता. असे सर्टिफिकेट देऊन टाकले श्री. प्रभाकर पाध्ये हे अमेरिकावादी आहेत असा समज आहे. अशा थोर विचारवंताचे नेमके आकलन इतरांना होत नाही म्हणून अशी लेबले चिकटविली जातात. त्यांनी फारसा राग मानू नये पण या अणुस्फोटाचा सर्वात जास्त राग अमेरिकेला आला आहे हे लक्षात आले म्हणजे पाध्ये साहेबांच्या वितंडवादी चिंतनाचा अन्वयार्थ कळण्यास मदत होईल.

पंडितजींनी अण्वस्त्र प्रसाराला कडवा विरोध केला तेव्हा त्यांना जागतिक शांततेचा वेध लागला होता यात शंका नाही. पण त्या शांततेची व्यवहारी बाजू अशी होती की 'शीतयुद्धाच्या' भयानक वावटळीत सापडलेले केनेडी, ख्रुश्चेव्हचे युग केव्हा पुन्हा गरम युद्धाची आग ओकू लागेल आणि अॅटम बॉंब हाती असलेली ती राष्ट्रे केव्हा निम्मे-पाऊण जग जाळून टाकतील याचा नियम राहिला नव्हता. अशा वेळी नव्याने स्वतंत्र झालेल्या भारतासारख्या आफ्रो-एशियाई देशाच्या आर्थिक विकासाला 'जागतिक शांतता' ही एक प्रथमावश्यक गोष्ट होती. तसेच मानवजातीचे रक्षण हा त्या नेत्यांसमोर हेतू होता केनेडी म्हणाले की, "त्या महाभयानक अस्त्रांनी सर्वांचा संहार होण्यापूर्वी त्या अस्त्रांचा नाश केला पाहिजे."

पण ते घडले नाही. उलट फ्रान्स व चीन यांनी आपल्या हाती ते अस्त्र सिद्ध केले. अमेरिकेने फ्रान्सवर खूप दबाव आणला. आमची छत्री युरोपचे रक्षण करील म्हणून सांगितले. इंग्लंडतर्फे प्रयत्न केले. द गॉलचे उत्तर स्पष्ट होते, 'शेवटचा (फ्रेंच) शिपाई मेल्यावर तुम्ही अण्वस्त्र वापरणार—ते वापरले काय आणि न वापरले काय!' म्हणून फ्रान्सला स्वतःचा डिटरंट हवा. साऱ्या जगाला तोंड देत फ्रान्सने गेल्या वर्षी पुन्हा चाचणी प्रयोग 'खुल्या' वातावरणात केले. चीन तर सर्वार्थाने मुक्त-नंगाच आहे.

भारत हे राष्ट्र बांगला देश स्वातंत्र्यानंतर आफ्रिकेपासून आग्नेय आशियापर्यंतचे मोठे राष्ट्र आहे. जगाने ते मान्य केले आहे. मोठेपणाबरोबर काही जबाबदाऱ्या येतात. पाकिस्तानचा पराभव टळावा म्हणून आपले सातवे आरमार डाक्याकडे पाठविणारे निक्सन सरकार आणि शांत हिंदी महासागरात 'किटी–हॉक' विमानवाहू युद्धनौका पाठवून गार्शिया बेटात सुसज्ज तळ उभा करू पहाणारी अमेरिका ही 'छत्री' आपल्याला उपयोगी ठरेल का? उद्याचे भविष्यात लढा होणार तो चीन आणि सो. रशिया अशी विचित्र अवस्था निर्माण झालेली आहे. गेल्या वीस वर्षांत सो. रशियाने भारताला मदत केली. चीनला ती खुपते, खुपणार आहे. म्हणूनच भुट्टोंचे प्रचंड स्वागत पिकिंगमध्ये होते. चीनने लाओसपासून व्हिएतनामपर्यंत प्रभुत्वाचा पिवळा रंग फासला आहे ब्रम्हदेशाच्या ईशान्य टेकड्यात 'मुक्तीसेना' उभी आहे. काश्मीरचा स्वयंनिर्णयाचा हक्क चिनी नेते पुन्हा पुन्हा उच्चरवाने सांगत आहेत. अशा चीन जवळ अण्वस्त्र आहे. तो वापरण्याची त्यांना गरज वाटली की त्याचा वापर करण्याची निष्ठुरताही माओजवळ आहे.

अशा स्थितीत पंडितजींच्या शांततावादाचा आदर करूनही फ्रान्सप्रमाणे भारताजवळ स्वतःचे नारायण अस्त्र हवे होते. आमची ती गरज होती. तिचा वापर शांतता विकासासाठीच करू हे वचन सत्य आहे, व्यवहारी आहे. फ्रान्स व चीन ते वचन देतात आणि जग ते मानते तर भारतचे वचन इतरांनी ग्राह्य का मानू नये ?

राहता राहिला आर्थिक दुरवस्थेचा प्रश्न. कोठेसे प्रसिद्ध झाले की हा स्फोट एकशेसाठ कोटी रुपयांच्या तयारीचा स्फोट होता. असेल. पन्नासकोटी लोकांच्या जीवनाचा प्रश्न उभा राहिल्यावर दीडशेकोटी, गरीब अन्नानदशा झालेल्या तिजोरीतूनही खर्च करावे लागतील. इलाज नाही.

या स्फोटाला विरोध करणाऱ्या काही परदेशी मान्यवरांनी भारताला दोष देतानाच अमेरिका व रशिया या दोन वड्यांना दोषी ठरविले आहे. जगातून अण्वस्त्रे नामशेष करण्याचे पंडितजींचे प्रयत्न ज्यांनी धुडकावून लावले, त्यांनी पंडितजींची आठवण होऊन भारताला संयमाचे डोस पाजावे हे बरोबर नाही. बडीराष्ट्रे हे बदल लक्षात न घेतील तर उद्या इस्रायल, पश्चिम जर्मनी आणि जपानलाही हे ज्ञान मिळवावे लागेल. नव्हे त्यांचे जवळ आहेच ते जगाला दाखवावे लागेल.

अशा तयारीसाठी लागणारी आर्थिक शिस्त, चैनबाजीला आवर, भ्रष्टाचाराला पायबंद वगैरे सर्व काही करावे लागते. ते आजचे राज्यकर्ते न करतील तर आल्या मार्गाने बाहेर जातील. पण रशिया, चीन व अमेरिकेच्या राजनैतिक हालचाली जोवर शांतते ऐवजी स्पर्धेच्या आणि जगाच्या वाटणीच्या मार्गाने होत आहेत तोवर भारताला स्वसंरक्षणासाठी ही शक्ती हवी होती यात शंका नाही. □

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० । दूरध्वनी ५७३५९

# सप्रेम नमस्कार....

□ आपण दर्डांशी सामना देण्यास निर्भयपणे तयार झालात त्याबद्दल आपले खूप खूप अभिनंदन! आपला विजय निश्चित आहे.

जीवनात काही किमान मूल्यावर वाटचाल करावयाची असते. भ्रष्टाचार व दांभिकपणा यांच्यावर प्रखर प्रहार करून या देशात लोकशाही वाचवावयाची हे आपले ध्येय! या दृष्टीने 'माणूस' गेली अनेक वर्षे मदांध सत्ताधाऱ्यांशी निर्भयपणे लढत देत आहे. दर्डाजी श्री. नाईक साहेबांचे प्राणप्रिय दोस्त असल्याने आपल्या या लढाईला तर अधिकच महत्व आहे.

लोकशाहीच्या चौकटीतील कायद्याच्या अपूर्णत्वामुळे कायद्यात बऱ्याच पळवाटा राहतात. हेतूला प्राधान्य दिले जात नाही व किचकट कायद्यामुळे बारिक गोष्टीला महत्व दिले जाते. त्यामुळे व तसेच राज्यकर्त्यांचे छत्र असल्याने निकाल काहीही लागला तरी आपण पर्वा करणार नाहीच. भ्रष्टाचार विरूद्धच्या लढाईला तोंड फुटले ही घटना अत्यंत महत्वाची आहे. 'या लढाईत आपणास जखमा झाल्या तर आम्ही फुंकर घालू' असे म्हणत बसणाऱ्यांपैकी आम्ही नाही आपण म्हणाल तर या लढाईचे वार आम्ही आमच्या अंगावर घेण्यास आनंदाने तयार आहोत. आमच्या बलिदानाने लोकशाहीचा पाया पक्का झाला तर आमचे जीवन सार्थकी लागले असेच आम्ही मानू.

वेळ पडल्यास आम्हाला हाक देण्यास विसरू नका. 'माणूस'चा आवाज अव्याहत गरजला पाहिजे भ्रष्टाचाराविरुद्ध घोंघावत त्याने या नरभक्षक राज्यकर्त्यांना पिसाळून सोडले पाहिजे. भ्रष्टाचार 'माणूस'च्या आवाजापुढे कोलमडून पडला पाहिजे. तरुणांच्या आशा आकांक्षांची होळी न होता त्यांचे भवितव्य उजळून निघण्यासाठी या देशात प्रामाणिक व स्वच्छ राज्यकर्त्यांची लोकशाही, जातीयवादापासून दूर असलेली लोकशाही निर्माण व्हायला हवी. तेव्हा या महायुद्धात, मानवतेच्या धर्मयुद्धात कितीजणांना बलिदान करावे लागेल हे गौण आहे.

'तुम्ही श्रीमंतांच्या घरी खाता पिता तेव्हा तुम्हाला इतरांच्या (आमच्या?) भ्रष्टाचाराविषयी बोलण्याचा अधिकार नाही.' अशी पातळीहीन टीका जेव्हा श्रीमती इंदिरा गांधी भुवनेश्वरला श्री. जयप्रकाश नारायण यांचेवर करतात तेव्हा तर अशा लढाईची गरज तीव्रतेने जाणवते.

श्री. जयप्रकाशजींचे ह्यास उत्तर होते, 'अशा प्रकारच्या टीकेस मी पूर्वी अन्यत्र सविस्तर उत्तर दिलेच आहे व माझी आयुष्यातील आर्थिक मिळकतही जाहीर केली आहे. तेव्हा मी या वादात पुन्हा पडू इच्छित नाही. मी पंतप्रधानांना एवढेच सांगतो की आपल्या जीवनाच्या प्रत्येक दिवसाचे चोवीसच्या चोवीस तास सार्वजनिक कार्यासाठी देऊन ज्या कार्यकर्त्याने सार्वजनिक कार्यातच आपले संपूर्ण आयुष्य झिजविले आहे त्याने समाजाकडून आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी जेवणाचीही अपेक्षा करू नये काय? मग त्याने जिवंत रहाण्यासाठी अन्नासाठी कोठून पैसे आणावेत? आणि माझे हे वागणे पाप ठरत असेल तर महात्मा गांधीनीही, असेच वागून आयुष्यभर पापच केले असे म्हणावे लागेल. तेव्हा, काळाबाजारवाले व साठेबाजाकडून कोट्यावधी रुपयांचा निवडणूक निधी उभा करणाऱ्यांनी मला नीतीचे धडे शिकविण्याच्या फंदात पडू नये.

स्वातंत्र्या नंतरच्या सार्वजनिक जीवनात जयप्रकाश नारायण एवढे एकच स्वच्छ कार्यकर्ते भारतात उरले आहेत तेव्हा त्यांचेवरही ही हीन पातळीची टीका करून त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करून आपण भारतीय संस्कृतीची नीतिमूल्येच पायदळी तुडवीत आहात असा इशारा श्री. गोविंद तळवलकर यांनी महाराष्ट्र टाईम्सच्या आपल्या एका अग्रलेखात ब्लिट्झचे संपादक श्री. करंजिया यांना दिला होता याची येथे तीव्रतेने आठवण होते.

तुमच्यासाठी मी विधानसभेत किती प्रश्नांना तोंड देत बसू? तुम्ही मराठा विरुद्ध न्यायालयात फिर्याद दाखल करा म्हणजे ही बाब न्यायप्रविष्ट आहे असे म्हणून मला वेळ निभावून नेता येईल. असा सल्ला माजी उपमंत्री श्री. व्यंकटराव हिरे यांना वरिष्ठांकडून दिला गेला होता असे खात्रीलायकरीत्या समजते याही घटनेची आज आठवण होते. जनसमूहाची स्मरणशक्ती कमी असते. या तत्त्वानुसार श्री हिरे यांनी 'मराठा' विरुद्धची फिर्याद काही महिन्यानंतर हळूच काढून घेतली. प्रकरण न्यायप्रविष्ट म्हटल्यावर त्यावर सार्वजनिक चर्चा होत नाही व तो विषय सोईस्कररीत्या हळूच जनतेच्या नजरेआड नेता येतो. येथेही असेच डावपेच खेळले जाण्याची शक्यता आहे. परंतु सत्तेने मदांध झालेल्या भ्रष्टाचारी राज्यकर्त्यांच्या विरुद्ध हा लढा आहे. तेव्हा हा लढा तेवत ठेवण्यासाठी आपल्याला गनिमी काव्याचा उपयोग करावा लागेल. यासाठी श्री. दर्डाजी यांचे विरुद्ध त्यांनी केलेल्या शिक्षण संस्थेतील कारस्थानाविरुद्ध रान पेटविण्यासाठी पुण्या-मुंबईच्या तरुण संघटनांनी व विद्यार्थी नेत्यांनी आता आपणास साथ द्यायला हवी. आम्ही त्यांच्या बरोबर असूच.

लोकशाहीतील नेत्यांनी कार्यक्रमाकरिता कोणती नीतीमूल्ये जोपासली पाहिजेत याचा न्यायदेवता साकल्याने विचार करील व प्रसंगी ही न्यायदेवता कायद्याच्या केवळ उणेपणामुळे कुणालाही भ्रष्टाचार करण्यास वाव मिळू देणार नाही असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. कारण लोकशाही प्रणीत समाजवादी तत्त्वे राबविण्यासाठी वेळ पडल्यास कायद्याच्या अडचणी झुगारून न्यायमूर्तींनी जनतेस न्याय द्यावा यासाठीच तर पंत प्रधानांनी ज्येष्ठतेचा मुद्दा गौण ठरवून काही न्यायमूर्तींना डावलले व समाजवादी व पुरोगामी विचारसरणीचे श्री. रे यांना सुप्रीम कोर्टाचे सर्वोच्च न्यायाधिश केले.

काहीही असो, सहा महिन्यापूर्वीच्या फक्त एकाच लेखाबद्दल 'माणूस'ला नोटीस दिलीत व त्या नंतरच्या दोन लेखांकडे सोयिस्कररीत्या दुर्लक्ष केले. यामुळे जनतेच्या कोर्टात तुम्ही आताच दोषी ठरला आहात व यामुळे माझे नाक कापले गेले आहे असे

एव्हाना नाईकसाहेबानी आपल्या जिवलगास खाजगी बैठकीत नक्कीच सुनावले असेल.

'माणूस'चा विजय होवो।

८ एप्रिल, ७४ — चेतक

## निःस्पृह समिती नेमावी

¤ माणूसच्या अंकामधून आपण जवाहरलाल दर्डा याचे आव्हान स्वीकारले आहे आपण त्याना कोर्टात जरूर जा असे सागितले. यादव यांनी आपणावर खटला भरला त्याबाबत काय करावे असे जनतेचे मतही विचारले आहे.

माझ्यामते वृत्तपत्राकडे ज्या वेळेस एखादा मनुष्य येतो तेव्हा तो त्या सस्थेत दुखवला गेलेला असतो व तो व्यवहाराची एकच बाजू माडतो. दुसरी बाजू समजली तर काही व्यवहाराचा खुलासा होतो. व्यवसायात व्यवहार करताना काही व्यवहार Good faith ने केले जातात पण पुढे कायद्याच्या दृष्टीने ते गैर ठरण्याचाही सभव असतो. एखाद्या व्यवसायात शेवटला नफा तोटा पत्रक करताना काही नोद *Provision* स्वरुपात करतात. काही व्यवहार कायद्याच्या अडचणीमुळे नोदता येत नाहीत

तेव्हा कोर्टामुळे आपणास प्रसिद्धी मिळेल, आपला खपही वाढेल. कायद्याच्या कक्षेत काय येईल काय नाही हे सागता येणार नाही. हे सर्व व्यवहार Audit झालेले असतात. Auditor कायदेशीर पळवाटा पुऱ्या करून घेतो. हा कायदेशीर लढा नसून नैतिक लढा आहे. माझ्या मते महाराष्ट्रातील ३ निःस्पृह लोकापुढे तुम्ही व जवाहर दर्डा यानी आपल्या बाजू ठेवाव्या व त्यानी जो निर्णय दिला तो दोघानी मानावा. जर दर्डा दोषी ठरले तर त्यानी काय शिक्षा घ्यावी हे ही ठरवता येईल. आपण दोषी ठरलात तर आपण दिलगिरी प्रदर्शित करावी. त्यामुळे कोर्टबाजीचा भयंकर खर्च वाचेल. ह्या ३ लोकांना ह्या चौकशीसाठी जो खर्च होईल त्यातील २/३ भाग दर्डा यांनी स्वीकारावा. माणूसने १/३ खर्च सोसावा. कोणत्याही पक्षाच्या छायेतील लोक नसावे. नाईक, एस. एम. खरात ह्या तीन लोकाचे Panel ठरवता येईल. एकजण व्यावसायिक जमाखर्च जाणणारा असल्यास जास्त बरे. असा निःस्पृह सहकारी कायदे व हिशेब जाणणारा मनुष्य ह्यांच्या मदतीला असावा असे मला वाटते.

भ्रष्टाचाराच्या मी विरुद्ध आहे. कोर्टबाजी करून ह्या भस्मासुराला शह बसणार असेल तर जरूर कोर्टात त्याचा निकाल लावून घ्यावा. निःस्पृह कमिटीला मी मदत करावयास तयार आहे.

९ एप्रिल, ७४ — ह. म. गद्रे, पुणे

## 'माणूस' आणि मराठवाडा

¤ गेल्या आठवड्यात 'माणूस'ने मराठवाड्यातील आदोलनावर दोन लेख छापले. काही छायाचित्रे देखील होती. कागद टचाईच्या काळात जास्त Coverage देता येत नाही हे मान्य करून देखील आपले लेख अत्यत अपूर्ण होते असेच म्हणावे लागेल. एवढेच नव्हे तर झालेल्या व होत असलेल्या आंदोलनाच्या बाबतीत आपले लेख अत्यंत वरवरची माहिती देणारे होते. मराठवाड्याच्या काय व्यथा आहेत, आदोलन कशासाठी आहे, विद्यार्थ्यांनी चळवळ का सुरू केली व या आदोलना मागील मूलभूत प्रश्न काय आहेत ह्याची अगदी पुसटशी चर्चा देखील या लेखामध्ये नाही. वस्तुनिष्ठ Report देताना जर आदोलनाचा पाया ज्या वैफल्यावर, उपेक्षेवर व शासनाकडून होणाऱ्या हेतुपुरस्सर मुस्कटदाबीवर आधारित आहे त्याचा ऊहापोह न झाला तर सचिवालयातील अधिकारी जसा वस्तुनिष्ठ रिपोर्ट तयार करतात तसाच रिपोर्ट आपण तयार केला असे खेदाने म्हणावे लागेल. झालेल्या आदोलनात जे जे घडले त्याची उजळणी करून आदोलनामागील भूमिका, वैचारिक अधिष्ठान व जनमानसातील प्रतिक्रिया याचा सपूर्ण ऊहापोह केला गेला नाही तर अशा रिपोर्टसना ब्रिटिशकालीन इतिहासातील पुस्तकाचे स्वरूप येईल.

अर्थात 'माणूस' बद्दल आमच्या अपेक्षा याहून बऱ्याच वेगळ्या आहेत, मोठ्या आहेत. आमच्या अपेक्षा निर्माण झाल्या त्या गेल्या काही वर्षात 'माणूस'ने केलेल्या कामगिरीवरच आधारित असल्यामुळे उचावलेल्या अपेक्षेप्रमाणे न घडल्यास अपेक्षाभग झाल्यासारखे वाटते. विशेषत: दुर्लक्षित मराठवाड्याबद्दल असे घडल्याने आम्हा मराठवाड्यातील लोकांना जास्तच वाईट वाटते.

मराठवाडा जनता विकास परिषदेने (अध्वर्यू– श्री. गोविंदभाई श्रॉफ, औरंगाबाद) १५ ऑगस्टपर्यंत आंदोलन परत घेतले असले व मुख्यमत्री श्री. वसतराव नाईकानी दिलेल्या पोकळ आश्वासनाच्या खैरातीवर समाधान व्यक्त करून कृतकृत्य झाल्याचा निर्वाळा दिला असला तरी मराठवाड्यातील ९९% जनता ह्या आश्वासनावर भरवसा ठेवायला तयार नाही. त्याने जनतेचे समाधान झालेले नाही. आदोलनाच्या वाटेला न जाणारी या भागातील जनता पुनश्च आदोलनात पडेल किंवा नाही, हा प्रश्न वेगळा, परतु आमचे थोडेदेखील समाधान झाले नाही हे सत्य आहे व ते नाकारून चालता येणार नाही.

मराठवाड्यातील विद्यार्थी वर्गाने १७–५–७४ रोजी अंबाजोगाई येथे बैठक घेऊन आदोलन परत घेतल्याबद्दल जनता विकास परिषदेचा निषेध केला आहेच व आदोलन चालू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. फक्त चालूच नाही तर ते जास्त प्रखर करण्याचा निर्धार झाला आहे. आता यापुढे मोठ्या नेत्याची साथ नसताना विद्यार्थी वर्ग आदोलन कितपत व किती दिवस चालवू शकेल हे फक्त काळच सागू शकेल. त्याच्या आदोलनाला किती यश मिळेल हे कोणी सागावे. It is anybodys guess.

ह्या संदर्भात आपणाला एक सूचना करावीशी वाटते. कागद टचाईच्या काळात भारतीय राजकारणाच्या पटलावर असल्य महत्त्वपूर्ण घटना घडत असताना माझी सूचना आपणास कितपत व्यवहार्य वाटेल हे मी सागू शकणार नाही. अर्थात ते आपण ठरवावे.

माणूसचा एखादा अक 'मराठवाडा विशेषाक' जर काढता आला व ह्या अकात मराठवाड्याबद्दल आकडेवारी, ह्या भागातील मागासलेपणावर एक दृष्टिक्षेप, त्याची कारणे, सभाव्य उपाय, शासनाकडून होत असलेली उपेक्षा, सावत्र-आईची वागणूक व मराठवाड्याच्या प्रगतीबद्दल अन्य माहिती देणारा अक आपण जर काढू शकलात तर ह्या भागातील प्रश्नाना पुनश्च वाचा फुटेल असे मला वाटते.

१९ मे, ७४ — नंदकिशोर भार्गव, लातूर

# मुक्काम महाड : १९३२

## दलितमित्र नानासाहेब टिपणीस आणि प्रा. रा. म. बिवलकर

# एक आठवण

डॉ. बाबासाहेबांच्या दलित मुक्तीसंग्रामाची मुहूर्तमेढ १९२७ साली महाडातच रोवली गेली चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन हे क्रांतिकारी प्रसंग त्याचसाली महाडात घडले. तिथूनच दलित मुक्तीसंग्रामाला तोंड लागले. सनातन्यांनी अनेकांवर खटले भरले. साक्षीपुरावे झडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वजनिक तळ्याचे पाणी पिण्याचा अस्पृश्यांचा हक्क त्यातून शाबीत केला, पण समाज आतून खदखदत होता. दलितमित्र श्री. सुरबा नाना टिपणीस, कै. अनंतराव चित्रे, श्री. चितोपंत देशपांडे, कै. भाईशेट वडके, कै. अण्णा टिपणीस, श्री. शरदराव देशपांडे यासारख्या मंडळींनी जाति-धर्माला सुरुंग लावणारे उपद्व्याप करावेत हे सनातनी मंडळींना मान्य नव्हते. त्यामुळे जनतेच्या कानी एकदा खरा धर्म घालावा, जाती-पाती-धर्म या गोष्टी भगवंतानेच कशा निर्मिल्या आहेत हे तिला समजवावे या दृष्टीने शंकराचार्य श्री. जेरे शास्त्री यांना महाड भेटीचे निमंत्रण ब्रह्मवृंदाच्या पुढाकाराखाली दिले गेले. ही घटना १९३२ सालची आहे. श्रींनी महाडात यावे. ग्रामदेव श्री. वीरेश्वर मंदिरात उतरावे. त्याची मंदिराच्याच सभागारात रोज रात्री जाहीर प्रवचने व्हावीत इत्यादी सर्व कार्यक्रम पक्का झाला. श्रींचे स्वागत कुणी, कसे, कुठे करायचे; त्यांची मिरवणूक कशी काढायची; श्रींच्या मुक्कामात त्यांच्या पाद्यपूजा कुठे कुठे व्हायच्या–कार्यक्रमाचा सर्व तपशील तयार झाला. आजूबाजूच्या अनेक गावातून श्रींच्या आगमनाची बातमी वाऱ्यासारखी पसरली. श्री. शंकराचार्य म्हणजे हिंदूधर्माचे गुरू. जगद्गुरू हीच तर त्यांची बिरूदावली. त्यामुळे या परिसरातला सारा हिंदू समाज त्यांच्या आगमनाच्या वार्तेने हरखून गेला. दलितमित्र श्री. नानासाहेब टिपणीस यांच्याजवळ या प्रसंगाविषयी बोलताना मी जेव्हा म्हणालो की, ' जगद्गुरूंचे आगमन म्हणजे सनातनी मंडळींना दिवाळी दसराच. खूप आनंदाचे वातावरण पसरले असेल गावात ' तेव्हा नाना म्हणाले—

' तुम्ही म्हणता हे तर खरे आहे. लोकांनी गुढ्या तोरणेदेखील उभारली रस्तोरस्ती. श्री. शंकराचार्यांचा त्याकाळचा थाट ठाऊक नाही तुम्हाला. एखाद्या संस्थानिकासारखा लवाजमा त्यांच्या बरोबर असे. घोडे, रक्षक, ललकाऱ्ये, किनखापाने मढवलेली पालखी, भोई, खाली उतरले तर पायघड्यांवरून चालत. रस्त्याने निघाले तर पुढे चांदीची मशाल, दिवसा पेटलेली. दिग्विजयाचीच ती निशाणी. वाजंत्री लावून मिरवणुका निघत. त्यातल्या त्यात जेरेशास्त्री म्हणजे प्रकांड पंडित. पण इतके असले तरी त्यांचे स्वागत करणारी मंडळी धास्तावलेलीच होती. '

: का ?

: अहो का काय ? आम्ही डॉ. आंबेडकरांचे चेले गावात होतो ना ? आम्ही या कार्यक्रमात काही विघ्न आणू असे त्यांना वाटणारच. शिवाय आम्ही चांद्र सेनीय कायस्थ प्रभु मंडळी म्हणजे शंकराचार्यांचे शत्रूच.

: म्हणजे काय ? मी नाही समजलो. तुम्हीही हिंदू आहात. जगद्गुरु हिंदू समाजाचे गुरू. मग तुमचे शत्रू कसे ?

' तो एक निराळा इतिहास आहे. आज तुम्ही ३२ सालची हकीगत विचारताहात ना ?

: ते ठीक आहे. पण तुम्हा मंडळींचे शंकराचार्यांशी शत्रुत्व केव्हा आणि का निर्माण झाले. हा भागही–३२ सालच्या प्रसंगाशी संबंधीच नाही का ? तो आधी सांगा. शत्रुत्व केव्हापासूनचे ?

: १९०१ चा प्रसंग.

: म्हणजे तुम्ही...

: मी ३–४वर्षांचा होतो. पण माझे वडील तेव्हा ज्ञातीचे चिटणीस होते. त्या सालीही जगद्गुरु श्री. शंकराचार्य महाडात आले होते. मला नक्की नाव आठवत नाही. पण ब्रह्माळकर स्वामी असे काहीसे त्यांचे नाव होते. ही सारी हकिगत मी माझे वडील कै. प्रा. गोविंदराव टिपणीस यांच्या तोंडून फार पूर्वी ऐकलेली आहे. स्वामी गावात आले. त्यांची प्रवचने सुरू झाली. अलोट गर्दी जमायची त्या प्रवचनांना. प्रतिदिनी ठिकठिकाणी श्रींच्या पाद्यपूजा होत होत्या. तेव्हा आमच्या ज्ञातीनेही श्रींची पाद्यपूजा यथासांग करायचे ठरवले. आपल्या श्री. चिंतामणराव देशमुखांचे वडील कै. द्वारकानाथपंत देशमुख हे महाडात वकिली करीत असत. मोठा माणूस. त्यांच्या वाड्यात ज्ञातीतर्फे श्रींची पाद्यपूजा ठरली. त्याप्रमाणे श्रींना निमंत्रणही गेले. पण श्रींच्या भोवतालच्या ब्रह्मवृंदाने असा निर्णय दिला की, ' चांद्रसेनीय कायस्थप्रभु ही जात ना ब्राह्मण ना क्षत्रीय. श्रींनी फक्त ब्राह्मण वा क्षत्रीय यांजकडूनच पाद्य-पूजा स्वीकारावी असा दंडक आहे. तेव्हा श्रींना चां. का. प्रभु ज्ञातीचे हे निमंत्रण स्वीकारता येणार नाही. ब्रह्मवृंदाचा निर्णय स्वामींनी मानला. आणि ' पूजा स्वीकारता येणार नही ' असा प्रतिनिरोप ज्ञातीकडे धाडला. ज्ञातीचा अपमान शंकराचार्यांनी केला. हे कळल्यावर तरुण माथी भडकली. त्यांनी आपापसात काय ठरवले ठाऊक नाही. पण त्या रात्री शंकराचार्यांची चांदीची मशालच त्यांच्या वसतीस्थानावरून चोरीला गेली. गावातील विरोधाची चाहूलही लागली. श्रींनी आपला मुक्काम आवरता घेतला. आणि त्यानंतरच्या पहाटे म्हणजे तिसऱ्या दिवशी उजडता श्रींचे प्रयाण ठरले. प्रयाणाच्या धामधुमीत आणखी एक भयंकर प्रकार घडला.

: भयंकर प्रकार म्हणजे ?

: हे महाड आहे विवलकर. इथे केव्हा काय घडेल सांगता यायचे नाही.

: असे अघटित काय घडले ?

: प्रयाणाच्या वेळी, गर्दीतून पुढे घुसून दोघा सी. के. पी. तरुणांनी श्रीना जोडयाची माळ घातली !

नाना मोठ्याने हसले मी स्तंभित झालो होतो. थोडा सावरल्यावर म्हणालो,

: १९०१ साली, महाडात शंकराचार्यांना जोडयांची माळ घालणारे हे दोन तरुण कोण होते ?

: नावे हवी तर लिहून घ्या. एकाचे नाव भिकाजी नारायण टिपणीस आणि दुसरा सीताराम रंगोबा कर्णिक.

: मग लोकानी काय केले ?

: अहो करणार काय ? गर्दीत हे दोघे पळून गेले. जातीच्या अपमानाचा त्यानी सूड उगवला.

: तो असा उगवायचा ? ज्ञातीने त्यांना काही दोष लावला नाही ?

: अहो सगळेच चिडले होते शंकराचार्यांवर. त्यांच्या प्रयाणानंतर दोन दिवसानी ज्ञातीची बैठक बोलावण्यात आली. त्या सभेचे अध्यक्ष होते रावबहाद्दूर टिपणीस. या सभेत ज्ञातीने असा ठराव पास केला की, यापुढे ज्ञातीतर्फे शंकराचार्यांची पाद्यपूजा, अनुज्ञा मिळाली तरीही कुणी करायची नाही. आणि हा ठराव अखिल सी. के. पी. ज्ञातीने गेली ७३ वर्षे कसोशीने पाळला आहे. मध्यंतरीच्या काळात पाद्यपूजेचे नियम शिथिल झाले तरी.

: नाना, तुम्ही आता सांगितलेली घटना मी प्रथमच ऐकतो आहे. पण एवढ्या महत्त्वाच्या घटनेची कुठे नोंद झालीय् की नाही ? माझ्या वाचनात नाही म्हणून विचारतोय्.

: नोंद आहे. मला वाटते प्रबोधनकार ठाकऱ्यांनी आपल्या ग्रामण्याचा इतिहास किंवा अशाच काही नावाच्या पुस्तकात ही घटना नोंदली आहे. तुम्ही पुन्हा नोंद करा. हवा तर ठरावही छापा.

: जरूर. पण आता आपण ३२ सालच्या प्रसंगाकडे वळू.

नानांनी सांगितलेला प्रसंग असा—

श्रींचे कोणत्या दिवशी महाडात आगमन होणार याची माहिती गावात ओरडया (दवंडी देणारा) कडून जाहीर झाली. शंकराचार्यांची प्रवचने कुठल्या दिवसापासून वीरेश्वर मंदिरात होतील तेही जाहीर झाले. श्रींच्या आगमनाची लोक चातकाप्रमाणे वाट पाहात होते.

ठरलेल्या दिवशी रात्री बरोबर ९ वाजता देवळाच्या सभामंडपात श्री. जेरेशास्त्री यांचे प्रवचन सुरू झाले. नाना, अनंतराव चित्रे, चिंतोबा देशपांडे, अण्णा पोतनीस, भाईशेट वडके, शरद देशपांडे आणि त्यांची मित्रमंडळी प्रवचनाला हजर होती. वीरेश्वरासमोर सभामंडपात मखर तयार केलेले. एक सुशोभित आसन श्रींकरता सिद्ध होते. ललकाऱ्या झाल्या आणि जगद्गुरूंची मूर्ती सभामंडपात दाखल झाली. पेटती मशाल धरून एक पाईक, पुढे-मागे शरीर रक्षक यांचेसह श्री येऊन आसनस्थ झाले. जमलेल्या मंडळींनी उत्थापन देऊन त्यांचे स्वागत केले. सर्व मंडळी स्थानापन्न झाल्यावर आपल्या धीरगंभीर आवाजात श्रींनी प्रवचनाला सुरुवात केली. हिंदुधर्माची ध्वजा कशी व किती सनातन आहे, किती भव्य आहे, किती दिव्य आहे हे सांगून श्रींनी जातीपातीचा विषय काढला. अस्पृश्यता नष्ट करण्याचे उठलेले वड म्हणजे धर्मावरच आघात आहे. चातुर्वण्याची चौकट पाळणे, त्या चौकटीतच आपले जीवन व्यतीत करणे कसे योग्य आणि हिंदूच्या हिताचे आहे ते त्यांनी प्रतिपादन केले. आणि पुढे म्हणाले, 'अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वरप्रणीत समाजधारणा उध्वस्त करण्यासारखे होईल. परमेश्वराचाच तो अपमान होईल. कारण प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णानेच, 'चातुर्वर्ण्यमया सृष्टम्, असे गीतेत सांगून ठेवले आहे.' एकूण प्रवचनाचा सूर मुक्तिसंग्राम कसा वेडेपणाचा आहे हे स्पष्ट करण्याचा होता. नाना पेठे म्हणाले—

: आम्ही सर्व मंडळींनी ते सारे शांतपणे ऐकून घेतले. दुसऱ्या दिवशी सकाळी श्री. शरद देशपांडे आणि त्याची मित्रमंडळी घरी आली. अनंतराव, चिंतोबा, वडके, अण्णा, सारे बैठकीवर हजर होतेच. मुलाचे म्हणणे असे होते की,

: असली प्रवचने आम्ही मुकाट्याने ऐकून घेणार नाही. ती बंद पाडू.

: कशी ? शरद म्हणाला.

: आरडाओरड, गोंधळ माजवून.

: प्रवचने बंद पडली तरी त्यामुळे मुक्तिसंग्रामी भूमिका श्रींनाही कळणार नाही आणि लोकांनाही उमजणार नाही. त्यामुळे तुम्ही श्रींचा पराभव केला असे कसे होईल ?

: मग काय करावे ?

: असे विचारा, अनंतराव म्हणाले.

: तुम्ही श्रींशी वाद करा. त्यांची विधाने खोडून काढा.

पण मुलांना मुद्देसूदपणे हा वाद करणे कसे शक्य होईल ? म्हणून सर्वानुमते अनंतराव चित्र्यांनी एक प्रश्नावली लगेच तयार करावी आणि ती श्रींकडे पाठवून द्यावी. आजच्या प्रवचनात आम्हाला या प्रश्नांची उत्तरे जाहीरपणे हवी आहेत असे श्रींना कळवायचे ठरले. नाना पुढे म्हणाले—

: अनंतराव चित्रे म्हणजे मोठा विद्वान माणूस होता. माझा मेव्हणा म्हणून मी त्यांची स्तुती करीत नाही. त्याने दुपारपर्यंत एक भली मोठी प्रश्नावली व त्यावरची आपली समर्थने लिहून काढली. आणि ती मुलाबरोबर श्रींकडे पाठवून दिली. पण जेरेशास्त्र्यांनी, प्रवचनातून उत्तरे द्यायचे नाकारले.

मुले संतापून परत आली. म्हणाली,

: आता काय करायचे बोला. अनंतराव लगेच म्हणाले,

: आता हे प्रश्न सभागृहात उपस्थित करायचे. श्रींशी वाद करायचा.

' सर्वानुमते असे ठरले की शरद देशपांडेने भर प्रवचनात श्रींना प्रश्न विचारायला सुरुवात करायची. कमी अधिक झाले तर आम्ही मोठ्या मंडळींनी मध्ये पडायचे. नाहीतर होता होईतो मुलांनीच सारे उरकायचे.

: नाना, शरद देशपांडे कोण ?

: आमचा एक चेला. आता साठीच्या घरात आहे.

: कुर्ल्याला राहतो. तेव्हा तो १८–२० वर्षांचा होता. मोठा

चुणचुणीत हुशार. गरम डोक्याचा आणि जिद्दी. त्यावेळी तो प्रोव्हियस नाही तर इटरच्या वर्गात शिकत होता. सुटीत महाडला आला होता. तो हे काम चोखपणे करील याची आम्हाला खात्री होती शिवाय अनतराव पाठीशी होतेच.

: मुलानो शरदच्या नेतृत्वाखाली प्रवचन उधळून लावण्याचा कार्यक्रम जयत आखला प्रश्नाच्या सरबत्तीला श्रीनी भीक घातली नाही तर काय करायचे ? कुणी कुठे बसायचे, कुणी झांजा वाजवायच्या, कुणी आरडाओरड करायची, शरदला बोलायला कुणी विरोध केल्यास, 'त्याला बोलू द्या त्याला बोलू द्या' असे कुणी ओरडायचे, शरदच्या प्रश्नांना टाळ्या वाजवून सर्व सभेची त्याला अनुमती आहे हे कसे दाखवायचे, सारे त्यानी व्यवस्थितपणे ठरवले होते.

: त्यारात्री ९ वा. श्रीच्या जयजयकारात शकराचार्यांनी मदिरात प्रवेश केला. सर्वांनी उठून त्याचा मान राखला. श्री. स्थानापन्न होताच सर्वजण खाली बसले. शरद मात्र उभाच राहिला. सभागृहातून 'खाली बस. खाली बस' अशा अनामिकांनी केलेल्या आज्ञा घुमल्या. पण शरद बसला नाही. तो श्रीना उद्देशून बोलू लागला.

कालच्या प्रवचनात श्रीनी जातिभेदाबद्दल भगवान् श्री कृष्णाचा निर्वाळा दिला. त्या विषयी मला काही शका आहेत. त्यांचे श्रीनी निरसन करावे.

श्री : वैयक्तिक शका निरसन मी माझ्या मुक्कामी करीन. मला तिथे भेटा.

शरद : आपण कालची विधाने सार्वजनिकरीत्या केली आहेत तेव्हा त्याचा पुरस्कार वा इन्कार सार्वजनिक रीतीनेच व्हायला हवा. तसे न झाल्यास आम्ही हे प्रवचन होऊ देणार नाही.

: सभागृहात एकच कुजबूज सुरू झाली. कुणी टाळ्या वाजवल्या. 'बरोबर आहे' असे ओरडले. श्रीनी हात उचावून सर्वांना शांत केले. म्हणाले--

: 'मी या मुलाच्या शंकांचे निरसन करणार आहे. बाळ, विचार तुला काय विचारायचे ते.'

: सभागृह शांत झाले. सनातन्यानी दातओठ खाल्ले पण खुद्द शकराचार्यच प्रश्नाची उत्तरे द्यायला सिद्ध झाले होते. शरद न डगमगता म्हणाला,

: जाती भगवतांनी निर्माण केल्या असे आपण काल म्हणालात.

श्री : होय.

शरद : आपण उधृत केलेले विधान अर्धे आहे. त्याचा पुढला भाग आपण सांगितला नाहीत.

श्री : 'गुणकर्म विभाग श.' हा त्याचा उत्तरार्ध. तो पहिल्या भागाला पोषकच आहे.

शरद . नाही. याच भागामुळे श्रीकृष्णाने जातीभेद कायमचे नाहीत हे सांगितले आहे. गुणकर्मावरून जाती ठरतात. एकाच माणसाचे चार मुलगे चार धदे करू लागले तर ते त्याच्या वर्णाचे होतील असा याचा अर्थ आहे.

श्री : आपला युक्तिवाद भ्रामक आहे. जाती ईश्वरनिर्मित आहेत. त्यांना विरोध करणे हा ईश्वरविरोध होईल. प्रत्येक पिढीत जर अशी जातीची अदलाबदल होऊ लागली तर समाजाला स्थैर्य प्राप्त होणार नाही.

शरद : हे आपले म्हणणे मला पटत नाही. सर्व माणसे एकाच वर्णाची आहेत. पण गुण व कर्म याच्या धोरणाने ती चातुर्वर्णिक झाली. प्रत्येक पिढीत डॉक्टर होतात, वकील होतात, शिक्षक होतात. ही अदलाबदल समाजाच्या धारणेला कधीच बाधक झाली नाही. अखेरीस माणूस हा माणूसच राहाणार. बर्फ, पाणी, वाफ ही जशी पाण्याची तीन रूपे असली तरी त्याचा गाभा बदलत नाही तद्वत् कर्मपरत्वे, गुणपरत्वे एक माणूस ब्राह्मण होईल, दुसरा क्षत्रीय होईल इतकेच नव्हे तर एखादा माणूस काही काळ ब्राह्मण असेल व काही काळ क्षत्रीयही असू शकेल. ब्राह्मकर्म करणारा ब्राह्मण परशुराम, क्षत्रिय वशच्छेदार्थ हाती परशू घेतल्यावर क्षत्रीय झाला. पण दोन्ही परिस्थितीत तो माणूस होताच. हेच कृष्णाने सांगितले. त्याचा आपण विपर्यास करीत आहात.

श्री : जातीबाबत तुमची उदाहरणे चूक आहेत

शरद . अस्पृश्यता कुणी निर्माण केली ?

श्री : देवानेच.

शरद : मग त्याचा उल्लेख भगवताने गीतेत का केला नाही ? अठरा अध्यायातील ७०० श्लोकात 'मीच अस्पृश्यता निर्माण केली' असे आणखी एक वाक्य घालायला त्याला प्रत्यवाय नव्हता.

श्री : घाणीचे काम करणाऱ्यानाच आपण शूद्र म्हणतो. त्याचा निराळा उल्लेख कशाला हवा ?

शरद . पण कुणीतरी ते काम करायला हवे ना ? आपल्या सुखाकरता व स्वास्थ्याकरता आपण काही लोकाना ते घाण काम करायला सांगितले. त्यांनीही ते करायचे मान्य केले. त्याबद्दल त्याचे उपकार स्मरून त्यांचे आभार मानायचे सोडून, तुम्ही अस्वच्छ काम करता म्हणून आपण त्याना अस्पृश्य ठरवावे ही कृतघ्नता आहे. शिवाय अस्पृश्य म्हणून त्यानी कायम तेच काम केले पाहिजे अशी त्याच्यावर सक्ती करणे अरेरावी आहे. जन्मल्यापासून आई आपले मलमूत्र काढते म्हणून आपण तिला अस्पृश्य समजतो का ? उलट 'मातृ देवो भव' म्हणून तिचा गौरवच करतो ना ? भगवताने, आपण महार चाभाराना अस्पृश्य मानू नये म्हणून, चोखाबरोबर गुरेढोरे ओढली आणि दामाजीसाठी विठू महार बनला तो आपल्याला उदाहरण घालून देण्याकरता. महाराज, जातीयता ईश्वर निर्मित नसून मनुआपस्तभ आदि ब्राह्मण स्मृतिकारनिर्मित आहे. हे चांगले ठाऊक असलेल्या आपणासारख्या धर्मगुरुनीही तीच री ओढावी ? हिंदुधर्मातील छळाला कटाळून किती अस्पृश्य परधर्मात गेले वा जाताहेत याचा आपण विचारही करू नये ? अत्यजाच्या मुखी श्राद्धाचे अन्न घालणाऱ्या एकनाथाला हिंदूधर्म समजला नव्हता की जातीपाती वा स्पृश्यास्पृश्यत्व न पाळणाऱ्या भागवत धर्म सांगणाऱ्या ज्ञानियाला तो समजला नव्हता ? ज्या देवाने हिंदुधर्म घडविला, त्याच देवाने इतर धर्मही निर्माण केले तिथे जाती नाहीत. अस्पृश्यता नाही मग हिंदुधर्मातच ती का ? आपली पापे परमेश्वराच्या गळ्यात तुम्ही बांधायला निघाला असलात तर आम्ही तरुण तुम्हाला मानणार नाही. हिंदु धर्माचा ऱ्हास करणाऱ्या रूढी उचलून धरून त्यांच्या प्रसारार्थ तुम्ही अशी प्रवचने देताहात, ती आम्ही उधळून लावू.

शरदच्या भाषणावर कडकडून टाळी उठली. श्री ही जरा गडबडले म्हणाले—

'अहो गुण-कर्माने व्यवसाय ठरले. त्या त्या व्यावसायिकाचे वशज त्या त्या जातीचे ठरू लागले. जाती जन्मावरून ठरू लागल्या आणि मग दृढमूल झाल्या.

शरद : म्हणजे आता आपण ईश्वरप्रणित जातीवरून जन्मावरून जाती ठरतात या युक्तिवादावर आला आहात तर ! जाबालीचा मुलगा ब्राह्मण झाला. क्षत्रिय विश्वामित्र, ब्रह्मर्षी झाला. ही उदाहरणे, जन्माने ठरलेली जात आचरणाने बदलता येते हेच दाखवतात. म्हणजे जाती ईश्वरप्रणीतही नाहीत आणि जन्मावरूनही ठरत नाहीत.

या वेळेपर्यंत श्रीच्या पायाखालची बरीच वाळू घसरून गेल्यासारखी दिसत होती. ते भांबावले. अनंतरावाची न् माझी नेत्रपल्लवी झाली. शरदने छान लावून धरली होती. सभा अस्वस्थ होती पण शातपणे ऐकत होती.

श्री जो जे कर्म करील त्यावरून त्याची जात ठरेल असे आपण आता म्हणालात.

शरद : बरोबर आहे. अध्ययन, अध्यापन, ब्रह्मकर्म करणारे ब्राह्मण. पण तसे जे करीत नाहीत ते ब्राह्मण नव्हेत असे आपण मानाल का ?

श्री : प्रश्नाचा रोख समजला नाही.

शरद · सांगतो ना. या सभेत बसलेल्या श्रोत्यांपैकी ब्राह्मण म्हणवून घेणाऱ्या कित्येकांची किराणा मालापासून, कापडचोपड व सोनेचादीची दुकाने आहेत. मग कर्मप्रामाण्याप्रमाणे ते वैश्यच नाहीत का ? काही ब्राह्मण तर त्या दुकानात झाडू मारण्याचे काम करतात. ते शूद्र झाले. याउलट सदैव ज्ञानगंगेत रममाण असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खरेखुरे ब्राह्मण म्हणावे लागतील. भंगीवाड्यात राहून, भग्याप्रमाणे साफसफाईचे काम करणारे महात्माजी भगी आहेत असे म्हणावे लागेल.

शरदच्या या निष्कर्षाने सभागृहात खळबळ माजली. महात्माजीना भगी म्हटल्यामुळे सभागृहातला एक मोठा भाग अस्वस्थ झाला. ब्राह्मण म्हणून जन्मलेल्या पण ब्रह्मकर्म न करणाऱ्यांचा वर्गही खवळला. गडबड, गोंधळ सुरू झाला. श्री पार गोंधळले. या युक्तिवादात आपण चितपट हरलो हे श्रोत्यांच्याही लक्षात आले आहे हे त्यांना उपजले. पण तरीही नेट देऊन त्यांनी हात उचावून सभा शात केली आणि म्हणाले,

'हे पाहा, परमेश्वराने हत्ती, घोडे, उट, बैल हे जसे निरनिराळे प्राणी निर्माण केले तशाच माणसात ब्राह्मण, क्षत्रिय वगैरे जाती निर्माण केल्या आहेत.'

पण शरद कच्च्या गुरूचा चेला नव्हता. तो लगेच उठून म्हणाला,

'आपल्या विधानात दोन विसगत भाग आहेत. हत्ती, घोडे, उट या जाती नाहीत. प्राणी आणि जाती या दोन शब्दाची आपण गल्लत करीत आहात.

श्री : यात काय गल्लत झाली ?

शरद · घोडा, हत्ती, बैल यांचा सयोग होत नाही. त्याना जाती म्हणणे गैर आहे.

श्री . आपण असे का म्हणता ते मला समजत नाही.

शरद, प्रजोत्पादनाच्या नैतिक गोष्टीवर बोलायला सकोचत आहे असे पाहून त्याचे गुरू अनंतराव चित्रे उभे राहिले. म्हणाले,

मी त्याच्या बोलण्याचा खुलासा करतो. हत्ती व घोडा याचे मीलन होणे शक्य नाही. प्रजोत्पादन तर दूरच राहो. पण अस्पृश्याचा मुलगा व ब्राह्मणाची मुलगी, किंवा क्षत्रियाचा मुलगा व वैश्याची मुलगी याचा समागम होऊ शकेल व त्याची प्रजा तुमच्या आमच्या, सारखीच असेल म्हणून हत्ती, घोडा, उट व ब्राह्मण, क्षत्रिय, महार. चांभार या जाती सारख्याच आहेत असे म्हणणे चूक आहे. आपण विद्वान आहात. एका महान धर्माचे गुरू आहात. आपला शब्द शिरसावद्य मानला जातो. म्हणून सत्याचा अपलाप करून लोकाची दिशाभूल करणे आपल्या कीर्तीत भर घालीत नाही. आपली मते काहीही असोत. आपण एका सनातन धर्माचे प्रमुख आहात. त्या धर्मात ब्राह्मणांनी पाडलेल्या घृणास्पद प्रथाची व चालीरीती, रुढीची तरफदारी करताना आपल्या विद्वत्तेला काळिमा लागेल अशी विधाने आपण करू नये. आपण अस्पृश्याना न्याय द्या. त्याना माणूस म्हणून जगू द्या. माणूस म्हणून जगण्याचा त्याना हक्क आहे हे आपण सर्व हिंदूना बजावा. सर्व जाती व स्पृश्यास्पृश्यता या गोष्टी मानवनिर्मित आहेत. कदाचित सामाजिक उत्क्रातीच्या कुठल्यातरी पायरीवर या भेदाभेदाची गरज भासली असेल. पण आज ते भेद कालबाह्य झाले आहेत. ते नियम नष्ट करून आपण एकत्र जगू या. असा निवाडा आपण आपल्या आजच्या प्रवचनात द्यावा अशी आम्हा सर्वांची आपल्याला नम्र विनती आहे

अनतरावाच्या भाषणात पुन्हा कडाडून टाळी पडली. झाजा वाजू लागल्या. गडबड गोंधळ वाढला. शकराचार्यांनी तो थाबविण्याचा जराही प्रयत्न केला नाही श्रीचा नैतिक पराभव जणू जाणून सयोजकांनी त्यादिवशीचे प्रवचन रद्द केले. सर्वजण उठून उभे राहिले. पुन्हा एकदा सनातनधर्माचा व श्रीचा जयजयकार झाला आणि श्री विजेच्या वेगाने सभागृहातून स्वस्थानी निघून गेले, श्रीचे प्रवचन बद पडले, पण आम्हा उपद्व्याप्याच्या शिरी शिरपेच खोवून.

जाहीर प्रवचनात गोंधळ माजतो हे पाहिल्यावर दुसऱ्या दिवसापासून श्रीची प्रवचने खासगी वाड्यातून योजली गेली तिथे गडबड करणे म्हणजे कायद्याच्या कचाट्यात सापडण्यासारखे होते. पण तरीही एका ठिकाणी चितोपत देशपांड्यानी श्रीना थोडे छेडले पण खाजगी जागेत प्रवचन असल्याने, धोरण राखून वादावादी वाढू दिली नाही.

तीन दिवस अशी खाजगी प्रवचने झाली. त्याना गर्दीही खूप होई. जागा अपुरी पडे. याचा अर्थ एकदर जनतेला ती हवी आहेत असा घेऊन पुन्हा चौथ्या दिवशी वीरेश्वराच्या मदिरात जाहीर प्रवचन होणार असल्याचे जाहीर झाले. महाडात शकराचार्यांना जाहीर प्रवचन करू द्यायचे नाही असे आम्ही ठरवले होते. त्यामुळे त्या चौथ्या दिवशी प्रवचन कसे बद पाडायचे याचा आम्ही विचार करू लागलो. आता काही नवी सनसनाटी हवी. असा विचार चालू असता, त्या दिवशीच्या प्रवचनाचे वेळी अस्पृश्य जवानाना, श्रीचा चरणस्पर्श करण्याकरता मदिराच्या सभामडपात न्यायाने ठरले. आजूबाजूच्या गावी निरोप पाठवून शभरेक अस्पृश्य तरुण सध्याकाळपर्यंत महाडात हजर झाले.

पण प्रवचनाच्या वेळी आम्ही असे काही करणार, ही बातमी, कशी कोण जाणे गावभर झाली. संयोजक चिरडीला गेले. त्यांनी मामलेदार श्री. अबेरकर यांना सांगून सशस्त्र पोलीस बदोबस्त सभास्थानी आणवला. अस्पृश्यांना मडप खुला होता. महात्माजींच्या उपोषणाच्यावेळी तो निर्णय महाडकरांनी व वीरेश्वराच्या पचांनी घेतला होता. तरीपण ते लोक दर्शनाला घुसले तर प्रवचनात गोंधळ उडालाच असता.

सध्याकाळ होत चालली तसे वातावरण अस्वस्थ बनू लागले. मी, (सुरबा) चितोबा, अण्णा, भाईशेट वडके, अनंतराव, केशवराव देशपांडे या मडळीनी मदिरापासून ५० यार्ड अतराचे आत येऊ नये असा बदी हुकूम मामलेदारांनी आमच्यावर बजावला. एवढेच नव्हे तर, मामलेदार साहेबांनी आणखी एक तिरकी चाल टाकली. दिवे-लागणीला त्यांनी मला व चितोबा, भाईशेठ, अण्णा, केशवराव वगैरे मडळीना चर्चेकरता कचेरीत बोलवून घेतले. प्रवचन सपेपर्यंत आम्हा उपद्‌व्यापी मंडळीना कचेरीत अडकवून ठेवण्याचा त्यांचा मनसुबा होता. अनतराव चित्रे मात्र कचेरीत गेलेच नाहीत. अस्पृश्य तरुणांना दर्शनाला नेण्याचे काम शरद देशपांडेकडे होते.

रात्र झाली...देवळात मुंगी रिघायला जागा नव्हती. सारे लोक 'काय होते ?' या उत्सुकतेने आले होते. बरोबर नऊ वाजता श्रींचा जयजयकार झाला आणि ते सभास्थानी आले. त्यांनी प्रवचन सुरू करण्याअगोदरच मदिरापासून ५० यार्डावर असलेल्या पिंपळाच्या पारावर उभे राहून अनतराव चित्रे यानी आपले व्याख्यान सुरू केले. शरदने तेवढयात १०० अस्पृश्य तरुण देवळात घुसवले. 'अस्पृश्य देवळात घुसले' अशी एकच हाकाटी उठली. बसलेली माणसे उठली. दंगामस्ती, धक्काबुक्की चालू झाली कुणाचाच पाय-पोस कुणाच्या पायात राहिला नाही. सयोजकांनी श्रींभोवती संरक्षक-कडे करून त्या गर्दीतून कसेबसे त्यांना स्वस्थानी हलवले. १५–२० मिनिटात मडप रिकामा झाला. माणसे पागली. अनतरावानी आणि शरद व त्याच्या मित्रानी कामगिरी फत्ते केली होती रात्री मामले-दार कचेरीतून सुटल्यावर आम्हाला ती समजली.

दुसऱ्या दिवशीची सकाळ मोठी सुरेख बातमी घेऊन उगवली. 'जगद्‌गुरु श्री शकराचार्यांनी महाडचा मुक्काम आवरता घेऊन ते रातोरात दुसऱ्या गावी निघून गेले' ही ती बातमी.

'नाना, शकराचार्य पळाले' असे सांगतच शरद ओटीवर चढला. आम्ही सर्वांनी त्याचे प्रेमाने स्वागत केले.

पोराने बहाद्दरपणे खिंड लढविली होती. ☐ ☐


# शतपावली
## रवींद्र पिंगे
## प्रसिद्ध झाले
## मूल्य रुपये दहा

## रुपया पुस्तक योजना

या योजनेतील एकूण दहा पुस्तकांपैकी आठ पुस्तकांचे वाटप यापूर्वीच झाले आहे. रवींद्र पिंगे यांचे 'शतपावली' हे नववे पुस्तक तयार झाले असून ते कार्यालयातून घेऊन जाण्याची व्यवस्था ग्राहकांनी करावी.

ज्यांना पूर्वीच्या आठ पुस्तकांप्रमाणे हे पुस्तक पोस्टाने पाठ-वावयाचे आहे त्यांना दहावे श्रीग्रामायन हे पुस्तक जुलै-ऑगस्टमध्ये तयार झाल्यावर दोन्ही पुस्तके एकदम पाठविली जातील. पोस्टखर्च दुबार होऊ नये म्हणून ही व्यवस्था.

ही योजना पूर्ण होण्यास प्रथम वीजकपात, नंतर कागदटंचाई अशा सारख्या अडचणी येत गेल्या. त्यामुळे ग्राहकांची गैरसोय झाली याची आम्हाला जाणीव आहे. पण एवढ्या अडचणी येऊनही योजना अखेर शेवटास जात आहे याचे समाधानही आहे.

आता 'टॉलस्टॉय' व 'मी नेताजींना बघितलंय' ह्या पुस्तक प्रकाशनाच्या योजना हाती घेत आहोत.

ग्राहकांचा कृपालोभ असावा.

व्यवस्थापक, राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.

# समुद्रातील तेल उत्खनन

# जनतेला विश्वासात घ्या !

प्रतिनिधी

सध्याच्या जगात इंधनासाठी वापरल्या जाणाऱ्या तेलाचे महात्म्य वाढल आहे अलिकडच्या काळात युद्धे तेलावर लढवली जाऊ लागली. देशाची आर्थिक सुबत्ता वाढवण्यामाठी तेलाचा महत्त्वपूर्ण उपयोग केला जाऊ लागला. मध्य पूर्वेत तेलाचे प्रचड साठे, पण पैशांच्या, ज्ञानाच्या बळावर ह्या साठ्यालगतच्या प्रदेशावर वर्चस्व राहिल ते पाश्चात्य राष्ट्राचे. त्यातही प्रामुख्याने अमेरिका, इग्लड, रशिया आदी देशाकडे. तेलाच्या बळावर ह्या राष्ट्राची समृद्धी वाढत गेली. परतु दुसऱ्या महायुद्धानतर, आफ्रिकी, अरब राष्ट्रामध्ये स्वातंत्र्याची लाट आली. स्वातंत्र्यापाठोपाठ स्वत्त्वाचीही जाण आली. पाश्चात्याची आर्थिक मगरमिठी ढिली करण्याकडेही ह्या नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्राचा कल दिसू लागला. इस्रायलच्या अस्तित्त्वाने ह्या अरबामधला अरब राष्ट्रवाद वाढीला लागला. आणि ह्या साऱ्यांच्या सहजी परिणामातून तेलाचे जबरदस्त महत्त्व अरब राष्ट्रानी जगाला पटवून दिलं– गल्या अरब–इस्रायल सघर्षात. अरबानी अमेरिकादी पाश्चात्य राष्ट्राना तेलाचा पुरवठाच बद केला ! अमेरिकादी पाश्चात्य राष्ट्राच्या अर्थकारणात, औद्योगिक जडणघडणीत तेलाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे अरबानी उगारलेल्या तेलबदीच्या अमोघ अस्त्रामुळे ह्या दोन आधाडचा धडाधड कोसळू लागल्या. जागतिक बाजारपेठा त्यामुळे हादरू लागल्या. उत्पादन सर्वत्र थडावल. महागाईने नवे टोक गाठले. पेट्रोलसारख्या तेलजन्य पदार्थांचे रेशनिंग होऊ लागल. क्वचित गडपही होऊ लागले. जगभर एकप्रकारे अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली !

ह्या तडाख्यातून, भारतही अर्थातच सुटू शकला नाही अरब इस्रायल सघर्षापाठोपाठ आलेल्या तेलबदीनतर आपल्याकडे पेट्रोल, क्रूड, फर्नेस ऑईल, केरोसीन, नॉप्था आदो पदार्थांचे भाव भरससाठ वाढत गेले. त्या बरोबरच बहुतेक सर्व वस्तूंच्या भावात दुपटी, चौपटीने वाढ झाली. अरब राष्ट्रे ही खरी आपली मित्र राष्ट्रे. अरब इस्रायल सघर्षात आजपर्यंत आपण सातत्याने अरबांचा पाठपुरावा करीत आलो. पण तरीदेखील अरबानी आपल्याबाबत कुठलाही पक्षपात न करता आपलेही तेल कापले. पुरवलेल्या तेलाचे भाव वाढवले. आजचा मित्र उद्याचा शत्रू ठरू शकतो, शत्रू मित्र ठरू शकतो. दोन राष्ट्राच्या परस्पर सबधात मैत्रीचे धागे बहुश कच्चे ठरतात. कुठल्याही गोष्टीचा निर्णय करताना राष्ट्रीय स्वार्थच महत्त्वाचा ठरतो. अरबानीही मला वाटते तेच बघितले असावे. पण भारताबरोबरच्या मैत्रीच्या नात्याला त्यानी दुय्यम स्थान दिले आणि जगाबरोबर भारतालाही होरपळून काढल ह्यात मात्र वाद नाही !

आंतरराष्ट्रीय समस्या आली असताना त्याचा तडाखा भारताला बसला तर त्यात एवढ हळहळायचे खरे म्हणजे कारण नाही. पण हळहळ वाटते ती अशासाठी की ह्या जागतिक तेल तगीच्या काळात तेलसाठ्याचा हुकमी एक्का स्वत जवळ ठेवण्याची सधी आम्हाला गेल्या २५ वर्षात देशहीत डोळ्यासमोर ठेवून नियोजन केले असते तर मिळाली असती ह्या साठी ! ही सधी आम्ही गमावली म्हणून हळहळ वाटते तोटयात चालणाऱ्या नसत्या महत्त्वाकाक्षी जडोद्योगावर आम्ही पैसा, वेळ, श्रम खर्च केला. पण ह्याही उद्योगासाठी आवश्यक असणाऱ्या तेलाच्या बाबतीत मात्र आम्ही पार दुसऱ्यावर अवलंबून राहिलो. आम्हाला पुरून उरतील एवढे प्रचंड साठे इथल्या भूगर्भात, समुद्रात उपलब्ध असूनही ते शोधून काढून त्याचा योग्य वापर करण्यात आम्ही अक्षम्य दिरंगाई केली म्हणून हळहळ वाटते ! ! ह्या महत्त्वाच्या मूलभूत खनिज तेलाच्या बाबतीतल्या आमच्या अक्षम्य हेळसाडीमुळे, तेलासाठी वणवण फिरायची आणि देशात भयानक भाववाढ होऊ द्यायची पाळी आज आपल्यावर आली आहे ! चुकीच्या नियोजनाचा हा रोखठोक दाखला आहे ! !

. २३ मार्चच्या 'माणूस' मधून ह्या संबधाचे चर्वितचर्वण आलेले आहेच. 'सागर सम्राट'ची कथा, बॉम्बे हाय परिसरातले उत्खनन वगैरेंची तपशीलवार माहितीही तिथे दिलेली आहे. आज ह्या प्रश्नावर पुन्हा आख्यान लावण्याचे कारण म्हणजे, ह्या अलीकडेच आलेल्या एकदोन बातम्या. आज तेलासबधात एवढे रामायण घडून त्यामुळे झालेल्या प्रचड भाववाढीतून देशात अराजक सदृश परिस्थिती निर्माण झाल्यानतर तरी ह्या प्रकरणात चालढकल होणार नाही अशी अपेक्षा होती. बॉम्बे हाय परिसरात खोदल्या जाणाऱ्या विहिरीतून उच्च दर्जाचे भरपूर तेल मिळत असल्याच्याही उत्साहवर्धक बातम्या ऐकू येत होत्या वाटत होते. आता तरी तेलोत्पादनाच्या कार्यक्रमाला अग्रक्रम मिळेल. 'सागर-सम्राट' विरुद्ध करण्यात आलेले सर्व आरोप बिनबुडाचे ठरतील. शंका-कुशंका निराधार ठरतील. काम जोमाने सुरू होईल. पण कसचे काय ! ह्या आशादायक बातम्याच्या मधेच एक दिवस अगदी कोपऱ्यात एक छोटीशी बातमी आली. 'सागर सम्राट' महत्त्वाच्या दुरुस्तीसाठी माऊच्या धक्क्याकडे सरकत आहे. कमीत कमी २५ मे पर्यंत तरी, (किमान २ महिने) ते पुन्हा कामगिरीसाठी बाहेर पडू शकणार नाही.' वरवर चौकशी करता 'सागर सम्राट'च्या दुखण्याविषयी काहीच थागपत्ता लागला नाही. थोड्या खोलात जाऊन चौकशी करताच समजले की, फूटीगच्या बाबतीतच गडबड आहे. साठ सत्तर मीटर

खोलीच्या पुढे सागरसम्राट ठामपणे तग धरू शकणार नाही असे मला मागच्या वेळीच सांगितले गेले होते. दुर्दैवाने तीच शका खरी ठरू पाहात आहे असे दिसते. आणि असे असूनही शासन मंत्रालय किंवा खाते, कुणीही जनतेला विश्वासात घेत नाही आहेत ! ह्या *विषयी हकिगत जनतेसमोर आली पाहिजे, कारण राष्ट्राच्या दृष्टीने* ह्या प्रश्न फार गंभीर आहे ! !

ह्याच तेलासबधातली दुसरी बातमी आहे, ह्या महिन्याच्या पाच-सहा तारखेची ! तिही तितकीच धक्कादायक. २३ मार्चच्या 'माणूस 'मधून लिहिताना, 'सागर सम्राट 'च्या एकूण प्रकृतीमुळे तेल उत्खननासाठी पाश्चात्य राष्ट्रांबरोबरच करार करायचे प्रयत्न चालू असल्याच्या वदतेचा उल्लेख आहे. दुर्दैवाने तीही शका खरी ठरली आहे. केंद्रीय पेट्रोलियम व रसायन खात्याचे मत्री श्री. देवकांत बारूआ नुकतेच अमेरिकेहून परतले आहे. अमेरिकेत ते दोन अमेरिकन कपन्याशी करार करून परतले आहेत. ह्या कराराना केंद्रीय मत्रिमडळाची औपचारिक मान्यता मिळाल्यावर, मुबई हायमध्ये *तेल उत्खननाचे काम या कंपन्यांना मिळणार आहे. सध्या* दोनच ठिकाणी तेल काढण्याचे कॉंट्रॅक्ट दिले गेले असून, आणखी सात ठिकाणी असे कॉंट्रॅक्ट पाश्चात्य खाजगी कपन्यांना दिले जाणार आहे. शिवाय 'सागर सम्राट 'ला कुमक म्हणून 'तरसा ' हे जहाजही अमेरिकेकडून मिळवायचा प्रयत्न चालू आहे. म्हणजे 'सागर सम्राट 'वरचा प्रचड खर्च पाण्यात जाणार की काय अशी भिती वाटू लागली आहे. 'सागर सम्राट ' आणि एतद्देशीय साधन सामुग्री व मनुष्यबळ यांच्या जोरावर स्वत.च उत्खनन पूर्ण करून तेलाबाबत स्वावलबी बनण्याच्या वल्गना पोकळच ठरल्या आहेत म्हणायचे ! परदेशी खाजगी कपन्यांनाच कॉंट्रॅक्ट्स द्यायची होती, तर ६० साली तेलाच्या साठ्यांचा शोध घेतल्यानतर तब्बल चौदा वर्षे थांबायचे कारणच काय होते ? आणि मग 'सागर सम्राट 'चा भला मोठा घोळ तरी कशाला ? त्याऐवजी तेव्हाच कत्राटे दिली असती तर, आजच्या तेलटंचाईच्या काळात देशाच्या हातात जगाच्या नाड्या आवळण्याची ताकद आली असती !

ह्या खेरीज, राजकीय दृष्टयाही ह्या नव्या घडामोडीचा अर्थ नीट तपासून घेतला पाहिजे. अरबानी दाखवलेल्या हिसक्यानतर साहजिकच अमेरिका नव्या तेल साठ्याचा शोध करीत होती. भारताच्या रूपाने ती सधी अमेरिकेला मिळत आहे. तेल उत्खनन व तरसा जहाजाच्या मोबदल्यात अमेरिका तेलविषयक काहीच अपेक्षा बाळगीत नसणे शक्य नाही. काही अटी अमेरिकेच्या असतीलच. त्यामुळे आम्ही कितपत गुतून पडत आहोत हे तपासले पाहिजे. 'दिगो गार्शिया 'ला मुबई जवळून तेलाचा पुरवठा करणे केव्हाही सोयीचे ठरेल. अमेरिकेची तशी अट नसेलच असे म्हणता येणार नाही. राष्ट्रीय दृष्टया हाही प्रश्न गभीर आहे, महत्त्वाचा *आहे. त्यासंबंधात शकाकुशकाचे मोहोळ* उठण्यापूर्वीच, शासनाने जनतेला विश्वासात घेतले पाहिजे. हे असे करार करून, तेलासारख्या महत्त्वाच्या पदार्थाच्या उत्खननानी कत्राटे पाश्चात्य राष्ट्राना देणे का भाग पडल हेही जनतेला समजणं आवश्यक आहे !

गुजराथ धगधगतो आहे. बिहार पेटला आहे. रेल्वे सपामुळे देशातच गभीर पेचप्रसग निर्माण झाला आहे. देशात चालू असलेल्या ह्या समर प्रसगाच्या काळातच, तेलासबधीच्या ह्या दोन महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत. साहाजिकच, ह्या दोन्ही बातम्यांकडे बहुतेकांचे दुर्लक्षच झाले आहे. परंतु ह्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होऊ देणे राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने अनर्थकारक आहे. तेव्हा किमान विरोधी पक्षानी तरी, शासनाकडून ह्या दोन बातम्यासबधात खुलासा करून *घ्यायला हवा. खुलासा समाधानकारक नसल्यास त्याविरुद्ध जनमत* तयार करणे आवश्यक आहे. तेलाच्या या प्रश्नात राष्ट्राची मानहानी तर आहेच आहे, पण त्याचबरोबर आज जी देशभर जनतेची आदोलने सुरू आहेत त्यांचाही कधी दूरान्वयाने, कधी जवळून ह्या तेलसमस्येशी सबध पोचतोच ! चुकीच्या नियोजनामुळे चालू जागतिक तेल सघर्षात पस्तावण्याची पाळी आली आहे. आज पुन्हा सधी आहे. आज जर शासनाचे पाऊल ह्या तेलासबंधात योग्य दिशेने पडू शकले नाही, तर उद्या पुन्हा पस्तावायची पाळी येईल. त्यावेळी कदाचित् पस्तावण्याची देखील सधी मिळणार नाही ! व त्याची जबाबदारी शासनाइतकीच विरोधी पक्षावरही राहील ! म्हणूनच, ह्या महत्त्वाच्या प्रश्नांवर शासनाने जनतेला विश्वासात *घेणे जितके आवश्यक आहे तितकेच, विरोधी पक्षीयानी,* आमदार, खासदार, पुढाऱ्यानी जनतेला ह्या प्रश्नावर शिक्षित करणेही महत्त्वाचे आहे ! ! !

☐ ☐


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणाची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

# सोलकढी

## □ 'सुगंधी कट्टा' आणि डॉ. श्रीराम लागू

डॉ. श्रीराम लागू हे बऱ्यापैकी नट आहेत हे सर्वांना ठाऊक आहे मी त्यांना 'बऱ्यापैकी' म्हणतो ते माझ्या सोयीसाठी. कारण 'बऱ्यापैकी' हे एकूणच सोयिस्कर विशेषण आहे : म्हणजे असे की देशकाल-परिस्थितीप्रमाणे 'बऱ्यापैकी'ला 'चांगल्या-पैकी' किंवा 'वाईटपैकी' असा अर्थ देणे आपल्याला शक्य होते. (शिवाय त्याचा 'बऱ्यापैकी' हा उंबरठ्यावरचा अर्थ हातचा असतोच.) आणि मराठी नाट्यव्यवहारात वापरायचे असेल तर देशकालपरिस्थितीचे भान ठेवणे इष्ट असते, बेभानपणी दगाफटका होण्याचा संभव असतो. असो.

डॉ. श्रीराम लागू गेली वीस वर्षे मराठी रंगभूमीवर टिकून आहेत. आधी ते पुण्याच्या 'प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन' या हौशी रंगभूमीवर भूमिका करीत होते, काही काळ ते मुंबईच्या 'रंगायन' या संस्थेच्या हौशी रंगभूमीवर वावरले. आणि मग त्यांनी अकस्मात व्यावसायिक रंगभूमीत (!) उडी घेतली किंवा त्यांनी व्यावसायिक रंगभूमीला वाहून घेतले. एक सोडून दुसरे काही करणारी आपल्याकडची मंडळी त्या दुसऱ्यात उडी तरी घेतात किंवा त्याला वाहून तरी घेतात. श्री. श्रीराम लागूंनी डॉक्टरकी सोडली आणि ते नटनाटकी करू लागले.

सुरुवातीला चांगलीच धांदल झाली. डॉ. श्रीराम लागू काही मादक सौंदर्याचे ॲटमबॉंब नव्हते. ते आहेत म्हणून नाटके चालतील अशी परिस्थिती नव्हती. (ते आहेत म्हणून नाटके चालणार नाहीत, अशीही परिस्थिती नव्हती.) डॉक्टरांची अभिनयशैली व्यावसायिक रंगभूमीला साजेशी नाही, हा व्यवसाय त्यांना झेपणार नाही, असे ठामठोक निदान करून मंडळी मोकळी झाली... मग अचानक 'नटसम्राट,' 'काचेचा चंद्र,' 'हिमालयाची सावली,' 'पपा सांगा कुणाचे ?' या व्यावसायिक नाटकात डॉक्टरांना भूमिका मिळाल्या आणि ही नाटके यथास्थित चालली. डॉ. श्रीराम लागू हा एक बऱ्यापैकी नट आहे असा बोभाटा झाला. वास्तविक डॉ. लागूंकडे दत्ता भटासारखा कानफाडू आवाज नाही, मधुकर तोरडमलासारखे ठसठशीत आकारमान नाही, श्रीकान्त मोघ्यासारखे संवाद बोलता बोलता-शब्द चावण्याचे कसब नाही, सतीश दुभाषीसारखा खांद्यावरचा अभिनय करण्याचा डोकेबाजपणा नाही, डॉ. काशिनाथ घाणेकरासारखी रोझाना आणि जसबानी अदाकारी नाही. (आम्ही लॉरेन्स ऑलिव्हिए, जॉन गिलगुड, अलेक गिनेस, चार्ल्स लॉटन, पॉल स्कॉफिल्ड इत्यादी पाश्चिमात्य नटसम्राटांचा अभिनय पाहिलेला नाही, तेव्हा त्यांच्यासारखे काय डॉ. श्रीराम लागूंकडे नाही ते आम्ही सांगू शकत नाही. त्याचप्रमाणे आम्ही आपल्याकडच्या काही दिवंगत नाट्यगंधर्वांचीसुद्धा साक्ष काढू इच्छित नाही. कारण दिवंगत नट हा जिव(ग)त नटापेक्षा मोठाच असतो अशी आमची श्रद्धा आहे.) मग डॉ. श्रीराम लागूंकडे आहे तरी काय ? या प्रश्नाचे नेमके उत्तर देण्याचा डौल आम्हास आणता आला असता तर या महाराष्ट्रदेशी आम्ही जाणकार नाट्यसमीक्षक (ही पुनरुक्तीच) म्हणून मान्यता पावलो नसतो काय ? आम्ही खुलासपणे एवढेच म्हणू शकतो की डॉ. श्रीराम लागू एक बऱ्यापैकी, यशस्वी नट आहेत. (प्रत्येक यशस्वी नट बऱ्यापैकी असतो, या सूत्रात आणि वरील वाक्यात जो फरक आहे तो चाणाक्ष वाचक जाणतीलच. असो.)

त्यांनी नटवलेली नाटके धूमधडाकून चालली. त्यांचे शतकमहोत्सव साजरे झाले. डॉ. श्रीराम लागूंचे सत्कार झाले (त्या निमित्ताने झालेल्या मानापमान नाटकातले प्रवेश नियतकालिकातून झळकले.) नाटक संगीत अकादमीचे पारितोषिक त्यांना मिळाले. पद्मश्री लाभली. नाटकाच्या जाहिरातीत बाकीच्या नटवर्गाची नामावळी संपली म्हणजे 'आणि' असे म्हणून डॉ. श्रीराम लागूंचा उल्लेख होऊ लागला. इतकेच नव्हे तर त्यांना चित्रपटातून भूमिका मिळाल्या. मराठी आणि हिंदीसुद्धा. चित्रपटातून भूमिका मिळणे हा मराठी रंगभूमीवरील नटाच्या यशाचा निखालस बिनतोड पुरावा होय.

व्ही. शांताराम यांच्या 'पिंजरा' चित्रपटातले गुरुजी, ही डॉ. श्रीराम लागूंची या नव्या कलामाध्यमातली पहिली भूमिका. 'पिंजरा' इतका चालला की शांताराम बापूंनी त्याची हिंदी आवृत्ती काढली. ती महाराष्ट्राबाहेर प्रसृत होऊन तिचे बरे चालले आहे, अशी वार्ता आहे. आता 'सुगंधी कट्टा' हा डॉ. श्रीराम लागूंची भूमिका असलेला मराठी चित्रपट महाराष्ट्रात दाखल होऊन गर्दी खेचीत आहे. डॉ. लागूंची भूमिका असा एकवचनी उल्लेख मी केला खरा, पण या चित्रपटात ते एकापेक्षा अधिक भूमिका अथवा वेषांतर करतात, आणि चित्रपट चालू असताना आणि सुटल्यावर त्यांनी कोणकोणत्या भूमिका केल्या यावर प्रेक्षकांचे बारीक संशोधन चाललेले असते.

'कट्टा'कारांना हे अपेक्षित असावे. मी असे ऐकले आहे की डॉ. श्रीराम लागूंनी केलेल्या एकानेक भूमिका अचूक ओळखण्याची एक स्पर्धा लावण्यात येणार आहे. तसे झाले तर बऱ्यापैकी करमणूक उडेल. कारण स्पर्धेचा ताण मनावर नसेल तर डॉ. लागूंनी केलेल्या भूमिका ओळखणे जड जाऊ नये, पण स्पर्धेचा ताण मनावर असेल तर मात्र चित्रपटातल्या सगळ्याच्या सगळ्या भूमिका डॉ. लागूंनीच केल्या असण्याची शक्यता गृहीत धरून चित्रपट पाहिला जाईल. त्यामुळे डॉ. श्रीराम लागूंनीच जयश्री गडकरच्या नावाने सुगंधाची आणि– किंवा सरला येवलेकरच्या नावाने चांभाराच्या सुनेची भूमिका केली आहे, असे म्हणणारे काही डोळस प्रेक्षक निघाले तर मला थोडेसुद्धा आश्चर्य वाटणार नाही.

चित्रपटात एका नटाने–नटीने एकापेक्षा अधिक भूमिका करणे ही गोष्ट नवीन नाही आणि दुर्मिळही नाही. याच महिन्यात प्रकाशित झालेल्या 'नया दिन नयी रात' या हिंदी चित्रपटात संजीवकुमार हा नट तब्बल ९ भूमिका करून राहिला आहे. एका जुन्या इंग्रजी चित्रपटात अलेक गिनेसने अशाच आठ भूमिका केल्या होत्या. एखाद्या नाटकात सुद्धा, झटपटवेषांतराने, एक नट अधिक भूमिका करून जातो.

'सुगंधी कट्टा' हा चित्रपट बऱ्यापैकी चालायला हरकत नाही, तो न चालायलाही तशी हरकत नाही.

१९५९ साली डॉ. श्रीराम लागूंना एका मराठी चित्रपटात जयश्री गडकरबरोबर भूमिका करायची संधी आली होती. ती त्यांनी गमावली होती. आज पंधरा वर्षांनी जयश्री गडकरला 'सुगंधी कट्टा' या चित्रपटात डॉ. श्रीराम लागूबरोबर भूमिका करायची संधी मिळाली. ती तिने गमावली नाही.

—अनंतराव

# अणुस्फोटाने दिलेले आव्हान

वा. दा रानडे


भारताने पहिला अणुस्फोट करून या क्षेत्रातील बड्या राष्ट्रांची मक्तेदारी मोडली. प्रत्येक भारतीयास अभिमान वाटावा अशीच ही घटना आहे. पण त्याचे जगात उठलेले पडसाद आणि संभाव्य परिणाम विचारात घेण्यासारखे आहेत. शांततामय उपयोगासाठीच ही अणुचाचणी आम्ही केली असे भारताने कितीही सांगितले तरी जगातील राष्ट्रे त्याबद्दल साशंक आहेत असे त्यांच्या प्रतिक्रियावरून स्पष्टपणे दिसून आले.

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस अमेरिकेने जपानवर टाकलेले दोन अणुबाँब आणि नंतर इतर राष्ट्रांनी निरनिराळ्या केलेल्या चाचण्या याची खरी झळ कोणाला सोसावी लागली असेल तर ती जपानला. तेव्हा भारतीय अणुस्फोटाबद्दल जपानने निषेध व्यक्त केला असेल तर ते स्वाभाविक आहे. पाकिस्तानचा आरडाओरडाही अपेक्षितच आहे पाकने सेंटोच्या मध्यवर्ती करार संघटनेच्या बैठकीत हा प्रश्न उपस्थित केला पण सेंटो आपल्या पत्रकात भारताचा निषेध करील ही त्याची अपेक्षा मात्र सफल झाली नाही. भारतीय अणुस्फोटाने निर्माण झालेल्या परिस्थितीचा नव्याने विचार केला पाहिजे एवढेच पत्रकात म्हटले आहे. जिनिव्हा येथील शस्त्रकपात बैठकीतही पाकने हा प्रश्न नेला व यूनोपुढेही नेण्याचा विचार बोलून दाखविला पाकलाही आता अणु चाचणी करावी लागेल असे पाकच्या नेत्यांनी सांगितले. ही संधी साधून अमेरिका व चीनकडून अधिक शस्त्रास्त्रे मिळविण्याचा प्रयत्न तर पाक करीलच पण या राष्ट्राच्या तांत्रिक मदतीने पाकिस्तानही अणुस्फोट करण्याच्या मागे लागेल. पाकची ही चाचणी सरळ सरळ लष्करी उद्देशाने असेल. अमेरिकेकडे अणुछत्राची मागणी पाकने केली पण तेवढ्यावर समाधान न मानता स्वतः अण्वस्त्रे तयार करण्याची पाकची धडपड राहील. भारतीय उपखंड व त्याला लागून असलेल्या आसपासच्या देशात भारत प्रबळ शक्ती बनणे व त्याची प्रतिष्ठा वाढणे पाकप्रमाणेच अमेरिका व चीनला सहन होणार नाही. तेव्हा सत्तासमतोल राखण्यासाठी ते पाकला याबाबतीत मदत करतील. शांततामय उपयोगासाठीच अणुस्फोटाचा वापर करावा अशी भारताची कितीही इच्छा असली तरी पाकिस्तानने लष्करी उद्देशाने अणुस्फोट केला किंवा आपल्या प्रदेशात अमेरिका-चीनला अण्वस्त्र तळ दिले तर भारताला संरक्षणाच्या दृष्टीने अणुबाँब व इतर अण्वस्त्रे तयार करणे भाग पडेल.

भारताच्या अणुस्फोटाबद्दल अमेरिकन सरकारपेक्षाही अमेरिकन वृत्तपत्रांची प्रतिक्रिया अधिक कडक होती. अमेरिकन सरकारच्या निवेदकाने खेद व्यक्त केला. भारताला दिलेली अणुछत्राची हमी आम्ही काढून घेऊ अशी धमकी सेंटो करार राष्ट्राच्या बैठकीत अमेरिकेचे केनेथ रश यानी दिली. त्यांच्या या विधानाबद्दल भारतीय गोटात आश्चर्य व्यक्त करण्यात आले. कारण अणुछत्राची मागणी भारताने अमेरिकेकडे कधीच केलेली नाही व अमेरिकेनेही ती दिलेली नाही तेव्हा न दिलेली हमी काढून घेण्याचा प्रश्नच येत नाही. १९६८ साली झालेल्या अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर स्वतःजवळ अण्वस्त्र नसलेल्या ज्या राष्ट्रांनी सह्या केल्या त्याना अणुछत्राची हमी अमेरिकेने दिली आहे भारताने या करारावर सही केलेली नाही. 'अन्नासाठी जगभर भिक्षेचा कटोरा घेऊन हिंडणाऱ्या राष्ट्राने अणुस्फोट केला' अशा शब्दात 'न्यूयॉर्क टाइम्सने' भारताची हेटाळणी केली. अमेरिका व पाश्चात्य राष्ट्राकडून भारताला होणारी आर्थिक मदत कमी होण्याचा किंवा बंद होण्याचाही संभव आहे. भारतावर हे दडपण आहे पण या दडपणापुढे मान न तुकविता भारताने धान्याच्या बाबतीत शक्यतो लवकर स्वावलंबी बनले पाहिजे. धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण व्हावयाचे आणि अणुचाचणी कार्यक्रमही पार पाडावयाचा ही दुहेरी जबाबदारी पेलणे भारताला आर्थिकदृष्ट्या फार कठीण जाईल पण ते अशक्य नाही. आपल्या आर्थिक व्यवहाराना निर्धारपूर्वक शिस्त लावून सर्व प्रकारची उधळपट्टी, काळाबाजार, लाचलुचपत पूर्णपणे नष्ट करणे, चैनीच्या वस्तूवरचा खर्च काही वर्षे अजिबात थांबविणे या गोष्टी आपण करू शकलो तरच ही जबाबदारी आपण पेलू शकू त्यासाठी आवश्यक असलेली मनोवृत्ती, शिस्त आणि निष्ठेने परिश्रम करण्याची तयारी आपल्या समाजाची आहे काय, हा खरा प्रश्न आहे. स्वातंत्र्यानंतरचा गेल्या सत्तावीस वर्षाचा कारभार या दृष्टीने निराशाजनक आहे. निरनिराळ्या क्षेत्रात हिमालया एवढ्या उंचीच्या कर्तृत्ववान व्यक्तीची वाण आपल्याकडे नाही. पण केवळ काही व्यक्तीच्या कर्तृत्वाने व पराक्रमाने राष्ट्र मोठे होत नसते. त्यामागे सर्वसामान्य नागरिकाच्या संघटित कार्यशक्तीचे पाठबळ उभे करावे लागते. असे पाठबळ गेल्या सत्तावीस वर्षात आपण उभे करू शकलो नाही हे आपले मोठे अपयश आहे. याबाबत केवळ सत्तारूढ नेतृत्वाला दोष देऊन भागणार नाही दोष व उणीवा सबंध समाजाच्या आहेत. त्या दूर करण्यासाठी सर्वच क्षेत्रात निर्धारपूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत अणुस्फोटाच्या यशस्वी चाचणीनंतर ज्या नव्या कालखंडात आपण प्रवेश केला आहे त्याची आव्हाने स्वीकारण्यासाठी या दिशेने प्रयत्न आपणास करावे लागणार आहेत.

भारतीय माणूस परंपरेने व्यक्तिनिष्ठ आहे. व्यक्तीचे कर्तृत्व व चारित्र्य यावर आपल्याकडे जेवढा भर देण्यात आला तेवढा सामाजिक जाणीव, सामाजिक कर्तव्ये, सामाजिक जबाबदाऱ्या यावर देण्यात आला नाही. अनेक शतकांचा हा दोष एकदम घालविता येणार नाही हे खरे पण तो दूर करण्याच्या बाबतीत आणखी विलंब उपयोगाचा नाही. नवी आव्हाने पेलणाऱ्या समर्थ राष्ट्राची उभारणी त्याशिवाय होणार नाही. हे आव्हान आपणास स्वीकारलेच पाहिजे.

□ □



# हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा

प्रभाकर पेंढारकर

नुकताच सूर्योदय होत होता. आम्ही किनाऱ्यावर पोहोचलो. अलिबागच्या किल्ल्याभोवती अद्यापही लाटा उसळत होत्या. भरती असावी. दीड दोन तास थांबल्यावाचून गत्यंतर नव्हतं. आम्ही किनाऱ्यावर वाळूत बसून राहिलो.

शिकारी प्रमाण चित्रपटाचं शूटिंग हा देखील एक 'पेशन्स'चा खेळ आहे. दोन तास होऊन गेले तरी पाणी ओसरेना. उन्हं वाढू लागली. चटके बसू लागले. आमचा धीर संपत चालला.

आणखीन अर्धा एक तास गेला. मग कॅमेरा, रिफ्लेक्टर्स काशीनाथ व वारीकन डोक्यावर घेतले. प्रत्येकानं पँट दुमडली. ओसरू लागलेल्या पाण्यातून आम्ही चालत निघालो. किल्यावर पोहोचलो.

किल्यात एक दोन पडकी घरं आणि दोन देउळ. देवळाजवळच्या पर्णहीन चाफ्यावर पांढरीशुभ्र फुलं फुलली होती.

श्री. बाबासाहेब पुरंदरेंनी सांगितलं होतं, 'किल्यावर दोन सुसरीचं उत्तम शिल्प कोरलेलं आहे. गणपती आणि कमळ आहेत. सुसरी हे सागरी सत्तेचं प्रतीक. त्याचे शॉटस अवश्य घ्या.'

किल्यावर खूप शोधलं. तेथेच रहाणाऱ्या लोकांना विचारलं. असं असं काही शिल्प आहे असं तेथल्या कोणाही माणसानं ऐकलं देखील नव्हतं. 'सुसरी नदीत असतात, समुद्राच्या खाऱ्या पाण्यात कोठल्या?' असा एकानं आम्हाला रोकडा सवालही केला.

पश्चिमेला सागराभिमुख एक दरवाजा आहे. त्या दरवाजाच्या बाहेरील बाजूस ह्या अप्रतीम कोरलेल्या सुसरी अचानक दिसल्या. त्यावर धूळ आणि गवत साचलं होतं ते शिडी आणून साफ केलं. वेड्यावाकड्या दगडावर कॅमेरा म्हात्रेंनी लावला. शॉटस मनाजोगे मिळाले. पाण्यातून आल्याचं सार्थक झालसं वाटलं.

ह्या सुसरीवर परत धूळ साचेल. इतकं अप्रतिम शिल्प इथं आहे हे परत कोणाच्या लक्षातही येणार नाही पण त्याला इलाज नाही. इतिहासाचा अवास्तव अभिमान आणि त्याबद्दलची पराकोटीची अनास्था ह्यात महाराष्ट्राचा क्रमांक फार वरचा आहे हे अद्याप मला समजायचं होतं. प्रवासाची ही तर सुरुवात होती!

"किल्ल्यावर येणार काय?"

"आज सुट्टी आहे. मोहरमची!"

"कोणीच येणार नाही?"

आम्हाला दिवस फुकट घालवायचा नव्हता. आम्ही नाखव्याच्या गळी पडलो. दोन तासात परत येऊ म्हणून कबूल केलं आणि कसबसं त्याला यायला तयार केलं.

मुरूडचा जंजिरा हा अप्रतीम सागरी किल्ला आहे. केवढाले बुरूज आणि अभेद्य तटबंदी! कलाल बांगडीसारख्या भीती निर्माण करणाऱ्या तोफा. सागरी लाटा आणि वादळ ह्यांना तोंड देऊन गेली साडेतीनशे वर्षं जंजिरा ताठ मानेनं उभा आहे. शिवाजी महाराजांनी जंजिरा जिंकण्यासाठी अनेक प्रयत्न केले. पाण्यासारखा पैसा खर्च केला, खुद्द महाराजांनी जंजिऱ्यावरील मोहिमेची देखरेख केली. पण किल्ला पडला नाही. आग्र्याच्या भेटीत औरंगजेबाकडून हा किल्ला समक्ष मागून घ्यायचा हा महाराजांचा एक उद्देश होता. पण हे राजकारण साधलं नाही.

सगळे प्रयत्न हुकले तरीही महाराजांची जिद्द गडापेक्षाही मजबूत होती. जंजिऱ्यापासून दीडदोन मैलावर असलेलं छोटसं बेट महाराजांनी अचूक हेरलं. तेथे गोड पाणी असल्याची खात्री करून घेतली आणि पहाटेच्या प्रहरी महाराजांनी ह्या बेटावर आपली माणसं उतरवली. ताबडतोब बांधकामाला सुरुवात झाली.

सिद्दी पुरा खवळला बांधकामावर तोफांचे गोळे बरसू लागले. बेटावर येणारी रसद मारली जाऊ लागली. पण चिवट मराठे हालले नाहीत. जिद्दीनं त्यांनी बांधकाम चालूच ठेवलं. सिद्दीच्या दंडा राजपुरीच्या उरावर महाराजांनी दुसरी दंडा राजापुरी बांधून काढली. सगळ्या अडचणी सोसून पद्मदुर्ग तयार झाला सागरावरच्या सिद्दीच्या बेबंद हालचालींना लगाम लागला.

सिद्दीच्या जंजिऱ्यावर जाण्यासाठी होड्यांची खास सोय केलेली आहे. पण ह्या तीर्थस्नान असलेल्या महाराजांच्या पद्मदुर्गावर जाण्यासाठी कस्टमची परवानगी लागते.

पद्मदुर्गावर सगळीकडे पडझड झालेली आहे. आतल्या बाजूस असलेल्या दोन प्रशस्त कुंडात हिरवं शेवाळ साचलं आहे. मंगलोर ते मुंबई मालाची वाहातूक करणारे केरळीय पडाव अद्यापही इथं थांबतात. किल्ल्यावरची झाडं लाकूड फाट्यासाठी हवी तशी तोडतात. कुंडातील पाण्यात कपडे धुतात. वारा सुटला की पुढच्या प्रवासाला निघतात.

"ह्या शिवाजीच्या किल्ल्यावर पाहाण्याजोगं काही नाही." आमचा नाखवा-कम-गाइड आम्हाला माहिती सांगतो आहे.

"खरा रुबाब पहायचा तर सिद्दीच्या जंजिऱ्याचा!"

सिद्दीबद्दलचा अभिमान त्याच्या शब्दातून निथळतो आहे. पण सिद्दीनं जंजिरा घेण्यापूर्वी तो येथल्या कोळ्याच्या राजाचा होता. वादळ झालं म्हणून सिद्दीनं त्या राजाकडं आश्रय मागितला. आपल्या गलबतातील मालाच्या मोठाल्या सदुका उतरवून किल्ल्यात ठेवण्याची परवानगी त्यानं मागितली. रात्री ह्या सदुकातून सिद्दीचे शिपाई बाहेर पडले. विश्वासघात करून सिद्दीनं किल्ला बळकावला. ही माहिती अर्थातच आमच्या मार्गदर्शकाला नाही. ती असायचं कारणही नाही. तो आम्हाला पुढं सांगू लागला.

"शिवा यहाँ आया।
किल्लेपर सिद्दीका अमल था।
शिवाने किल्लेको मुहासिरा किया।
वहोत जंग हुआ,
लेकिन शिवाको किला नही मिला।
उसके बाद शिवा का लड़का आया।
सभाने किलेको घेर लिया।
किलेके अंदर सिद्दी, बाहर सभा।
संभाने आम के पेड़ लगाए।
उन पेडो को आम आगए।
सभाने आम खाये, लेकिन उसको किला नही मिला!"

ह्या सिद्दीचा मुरूडला अद्यापही टोलेजंग वाडा आहे. परवा परवा पर्यंत येथले लोक सणाच्या दिवशी सिद्दीच्या वंशजाच्या दर्शनाला जायचे. त्यांना कुर्निसात करायचे. आफ्रिकेतून आलेल्या, भाषा, संस्कृती, वर्ण ह्या सर्वच दृष्टींनी परकीय असलेल्या आणि येथल्या लोकांवर अनन्वित अत्याचार केलेल्या सिद्दीबद्दल अद्यापही लोकांच्या मनात त्याकाळी भीतीपोटी जन्मलेली स्वामीनिष्ठेची भावना आहे हा मुरूड महाराष्ट्राचाच भाग. येथून स्वराज्याची राजधानी

रायगड शभर मैलही नसेल. येथल्या लोकांना सिद्दीच्या गुलामगिरीतून सोडवण्यासाठी आयुष्यभर लढलेले शिवछत्रपती मात्र येथल्या लोकाना परके. स्वतंत्र भारतातल्या गेल्या पचवीस वर्षातल्या राष्ट्रीय शिक्षणाचा आणि देशाच्या एकात्मतेची लोकाना जाणीव करून देण्याच्या प्रयत्नांचा ह्या मुरूडच्या नावळ्याच्या रूपान साक्षात्कारच घडत होता. ¤

चालत्या गाडीचे दिवे एकदम विझले. मगलसिंगन खरकन ब्रेक दाबून गाडी थाबवली. आजूबाजूला मिट्ट अधार येथून मुख्य रस्ता वीसपचवीस मैल तरी असावा. गाडीच्या बॅटरीत दोष निर्माण झाल्यान दिवे चालू करता येण अशक्य झाल. मगलसिंग नेहमीसारखाच बेफिकीर. त्यानं वाडदेकर आणि भालेरावाना खिडकीत बसायला सागितल. दोघाच्या हातात दोन टॉर्च होते. त्या प्रकाशात आमचा पुढचा प्रवास सुरू झाला.

हा विजयदुर्ग ते कणकवली रस्ता. विजयदुर्गंच काम सध्याकाळी सपल. सागरी किल्ल्यात विजयदुर्ग हा किल्ला अप्रतीम आहे. शिलाहार राजानी तो अकराव्या शतकात बाधला. पण त्यानतर बांधलेल्या कोणत्याही किल्ल्यापेक्षा आजही येथील तटबदी मजबूत होती. किल्ला अभेद्य करण्याइतकच तो सौंदर्यपूर्ण करण्याकडं ह्या शिलाहारानी लक्ष दिलेले असावे. शिलाहारांच्या काळी सिनेफोटोग्राफी होती काय? कदाचित ती असावी, अशी शका येण्याइतपत येथील प्रत्येक कमान, बुरूज, दरवाजे, तटबदी सारे काही कॅमेऱ्याच्या कॉम्पोझिशनसाठी बाधवून घेतल्यासारखे रेखीव आणि सुरेख आहे.

ज्याचे अश्वबळ त्याची पृथ्वी, ज्याचे आरमार त्याचा सागर' असे महाराज म्हणत. ह्या सागरावर पातशाही निर्मिण्यासाठी आणि सिद्दी, पोर्तुगीज, फिरंगी ह्याच्याशी मुकाबला करील असे समर्थ आरमार उभारण्यासाठी महाराजानी ह्या विजयदुर्गाच्या खाडीत आपली गोदी बाधली. मोगल आणि इतर मुसलमान पातशहा मक्का मदिनेसाठी सागरी मार्गाने प्रवास करीत. पण गेल्या सहा-सातशे वर्षांत शिवाजी राजाच्याशिवाय कोणाही भारतीय राजाने आरमाराचे महत्त्व ओळखले नव्हते.

विजयदुर्गाच्या खाडीत महाराजांनी स्वतःच्या कल्पनेप्रमाणे छोट्या पण अत्यत चपळ होड्या बांधवून घेतल्या. ह्या गोदीचे काही शॉट मिळतील तर पाहावेत म्हणून आम्ही मुद्दाम गेलो. सहजतेन कोणाच्या लक्षात येणार नाही अशी अचूक जागा महाराजानी गोदीसाठी निवडलेली आहे. ज्या काळात आत्तासारखे रस्ते नव्हते, वाहतुकीचो साधन नव्हती त्या काळात महाराजाच भौगोलिक ज्ञान आणि त्याचा अत्यत कल्पक उपयोग ह्या गोष्टी खरोखरच आश्चर्यकारक आहेत.

गोदीच्या आजूबाजूला झाडी वाढलेली आहे. गोदीच्या कट्ट्याचे दगड निखळू लागले आहेत. शॉट घेण्यात अर्थच नव्हता. शिवराज्याभिषेकानिमित्त वेगवेगळ्या समारभासाठी काही कोटी रुपये खर्च होणार असल्याच ऐकल. ह्या गोदीजवळ आणि अशा महत्त्वाच्या ऐतिहासिक ठिकाणी त्या त्या स्थळाची माहिती देणाऱ्या पाट्या लावण्याची काही योजना शासनाकडे आहे काय?— माहीत नाही. आज तरी तेथे जी थोडीशी वर्दळ दिसते ती ह्या गोदीशेजारी, झाडीत लावलेल्या हातभट्टीसाठीच! ¤

'चौऱ्याऐंशी बदरात ऐसी उत्तम जागा नाही.' मालवणच्या बदरासमोर सागरात असलेल्या खडकाकडे पाहून हे उद्गार महाराजानी काढले. पोर्तुगीजावर आणि उत्तरेस सिद्दीवर लक्ष देण्यासाठी येथे सागरी किल्ला बाधायच महाराजानी ठरवलं. मालवणच्या एका वृद्ध व जाणत्या ब्राह्मणास बोलावून आणण्याची आज्ञा महाराजानी दिली. महाराजाच बोलावण आलं म्हणून ब्राह्मण आनदला. पण क्षणभरच. कारण महाराज येथून गेले आणि पोर्तुगीज आले तर किल्ला बाधण्याचा मुहूर्त काढून दिला म्हणून ते आपल्याला पोत्यात घालून समुद्रात नेऊन बुडवतील ह्या भीतीने ब्राह्मण यायला तयार होईना. महाराजानी त्याला अभय देऊन सागितल, 'आपण चिंता न करावी. येथे ऐसे लष्कर ठेवतो की पोर्तुगीजाची आपणाकडे डोळा वर करून पाहण्याची हिंमत न व्हावी.'

ब्राह्मणाने मुहूर्त काढून दिला. किल्ला बाधायला सुरुवात झाली. तो बाधून पुरा झाला तेव्हा महाराजांनी ब्राह्मणास किल्ल्यावरील देवळाच उपाध्येपण सन्मानपूर्वक देऊ केलं.

हे उपाध्येपण म्हणजे मोठी जबाबदारी. किल्ला उपाध्यायाला आणि किल्लेदाराला कधीही सोडता येत नाही. ब्राह्मणान जबाबदारी स्वीकारली. मूलबाळ नसल्यानं त्यानं भावाचा मुलगा आपलाच समजू वाढविला होता. त्या मुलासह, मुलाच्या पत्नीसह तो ब्राह्मण किल्ल्यावर रहायला आला.

पुढ त्या ब्राह्मणाच्या मृत्यूनतर उपाध्येपण पुतण्याकड आल. शिवाजीराज्याच्या नतर सभाजी राजे गादीवर आले. खासा अवरगजेब दक्षिणेत उतरला. सभाजी राजांच्या मृत्यूनतर राजाराम राजे जिंजीला गेले. महाराष्ट्रात उलथापालथ झाली. मोगली आरमाराचा वेढा सिंधुदुर्गास पडला.

किल्लेदार ब्राह्मणाकडे आला. म्हणाला, 'आम्ही किल्लेदार, आम्हाला येथे राहणे क्रमप्राप्त! आपली बायका-मुल गडावर. तुम्हां सर्वांना जमिनीवर गुपचूप नेऊन सोडतो. तुम्हा सर्वांचा जीव धोक्यात न घालणे. इथ न राहणे'

ब्राह्मणान नकार दिला. काही महिने उलटले. वेढा सख्तच होता. किल्यावर दुधाचं दुर्भिक्ष. ब्राह्मणाच्या मुलाचे हाल होत. त्यातच किल्यावरचा तादूळ सपत चालला. ब्राह्मणाच्या मुलाची उपासमार होऊ लागली. ब्राह्मणाला किल्लेदारान परत किल्ला सोडसोडण्याची विनती केली. ब्राह्मणान परत एकदा नकार दिला.

किल्ल्यावर पटकी सुरू झाली. त्यात ब्राह्मणाचा लहान मुलगा वारला. हे समजताच किल्लेदार ब्राह्मणाला भेटावया गेला. सागू लागला. 'माझ ऐका. किल्ला सोडा. ब्राह्मण स्तब्ध उभा होता. इतक्यात मुलाच्या मृत्यून डोळ्यातून पाझरणारे अश्रू पुसून ब्राह्मणाची पत्नी किल्लेदारासमोर आली. रागानं म्हणाली. 'कैलासवासी थोरल्या महाराजानी माझे मामजीवर किल्ल्याचे उपाध्येपण सोपवले. त्यानी ते स्वीकारले. आता थोरले महाराज नाहीत आणि माझे मामजीही नाहीत. म्हणून काय आम्ही आमचेवर सोपवलेली जबाबदारी विसरू?

स्वर्गातून पहात असलेले थोरले महाराज आणि मामजी आम्हाला काय म्हणतील ?

—अशी माणसे निर्माण होतात तेव्हा आपत्तीतही राष्ट्र टिकून राहते. कारण राष्ट्राचे चारित्र्य अशा सामान्य माणसाच्या त्यागावर घडत असते.

सिंधुदुर्गात हिंडताना ह्या किल्लेदाराचे घर आणि ब्राह्मणाची वास्तू कोठे दिसते काय हे मी शोधीत होतो. आज सिंधुदुर्ग म्हणजे सागरातल्या एका प्रचंड काळ्या खडकावरील ढासळणारे बुरूज, दोन-तीन देऊळे आणि पाण्याच्या विहिरी एवढच उरल आहे. ह्या दगडमातीचा हव्यास नाही. त्याची जपणूक करण्यासाठी सामान्याच्या आजच्या निकडीच्या गरजा थांबवून ह्या कामावर पैसे खर्च करण्याची जरूरी नाही. आजच्या आधुनिक जगात सिंधुदुर्गाचीच काय, त्या किल्लेदाराची किंवा त्या ब्राह्मणाची काडीमात्र आवश्यकता नाही. आवश्यकता आहे फक्त त्या तेजस्विनी सिंधुदुर्गाच्या सुनेच्या तडफेची, निष्ठेची ! आणि ती निर्माण करणाऱ्या शिवशक्तिची ! अशा सुना घरोघरी निर्माण होतील तर शेजारची राष्ट्रेच काय, जगातील कोणतीही शक्ती भारताकडे वाकडा डोळा करून पाहू शकणार नाही. छाब आणि खेमकरण विभागातल्या पवित्र भूमीवर शत्रूचे पाऊल पडणार नाही आणि हिंदी महासागराच्या लाटावर भारतीय आरमाराशी मुकाबला करण्याचे साहस सातवे आरमारही करणार नाही. ◻

"शिवराज्याभिषेकाच्या त्रिशतसावत्सरिक समारभाकरता ही फिल्म तयार होत आहे. शिवरायांचा उत्तम राज्य कारभार आणि सामाजिक न्यायाकरिता लढा ह्या फिल्ममध्ये प्रकर्षानं दिसावा ही सरकारची इच्छा आहे. त्या दृष्टीनं गोव्यामध्ये शूटींगसाठी आपण काही स्थळे सुचवू शकाल काय ?

इतिहासाचा गाढा व्यासग असणाऱ्या डॉ. गुणेना मी विचारल.

"तुम्ही नार्व्याला गेलात ? नाही ? अवश्य जा. तिथल्या सप्तकोटीश्वराच्या देवळाचा जीर्णोद्धार स्वत: महाराजानी केलेला आहे. देवळावर महाराजाचा शिलालेख कोरलेला आहे."

मी आणि युनिट मॅनेजर पेठे एकमेकाच्या तोंडाकडे पाहू लागलो. आम्हाला वेगळीच माहिती हवी होती.

महाराजांनी बारदेशावर केलेली स्वारी पूर्णांशान सफल झाली नाही. व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या पोर्तुगीजांचा ह्या भूमीवर आपला धर्मप्रसार करण्याचा आणि सत्राज्य स्थापण्याचा हेतू शिवाजी महाराजाजी नेमका ओळखला होता. सातासमुद्रापलिकडून येणाऱ्या युरोपियनाचा ह्या देशाला खरा धोका आहे हे त्या द्रष्ट्या पुरुषाने तेव्हाच जाणले होते. म्हणून बारदेशाची मोहीम फसली तरी महाराजाना गोव्यात वेळ साधून क्रातिकारक उठाव करण्यासाठी आपली माणसे ठेवली होती. पण पोर्तुगीज गव्हर्नरला त्याचा सुगावा अगोदरच लागला. मराठी वकीलाच्या थोबाडीत त्याने भर दरबारात ठेवून दिली आणि त्याला आणि त्याच्या लोकाना गोव्याबाहेर हाकलले.

ह्या नाट्यपूर्ण घटनेसंबंधी काही माहिती डॉ. गुणे सागतील, जेथे तो प्रसग घडला त्या दरबाराची जागा दाखवतील ही आमची अपेक्षा होती. डॉ. गुणेनी सागितला सप्त कोटीश्वराचा जीर्णोद्धार !

महाराजानी हिंदु देवळाचा जीर्णोद्धार केला ही गोष्ट सहाजिकच होती. सरकारी फिल्ममध्ये शिवाजी राजे निधर्मी होते ते लोकाना सागण्याबद्दल सूचना होत्या. शिवाजी राजानी मशिदीला देणग्या दिल्या त्या मशिदीचे शॉटस् आवश्यक होते. गोव्यात एखाद्या चर्चचा महाराजानी जीर्णोद्धार केला असता तर महत्त्वाची घटना होती.

माझी अडचण मी डॉ. गुणेंना सागितली. प्रयत्नपूर्वक आवाज शांत ठेवीत ते म्हणाले, "'निधर्मी राज्य' हा आत्ताचा शब्द प्रयोग. ही कल्पनाच मुळी परकीय. तीनशे वर्षापूर्वी धर्माचा पगडा लोकांच्यावर विलक्षण होता. त्या काळावर आत्ताच्या कल्पना लादणे ही गोष्ट कितपत सयुक्तीक आहे ?"

'शिवाजीराजाचे जीवनापासून आज आपण काय बोध घेऊ शकतो हे सागण्यासाठी तर ही फिल्म करायची आहे. एरवी तीनशे वर्षापूर्वी होऊन गेलेल्या शिवाजीराजाच्यावर आज फिल्म करण्याचे प्रयोजन काय ?' मी त्यांना सरकारी सवाल टाकला.

डॉ. गुणे म्हणाले, 'हे हिंदवी स्वराज्य व्हावं असे श्रींच्या मनात फार आहे.' असं शिवाजी राजे म्हणत. ती त्यांची प्रेरणा होती.

श्रीचे राज्य म्हणजे देवाचे राज्य, धर्माचे राज्य !

हिंदू धर्म परमसहिष्णू आहे. धर्मराज्य व्हावे म्हणजे प्रत्येकाला आपापला धर्म अनुसरण्याचे स्वातंत्र्य असावे, ही कल्पना त्यात होती. हे स्वातंत्र्य अवरंगजेबाच्या राज्यात नव्हते. शिवाजी राजांच्या राज्यात होते. त्या दृष्टीने खऱ्या अर्थी शिवाजीराजाचे राज्य हे निधर्मी होते. मात्र ह्याचा अर्थ असा नव्हे की ते धर्मविरोधी होते वा धर्मनिरपेक्ष होते. इतर धर्मीयाना कोणतीही किंमत देऊन खूश ठेवण्याचा प्रकार, म्हणूनच शिवाजीराजाच्या राज्यात नव्हता.'

डॉ. गुणे उठले. गोव्याच्या नकाशासमोर उभे राहिले. नार्वे गावाकड बोट दाखवून सांगू लागले.

'हे नार्वे. मधली खाडी ओलाडली की पलीकडच्या बाजूस जुन गोवं आहे. इथं पोर्तुगीजाची धर्मसत्ता होती. मोठमोठी चर्चेस इथच आहेत. इन्क्वीझिशनच्या नावाखाली लोकांचा इथं भयानक छळ होई. गोव्याचे फिरगाण करण्याचे पद्धतशीर प्रयत्न इथ चालू होते.

त्याला पायबद घालण्यासाठी, खाडी पलीकडच्या सप्तकोटीश्वराचा जीर्णोद्धार करण्याच महाराजानी ठरवल. ह्या जीर्णोद्धाराचा व्यापक अर्थ लक्षात घ्या.

इस्लामधर्मियांनी आणि ख्रिश्चन लोकानी आपली राज्यसत्ता बळकट करण्यासाठी धर्माचा आधार व कायदा घेतला. लोकाना बाटवण्यामाग आपल्या धर्मप्रसाराइतकाच ते आपल्या राज्यसत्तेला प्रामाणिक रहावेत हा राजकीय हेतू होताच.

शिवाजीराजानी मुसलमानाना हिंदू केल नाही. पण बळजबरीन मुसलमान केलेल्या हिंदूना त्यानी आपल्या धर्मात परत जागा दिली.

देवळाचा जीर्णोद्धार करण्यामागं तेथल्या ब्राह्मणास पळीपचपात्र घेऊन पूजाअर्चा करण्याची व दक्षणा गोळा करण्याची सोय व्हावी हा उद्देश नव्हता. देवळाभोवती सस्कृती वाढते. कला फुलते. समान विचाराचे लोक दुरून एकत्र येतात. विचाराची देवघेव

होते. सामाजिक जीवनाचा पाया तयार होतो.

अजठा-वेरूळ येथील शिल्पकला, मदुराईची मूर्तिकला देवळाच्या परिसरातच निर्माण झाली. कथकलीचे मृदग केरळातल्या देवळातच घुमतात आणि आजही सनईचे सूर प्रात.काळी काशीविश्वेश्वराच्या मदिरात ऐकू येतात.

महादेवाची मदिरं साऱ्या देशभर आहेत. पण गोव्यात येऊन पोर्तुगीजाच्या सत्तेला आव्हान देऊन ह्या छोटयाशा देवळाचा जीर्णोद्धार करण्यामागं शिवाजीराजांचा हा दृष्टिकोन होता. आणि तोच आजही महत्त्वाचा आहे !'

आम्ही उठलो. येथून आम्ही नार्व्याला जाऊ. तेथल्या देवळाचे शॉटस घेऊ. पण ह्या देवळाला फिल्ममध्ये स्थान राहील काय ह्याबद्दल मी साशक आहे ! ¤

सिद्दी जौहर हा खरोखरच अत्यंत कर्तबगार सेनानी होता. दूरदृष्टी, शौर्य, चिकाटी, कडक शिस्त, जे जे काही उत्तम सेनापतीचे गुण असतात, ते सर्व सिद्दी जौहरच्या अंगी होते. ह्या शिवाय त्याच्या मागं विजापूरची प्रबल व अनुभवी सेना होती. भरपूर पैसा आणि साधनसामुग्री होती.

ह्या उलट स्थिती स्वराज्याची होती. सैन्य अपुरं, इतर साधनसामुग्रीचा अभाव, अफझलखानाच्या फौजेशी झालेल्या युद्धानतर सतत चाललेल्या चढाईन थकलेली माणस, बाहेरून कसलीही मदत येण्याची शक्यता नाही, त्यातच भर म्हणून दिल्लीहून बलाढ्य मोगल फौज घेऊन शास्ताखान पुण्यात दाखल झालेला. ह्या बिकट परिस्थितीत महाराज अविचल होते. त्याची प्रत्येक हालचाल ही पूर्व नियोजित, अत्यत सावध आणि सर्व संभाव्य अडचणीची दखल घेऊन केलेली होती. अवघ्या तिसाव्या वर्षी त्यांचं युद्ध नेतृत्व जगातील कोणाही श्रेष्ठ सेनानीच्या तोडीचे होते.

पन्हाळा ते विशालगड प्रवास मी केला आहे. बराचसा पायी ! बाजी प्रभू देशपांडेनी विजापूरच्या फौजेचा लोंढा स्वत.च्या देहाचा बाध घालून थोपवला ती घोडखिंड मी पाहिली आहे.

आणि ती पहात असताना मनात विचार येत राहिला, ही अशी जिवाला जीव देणारी माणसं महाराजांनी एवढया लहान वयात कोठून मिळवली ? राजे गडावर पोहोचेपर्यंत शरिरावर शेकडो जखमा झाल्यातरी लढत राहिलेले बाजी प्रभू देशपाडे, तानाजी मालुसरे, फिरंगोजी नरसाळा, कान्होजी जेधे महाराजांचा वेश घेऊन आग्र्याला कैदेत त्यांच्या जागी थांबलेला हिरोजी फर्जंद, केवळ सात स्वारानिशी बहलोलखानावर तुटून पडलेला प्रतापराव गुजर, फौलादखानाच्या कैदेत यमयातना सहन करून एक शब्द न उच्चारणारे रघुनाथपत कोरडे आणि त्र्यंबकराव डबीर, इतिहासाला ज्ञात आणि अज्ञात असणारी अशी मंतरलेली शेकडो माणसं ! ह्या माणसांना काय घरेदारे नव्हती ? अशी कोणती मोहिनी शिवाजी राजानी त्यांच्यावर घातली की ज्यामुळे त्यांना स्वत.चा जीव देखील राजांच्या एका शब्दापुढ कवडीमोल वाटावा ?

शिवाजी महाराजाच्या सैन्यात बड झाल्याचा कोठे उल्लेख नाही. महाराज आग्र्याला औरगजेबाच्या अटकेतून निसटून येण्याची तिळमात्रही शक्यता उरली नव्हती तेव्हाही एकही किल्लेदार मोगलास फितूर झाला नाही अथवा एकही मुलकी अधिकारी स्वराज्याची नोकरी सोडून शत्रूस मिळाला नाही.

घोडखिंडीच्या लढाईपेक्षा, अफझलखानाच्या वधापेक्षा मला हे अधिक रोमहर्षक वाटते. ही लोकांची निष्ठा शिवाजी राजानी कशी मिळवली हे मला फिल्ममध्ये दाखवता येईल तर ती फिल्म आजच्या समाजाला अधिक उपयोगी होईल असे मला वाटते.

कारण आज स्थिती अशी की महागाई भत्ता आणि बोनस दिला तरी देखील आठ तास प्रामाणिक काम करणारी माणसे मिळणे कठीण. मग जिवाला जीव देण्याच्या गोष्टी तर बाजूसच राहू देत ! काळाच्या ओघाबरोबर आमच्यातली प्रामाणिकता, कर्तव्यबुद्धी आणि कामाविषयीची निष्ठा वाहून गेली आहे.

ही निष्ठा शिवकाळात कशी निर्माण झाली होती ? तत्काळीन युरोपीयन अधिकारी कास्मोडा गोर्डा म्हणतो,' ह्या शिवाजी राजावर लोकाच विलक्षण प्रेम आहे. शिवाजीराजानं त्याच्या माणसांना अशी माया लावली आहे की त्यांना वाटतं की जणू काही आपण त्याच्या नात्यातलेच आहोत.'

लोकांच्याबद्दलची खरीखुरी कळकळ, त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्धचा प्रामाणिक लढा, स्व चा त्याग आणि अलौकिक शौर्य, लोकाना आपलसं करणारा निगर्वी स्वभाव हे लोकाच्या त्या निष्ठेचं कारण असेल काय ?

प्राध्यापक कुरुदकर म्हणतात त्याप्रमाणे त्या काळी निवडणुका नव्हत्या, पण शिवाजी राजे हे खऱ्या अर्थी लोकनेते होते.

आज निवडणुका आहेत. पण सामान्य माणसाला खुर्चीवर बसलेला तो राज्यकर्ता माझ्या सुखदु खाची जाणीव असणारा माझा माणूस आहे असे वाटावे, असे लोकनेते मात्र राहिलेले नाहीत. ¤

'तुम्ही इथ गोलघुमट पाहिलात. इब्राहीम रोजा, जामा मशीद, असे महाल पाहिलात, पण एक अत्यत महत्त्वाची गोष्ट पाहिली नाहीत ?'

'कोणती ?'

'शहाजी राजाना कैदेत ठेवल होती ती कोठी !.

माझ्यातलं कुतूहल जागृत झालं. मी म्हणालो, अवश्य पहायची आहे. चला.'

माझ्याबरोबर विजापुरातले पुराण वस्तू सशोधन खात्याचे एक वरिष्ठ अधिकारी निघाले. शहाजी राजे आदिलशहाच्या अटकेत असताना अहमदाबादेतल्या शहाजादा मुरादबक्षला पत्र लिहून त्यानी आपण आपल्या वडिलास मोगल बादशहाच्या सेवेत येऊ इच्छितो अस कळवल होत. अशा रीतीन दिल्लीचा दबाब आणून शिवाजी राजानी आपल्या वडिलाची आदिलशहाकडून सुटका करवली.

माझ्याबरोबरचे अधिकारी मला सागू लागले, 'येथून शहाजी राजाची सुटका कशी केली हे मोठ ऐकण्याजोग प्रकरण आहे. त्याना ठेवलेल्या कोठीभोवती खदक खणलेला होता. शिवाजी राजे वेश बदलून विजापुरात आले. शहाजी राजाच्या कोठीचे गज कापून ठेवण्याची व्यवस्था त्यानी अगोदरच केली होती रात्रीच्या अधारात शहाजी राजानी खिडकीतून खदकाच्या पाण्यात उडी घेतली. खंदकापलीकडे शिवाजी राजे शेतकऱ्याच्या वेशात गवतानं भरलेली गाडी घेऊन वाट

पहात उभे होते. त्यांनी शहाजी राजांना गवतात दडवल आणि गाडी विजापूरबाहेर दौडवली.'

आजवर तमाम इतिहासकाराना अज्ञात असलेली ही रोमहर्षक हकीगत ऐकून मी स्वत: त्या खदकात पडल्यासारखा गार झालो.

"तुम्ही हे सर्व कुठ वाचलंत?" मी विचारल.

"वाचल नाही. तेथल्या गाईडन मला सांगितल. पुराना गाईड आहे. चांगली माहिती आहे त्याला इथली." ते म्हणाले

अशीच विलक्षण हकीगत मला आग्र्याच्या लाल किल्ल्यातही ऐकायला मिळाली. दिवाणे खासच्या समोरच्या उघडया गच्चीवर बादशहाची काळया सगमवरी दगडाची एक बैठक आहे. ह्या बैठकीला तडा गेलेला आहे. बैठकीजवळच्या कमानीवर एक मोठ छिद्र पडलेलं आहे.

त्याकड बोट दाखवून तेथल्या एका सुशिक्षित गृहस्थांनी मला विचारलं, "हे छिद्र कशानं पडल तुम्हाला माहीत आहे?"

दख्खनचा शिवाजी राजा अत्यत शूर माणूस होता. केवळ तीनशे स्वार घेऊन औरगजेबाशी लढण्यासाठी तो आग्र्याला आला. बादशहा इथ ह्या बैठकीवर बसलेले. शिवाजीच्या तोफेचा गोळा आला आणि बैठकीवर पडला. सगमवरी दगडास तडा गेला. तो गोळा तेथून उडाला आणि कमानीला लागला. ते हे छिद्र!"

खरोखरच बैठक भगलेली आणि कमानीला छिद्र पडलेल. तेव्हा खोटं म्हणण्याची माझी काय प्राज्ञा?

विजापूरच्या अधिकाऱ्यास किंवा आग्र्याच्या त्या जाणकार माणसास दोष देण्यात अर्थ नाही. शिवाजी वरील साहित्य इतर प्रातातल्या भाषेत कितपत उपलब्ध आहे ह्याची मला कल्पना नाही. पण इग्रजी भाषेत शिवाजीवरील उत्कृष्ट पुस्तके म्हणून सर जदुनाथ सरकाराचे अथवा सरदेसाईंचे पुस्तक दाखवावे लागते. ही पुस्तके स्वातंत्र्यपूर्व कालातील.

पंडीत नेहरूनी प्रतापगडला येण्यापूर्वी शिवाजी महाराजांच्यावरील खात्रीलायक व चांगले पुस्तक मागितले तेव्हा त्यांना न्या. रानडेचे पुस्तक देण्यात आले. त्याचा प्रकाशनकाळ १९२० च्या सुमाराचा!

शिवाजीबद्दल अन्य प्रांतीयात अज्ञान असले तर त्याला आपणच जबाबदार आहोत. गेल्या वीस एक वर्षात शिवाजी महाराजाच्यावर नाव घेण्याजोगे एकही पुस्तक इग्रजी भाषेत प्रसिद्ध झालेले नाही. मग इतर भारतीय भाषात भाषातर होण्याची शक्यताच कमी!

शेजवलकराचे शिवचरित्राचा आराखडा व साधने, बेंद्रेचे शिवचरित्र किंवा व. मो. पुरदरेचे 'राजा शिवछत्रपती' ह्यासारखी पुस्तके इग्रजीतून आणि भारतीय भाषातून प्रकाशित करण्याचे अद्याप शिवप्रेमी सस्थेच्या अथवा कोणाही व्यक्तीच्या मनात आलेले नाही. वास्तविक अशी कितीतरी पुस्तके, सुरेख चित्रासह, सवलतीच्या किंमतीत भारतातल्या सर्व भाषातून प्रकाशित होण्याची नितात आवश्यकता आहे. त्यामुळे प्राताप्रातातील गैरसमज दूर होऊन सामजस्य वाढेल. आणि एका महान राष्ट्रीय पुरुषाला आज जे महाराष्ट्राच्या सीमामध्ये कोडले आहे त्याचा परिचय सर्व राष्ट्राला होईल.

पण हे करण्याकरिता कदाचित पुरेसे फड नसावेत. जे आहेत ते शिवाजी महाराजाचे एकमात्र स्मारक म्हणजे त्याचे पुतळे उभारणे ह्यावरच खर्च होत असावेत. कारण ह्या पुतळयाविना शिवाजी महाराजाचा जिर्णोद्धार कसा होणार?

शिवाजीचे तत्वज्ञान हा एक धगधगत्या दिव्यत्वाचा अविष्कार आहे. तो पेलणे कठीण! त्यापेक्षा शिवरायांचा गणपती करावा. मूर्तीची स्थापना करून चार दिवस सोहाळा करावा आणि नतर विसर्जन करणे शक्य नसते म्हणून त्या मूर्तीस विसरून जावे हे कालानुरुप योग्यच आहे. ◻

शहाजीराजांच्या बडाळीची सजा म्हणून महमद आदिलशहाच्या हुकुमावरून सरदार रायारावाने शहाजीराजांची जहागीर असलेले पुणे पेटवून दिले. तेथल्या लोकाची कत्तल केली. शहाजीराजाचे वाडे बेचिराख झाले. रायारावान गावावरून अक्षरश: गाढवाचा नांगर फिरविला. पुण्याची मसणवट करून टाकली.

त्यानतर काही वर्षांनी सिंहगडाचे नामजाद सुभेदार दादोजी कोडदेवानी शिवाजी राजाना पुण्यास आणले. त्यांच्या हाती सोन्याचा नागर दिला आणि पुणे फिरून वसवण्यासाठी, गाव सोडून गेलेल्या लोकाना त्यानी परत बोलावलं. अभय मिळाल तसं बारा बलुतेदार परत आले. शेतकरी आले, ब्राह्मण आले, कुलकर्णी पाटील आले, गाव सोडून गेलेली सगळी मडळी आपापल्या घरी परतली.

जिजाबाई आणि शिवाजी राजाना राहण्यासाठी दादोजीनी पुण्यात लाल महाल बाधायला सुरुवात केली. तो पूर्ण होईपर्यंत शिवाजीराजे व जिजाबाई शिवापूरला रहात. हे शिवापूर पुणे शिरवळ रस्त्यावर चार-एक मैल आत पश्चिमेस आहे.

ह्या शिवापूरापासून तीन एक मैलावर रांझे आहे. त्याचा शोध काढीत सध्याकाळी आम्ही तेथे पोहोचलो. राझे गाव लहान असल तरी तेथल्या पाटलाचा वाडा प्रशस्त आहे. त्याचा तीनचतुर्थांश भाग आता पडलेला आहे, उरलेल्या भागात राझेकर पाटील रहातात. त्याना भेटलो. गृहस्थ सज्जन. त्यानी आमचं स्वागत केल. आवश्यक ती माहिती सागितली.

'हा वाडा शिवकालीन नव्हे. हा पेशव्याचा काळात बाधलेला आहे. शिवकालीन पाटलाचा वाडा पडून गेला आहे.' अस ते म्हणाले.

ऐकून मी खट्टू झालो. राझेकरांच्या शिवकालीन वाडयाचे अवशेष मिळाले असते तर ते मला फिल्मवर उतरायचे होते. ह्या राझ्याच्या पाटलानी शिवकालात एका बाईवर बलात्कार केला. असे गुन्हे पूर्वीही घडत. पण त्याची दाद फिर्याद सुलतानाच्या राज्यात लागण कठीण होई. त्यात पाटील म्हणजे गावाचा मुख्य सरकारी अधिकारी. त्याच्याविरूद्ध तक्रार करायची म्हणजे गावात रहाणं अशक्यच! प्रजेला वाली नव्हता, दु:ख सांगायला जागा नव्हती.

शिवाजी राजाना पाटलाची ही हकीगत समजली. त्यानी ताबडतोब ढालाईत हशम राझ्याला रवाना केले. बाबाजी बिन भिकाजी गुजर पाटील जेरबद करून शिवाजी राजाच्या दरबारात दाखल करण्यात आले.

शिवाजी राजानी त्याच्या गुन्ह्याची रीतसर चौकशी केली. आणि गुन्हा शाबीत झाला तशी आज्ञा दिली – पाटलाचे दोन्ही हात आणि पाय कलम करा.

पाटलाचे हातपाय तुटले. पिढीजात पाटीलकी जप्त झाली. हे घडले २८ जानेवारी १६४५, म्हणजे शिवाजी राजाच्या वयाच्या अवघ्या चवदाव्या वर्षी.

प्रजेच्या कल्याणाची अशी दक्षता शिवाजी राजानी पुढेही घेतल्याची उदाहरणे जागोजाग सापडतात.

अधिकाऱ्याना लिहिलेल्या एका पत्रात शिवाजी राजे म्हणतात,

'कारभार ऐसा करावा की रयतेचे भाजीचे दिठासही हात न लावणे. नाहीतर लोक बोलतील की यापेक्षा मोगल बरे !'

आणखीन एका ठिकाणी त्यानी म्हटले आहे,

'सैन्यास लागणारी चीजवस्तू रोकड किंमत देऊन प्रत्येकाने विकत घ्यावी प्रजेस खराबा न पोहोचावा.'

शिवराज्याची मुद्रा होती – शहाजीचा पुत्र शिवाजीराजा याची ही मुद्रा लोककल्याणार्थ शोभत आहे.

ह्याच मुद्रेचे शब्द आज आपण राज्यसरकारच्या मुद्रेसाठी वापरलेले आहेत. ते केवळ शोभेचे शब्द झाले आहेत अशी कधी कधी शंका मनात येते. तसे जर ते नसते तर जनतेच्या प्रतिनिधींच्या निवासस्थानी मुजऱ्याचे, कॅब्रेचे कार्यक्रम कशाला झाले असते ? तसे ते नसते तर ग्रामसेविकांवर व पारिचारिकांच्यावर अत्याचार कशाला झाले असते ? तसे ते नसते तर हरिजनांच्या स्त्रियाची अब्रू सार्वजनिकरित्या कशाला घेतली गेली असती ?

–हे सर्व पाहिले की वाटते, आम्ही, शिवाजीराजाच्या वारसानी, त्यांची जेवढी बदनामी केली आहे तेवढी त्यांच्या तत्कालीन शत्रूनीही केली नसावी. ¤

जवळ जवळ बारा वर्षांनी मी परत प्रतापगडास चाललो होतो. कॉलेजमध्ये असताना इतिहासाच्या प्राध्यापकाबरोबर आम्ही दहा-बारा विद्यार्थी पायथ्यापासून प्रतापगडावर चालत गेलो होतो

हे चालताना प्रतापगडाचा परिसर आम्ही जवळून पाहिला आणि अफझलखानासारख्या अनुभवी, कर्तबगार आणि मातब्बर सेनानीबरोबर लढण्यासाठी हा छोटासा पण बिकट किल्ला महाराजांनी कसा अचूक निवडला हे लक्षात आल होत. जावळीच्या खोऱ्यात अत्यत घनदाट जगल आहे. अफझलखानाला वाईहून इथ यायला भाग पाडण्यातच महाराजानी अर्धी लढाई जिंकली. आधुनिक युद्धशास्त्राच्या दृष्टीने प्रतापगडच्या युद्धाची तुलना नेपोलियनच्या इटलीच्या मोहिमेशी केली जाते. सूक्ष्म तपशील लक्षात घेऊन केलेली आखणी, परिसराचा सत्कृष्ट उपयोग आणि अपुऱ्या सैन्याची अचूक विभागणी. ह्यातली प्रत्येक गोष्ट महाराजांच्या रणधुरधर गुणांची साक्ष देणाऱ्या होत्या. अफझलखान ह्या भेटीत मारला गेला नसता तरी देखील जावळीच्या खोऱ्यातीलच नव्हे तर वाईला ठेवलेल खानाच सैन्य ह्या लढाईत गारद झाल असत. मराठी सैन्य तेथे न थाबता शकराच्या त्रिशूळासारखे तीन बाजूनी सरसेनापती नेताजी पालकर, दोसेजी, खुद्द महाराजांच्या अधिपत्याखाली आदिलशाहीत खोलवर घुसावे अशी ही दूरदर्शी योजना होती. आणि महाराजानी अलौकिक शौर्यान व विजेच्या वेगान ती यशस्वी करून दाखविली.

हे सर्व आठवीत पूर्वी प्रतापगड आम्ही दोन अडीच तास चढत होतो. तोच चढ आता मोटार रस्ता झाल्याने आम्ही काही मिनिटात पार करून गेलो.

मोटारीतून आम्ही प्रतापगडाच्या प्रवेशद्वाराशी उतरलो आणि लक्षात आल प्रतापगड बदलून गेला आहे. पहाव तिकड विजेचे खांब, कोकाकोला, गोल्डस्पॉटच्या जाहिराती, नवीनच उगवलेली तट्टयांची हॉटेलं, गरम पोहे आणि बटाटे वडयाच्या पाटया.

कागलच्या किंवा खोपोलीसारख्या स्टॅण्डवर एस. टी. थाबताच तेथल्या सात-आठ हॉटेलातून एकदम रेडिओ, ग्रामोफोन, गिऱ्हाईकाना आकृष्ट करण्यासाठी वाजू लागतात तसाच प्रकार इथही. 'चिनगारी' पासून 'बॉबी खो जाय' पर्यंतचे सगळे सूर एकदम तारसप्तकात सुरू झाले.

ह्या रेडिओशी स्पर्धा करण्याकरिता, गडावर येणाऱ्या टूरिस्ट मडळीच्या खाद्यावरचे ट्रॅन्झिस्टरही तेवढ्याच ताकदीने किंचाळत होते. तंग तुमानी, लाडे स्कर्ट, ओठात पेटत्या सिगरेटी, खाद्यापर्यंत येणारी झुलप, आणि तोडात 'येसमेन' किंवा 'च्यायला' पासून सुरू होणारी भाषा, हे सर्व पाहात ऐकत बालेकिल्ल्यावरील शिवरायांच्या पुतळ्यापर्यंत पोहोचलो. ह्या पुतळ्यासमोर 'ह्या बागेची देखरेख अमक्या खात्यातर्फे अमक्या ग्रामपचायतीने केलेली आहे' अशी मोठी पाटी होती. बाबासाहेब पुरदरेंच वाक्य आठवल 'वडील वृद्ध झाले म्हणजे त्याच्या कपाळावर, 'आम्ही ह्याचा चरितार्थ चालवतो' अशी पाटी लावायला ही कर्तबगार मुले कमी करणार नाहीत.

प्रतापगड हा छत्रपतीच्या खाजगी मालकीत आजही आहे. इथ शिवसृष्टी निर्माण करण्याचे शिवप्रतिष्ठानचे प्रयत्न आहेत. ही शिवसृष्टी केव्हा प्रत्यक्षात येणार असेल ती येवो. आजतरी ह्या किल्ल्यावर किल्लेदार, हवालदार, सबनीस, पुराणिक ह्यांच्या वशजाच्या नशिबी चरितार्थाकरिता बटाटेवडेवाला किंवा पोहेवाला होण्याचेच आले आहे कोणताही धदा प्रामाणिकपणे करण्यामध्ये लाज कसलीच नसावी, तरीही शिवशाहीतील सरदार, शिलेदार आज त्याच जागी हॉटेलातले वेटर बनावेत ह्याच दुःख महाराष्ट्राला नसाव ही गोष्ट यातनामय आहे.

किल्ल्याची दुर्धरता, दुर्गमता सपली आणि पोटातील पाणी न हालता वरपर्यंत मोटारीने जाण्याची सोय झाली की किल्ल्याचा पिकनिक स्पॉट होणे ही गोष्ट अत्यत नैसर्गिक आहे. पन्हाळ्याचे तेच झाले आहे. टूरिस्ट खात्याच्या कृपेने रायगडाचे तेच होऊ घातलेले आहे. प्रतापगड ह्या सर्वांचे मार्गदर्शक ठरेल असे प्रात्यक्षिक झाले आहे. श्रद्धाहीन लोकाची वर्दळ वाढली की तेथल्या लोकाना चार पैसे मिळण्याची सधी प्राप्त होते हे खरे असले तरी आजूबाजूच्या वातावरणाची गूढ परिणाम करण्याची शक्तीही सपते हेही तितकेच खरे !

पराभव पावलेल्या अफझुलखानाच्या कबरीभोवती जे वातावरण आहे ते आज गडावर शिवाजी महाराजाच्या पुतळ्याभोवती अथवा भवानी मदिरात नाही. किल्ल्यावर कुठही, अगदी देवळातही सिगरेट ओढीत, ट्रॅन्झिस्टर लावून हिंडणारे लोक ह्या कबरीजवळ येताना पायातले जोडे काढतात, सिगरेटी विझवतात आणि ट्रॅन्झिस्टर बद करतात.

अफझुलखानाची कबर मोठ्या इतमानानं

आजही संभाळली जाते. पण तिथं जाणाऱ्या फारच थोड्याना हे माहिती असेल की ही कबर महाराजानी बांधवली, एवढेच नव्हे तर हिचा खर्च महाराज व पुढे त्याचे वंशज चालवीत होते. येथल्या मुजावरची नेमणूक देखील महाराजानी केलेली असे आणि त्याचे वर्षासनही त्याला महाराजाकडून मिळे. अफझुलखानानं केलेली देवतांची विटंबना शहाजीराजाची विश्वासघाताने केलेली कैद आणि त्यानंतरचा अपमान ह्या सर्वांची क्षमा करण्याइतके महाराजांचे अंतःकरण मोठे होते. अफझलखानाच्या कैद केलेल्या दोन मुलाना त्यानी सन्मानपूर्वक विजापुरास धाडले. ही माहिती देणारी एखादी पाटी त्या कबरीजवळ का नसावी? परधर्म सहिष्णुता ह्या शब्दाचा आज अर्थ दुबळेपणा आणि लांगूलचालन ह्याऐवजी वापरलेला एक गोंडस शब्द असा होऊ लागला आहे ह्यावेळी एका समर्थ शासनाच्या परधर्मसहिष्णुतेचं हे प्रतीक तीनशे वर्षे उलटली तरी मार्गदर्शक ठरेल. ◻

दूरवर क्षितिजाजवळ वातावरणात धूसर झाल होत. सूर्याचे लालभडक बिंब अर्धवट त्या धूसर वातावरणामुळ दिसेनासं झालं होतं. काही क्षणात ते पूर्ण दिसेनासं होईल. मी, म्हात्रे, कॅमेरामन आणि रायगडावरचे पुराणवस्तु संशोधनाचे श्री. विद्वांस तिथेच हिरकणी बुरुजावर उरलो होतो. तिघापैकी कोणीच बोलत नव्हतं. आम्ही तिथे मावळणाऱ्या सूर्याकडं पहात उभ होतो. प्रत्येकजण आपापल्या विचारात हरवलेला होता.

आमच्या मागच्या बाजूला मेणे दरवाजा, तेथून बालेकिल्ल्यातील राण्यांचे महाल, राजसभा, नगारखाना, त्यापलिकडं वसवलेली प्रशस्त बाजारपेठ, आणि त्यानंतर जगदिश्वराचं देवालय...आज ज्यांची निगा राखणही आम्हाला जमत नाही अशा वास्तू. ह्या गडावरच्या, तोरण्यावरच्या, पलीकडच्या राजगडावरच्या, स्वराज्यातल्या तीनशे किल्यावरच्या. केवढा मोठा हा खटाटोप! किल्ले. डोंगरावरचे, जमिनीवरचे, सागरावरचे. ते जिंकायचे, बांधायचे, त्यावर आपली माणस नेमायची. तीसएक वर्षांची कारकीर्द. त्यात केवढा प्रचंड हा प्रपंच? आणि तो कशाकरिता? ही भूमी मी स्वतंत्र करीन. *तेथे स्वराज्य आणि सुराज्य निर्माण करीन.* ते राज्य श्रीचे, ते राज्य भवानीचे, मी केवळ त्या आदीशक्तिचा प्रतिनिधी, सेवक. अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी त्या आदिशक्तीने मला पाठवले. श्रीकृष्णाने सांगितलेला कर्मयोग कृतीत आणण्यासाठी मी येथे आहे. ह्या येथल्या वर्षानुवर्षं पिळलेल्या, गांजलेल्या गरीब मराठी माणसासाठी मी आदिलशाही सिद्दी, पोर्तुगीजच काय दिल्लीधिपती मोगलाशी लढा मांडला आहे भवानी मला यश देईल. श्रीचे राज्य निर्माण होईल!'

—असे विचार शिवाजी महाराजाच्या मनात किल्ल्यावरून सूर्याकड पहाताना एखाद्या सध्याकाळी आले असतील काय?

रायगडच्या वातावरणात अद्यापही जादू भरलेली आहे. शिवाजीराजाच तीनशे वर्षांपूर्वीच ह्या किल्ल्यावरील वास्तव्य अद्यापही येथल्या हवेत तरळत आहे. पृथ्वीपासून अत्यत दूरवर असलेल्या काही ताऱ्यांचा प्रकाश इथवर पोहोचायला कित्येक प्रकाशवर्षं उलटावी लागतात. आज आपल्याला आकाशात दिसणारा तारा तेथे तीनशे वर्षांपूर्वी असतो. तसे शिवाजीमहाराज रायगडावर आजही जाणवतात. भासतात.

स्वतःशीच बोलल्यासारखे विद्वंस बोलू लागतात, 'मी रायगडावर गेली चार वर्षं काम करतो आहे. अनेक ठिकाणी उत्खनन चालू आहे रायगड त्यातून जितका अधिकाधिक दिसतो आहे तितका मला तो अधिकच गूढ वाटतो आहे.

गेल्या वर्षी गंगासागर उपसण्याचा मी प्रयत्न केला. त्याच्या तळाशी साचलेला गाळ मला काढता आला नाही. पण त्यात एक गणेशाची मूर्ति आणि एक छिन्नी सापडली. ह्या छिन्नीचं पोलाद आज मिळणाऱ्या पोलादापेक्षा शंभरपटीनं शुद्ध अन् मजबूत आहे. हे त्या माणसांनी कस घडवल असेल?

अशा छोट्या छोट्या गोष्टीतून माझ मन शिवाजीराजाचा विचार करू लागतं. त्या अलौकिक व्यक्तिमत्त्वान मी झपाटला जातो. किल्ल्यावर भारल्यासारखा एकटाच हिंडत रहातो.

मनात येत, ज्या गडावर महाराजांचा राज्याभिषेक झाला, तेथल्या प्रत्येक वास्तूवर महाराजाची सावली शोधू पहाणाऱ्याला आजही दिसते तेथे एक लोखंडाचा निर्जीव, पुतळा कशासाठी हवा आहे?

ठेवायचेच असेल तर येथे महाराजांच्या जीवनावरील उत्तमोत्तम पुस्तकं ठेवावीत, येथे उत्तम अभ्यासिका असावी, प्रदर्शन असावे त्याकाळची हत्यारे, नाणी, नकाशे असावेत. श्री. बाबासाहेब पुरंदरेचं शिवसृष्टीच दिव्य स्वप्न इथ साकार व्हावं. आणि श्री. भालजी पेंढारकरांनी लिहिल्याप्रमाण ह्या सर्व गोष्टीपलीकडील शिवाजीराजांनी जागृत केलेली मराठी अस्मिता आणि महाराष्ट्र धर्म ह्या राज्याभिषेकाच्या निमित्ताने पुन्हा एकदा लोकांच्या अंगी बाणावा श्री. भालजीच्या शब्दात—

'इथं छत्रपतीचे तेज, ओज आणि दिव्यत्व याचे सतत दर्शन घडत राहून, स्फुरण चढवणारी छत्रपति लष्करी विद्यापीठाची योजना साकार व्हावी ...स्त्री वर्गासाठी भारतीय सस्काराचे, स्वावलबनाचे, चारित्र्य सपादनाचे आणि आत्मरक्षणाचे शिक्षण दिले जाईल अशी जिजामातेचे दिव्यत्व प्रकट विणारी सस्था सुरू व्हावी. येथे शिक्षित, समर्थ झालेले विद्यार्थी शेकड्यानी बाहेर पडून, मराठी अस्मिता, मर्दुमकी, पावलापावलानी पेरीत जातील तर जिजामाता सस्कार केंद्रात शिक्षित झालेल्या मुली जिजामाताची थोरवी, जिद्द आपल्या आचरणाने इतरांना शिकवतील.

उधळलेला गुलाल, उभारलेली तात्पुरती दृश्ये, वठवलेली नाटके आणि गाईलेले पवाडे अवकाशात विरून जातील. पण शिवछत्रपतीच्या तत्वज्ञानाची व वृत्तीची जोपासना करणाऱ्या अशा सस्था छत्रपतीची शान आणि जिजामाईंचा मान कायमपणे जगाला दाखवतील, ऐकवतील.'

◻ ◻



# जलसमाधी

● गोपाळ माधव देवस्थळी ●

१८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाला जी अनेक कारणं झाली त्यात लॉर्ड डलहौसी यांच्या (Doctrine of lapse) औरस संतती नसलेल्या संस्थानिकांचा मुलूख ब्रिटिश साम्राज्याला जोडून त्यांचा सत्ता नामशेष करून हिंदुस्थानात ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल जारी करायचा हे धोरण मुख्यत्वे कारणीभूत झाले.

महाराष्ट्राच्या दक्षिणेस 'नरगुंद' म्हणून एक संस्थान होते, तेथील राजे श्रीमंत भास्करराव उर्फ बाबासाहेब भावे हे अत्यंत लोकप्रिय व प्रजानुवर्ती असे होते. प्रजेची त्यांच्यावर नितांत भक्ती होती कारण त्यांच्या कारकिर्दीत त्यांची प्रजा सुख, सुबत्ता व शांती यांचा उपभोग घेऊन मोठ्या आनंदाने जीवन कंठीत असे

पण ई. इं. कंपनीकडून त्यांना एक दिवस खलिता आला, "आपल्या संस्थानला औरस वारस नसल्या कारणाने आपले संस्थान खालसा करण्यात येईल व आपला मुलूख कंपनी सरकारच्या मुलुखाला जोडण्यात येईल."

हिंदुधर्माने औरस संतती नसल्यास दत्तक पुत्र घेऊन घराण्याचा वंश चालविण्यास शास्त्रयुक्त परवानगी दिलेली आहे. ती धर्माज्ञा डावलून केवळ सत्तेच्या जोरावर आपला संस्थानी मुलूख गिळंकृत करण्याचा हा धडधडीत जुलूम आहे तो आपण सहन करणार नाही, यापेक्षा ब्रिटिशांबरोबर दोन हात करून दुनियापार होणे यात स्वाभिमान आहे, या समजुतीने त्यांनी ब्रिटिशांविरूद्ध शस्त्र उपसले. यावेळी उत्तर हिंदुस्थानात श्रीमंत नानासाहेब पेशवे, सेनापती तात्या टोपे, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांच्या विरुद्ध जोराचा लढा चालू होता आपणही त्यांना जाऊन मिळावे व दक्षिणेतही मोठा डोंब उसळून द्यावा हा श्रीमंत बाबासाहेबांचा हेतू होता.

आपण ब्रिटिशांचे मांडलिकत्व झुगारून देऊन स्वतंत्र झालो आहोत हे दर्शविण्यासाठी बाबासाहेबांनी आपल्या महत्तम गडावरून पाच तोफा सोडून नरगुंद शहरात आपल्या सैन्याचे संचलन करून स्वातंत्र्याची द्वाही जाहीर केली.

ब्रिटिशांना ही बातमी कळताच दक्षिण संस्थानच्या पोलिटिकल एजंटने कर्नल मॅनसन् याला कोल्हापूराहून काही गोरे सैन्य व तोफा यासह श्रीमंत बाबासाहेब भावे यांना पकडून आणण्यासाठी नरगुंदवर पाठविले.

कर्नल मॅनसन् दरमजल कूच करीत नरगुंदपासून आठ मैलांवर

रात्री एका खेडेगावी, मारुतीच्या देवळाजवळ छावणी करून राहिला. दुसरे दिवशी सकाळीच तो नरगुदवर चाल करून येणार होता.

ही बातमी श्रीमत बाबासाहेबाना कळल्यावर त्यानी मॅनसन्वर त्याच रात्री अचानक हल्ला चढविला – छावणीतील पहारेकऱ्यांना ठार करून बाबासाहेबाचे सैन्य छावणीत शिरून कापाकापीला सुरुवात झाली. ब्रिटिश सैन्य गाफील असल्यामुळे त्याचे फार नुकसान झाले. छावणीतील गडबडीमुळे मॅनसन् जागा झाला. त्याने आपले पिस्तुल सरसावून समोर दिसेल त्याला गोळी घातली. त्यात नरगुदचे चार शिपाई पडले; एका शिपायाने तबूची कनात फाडली त्याबरोबर नरगुदचे बरेच शिपाई आत शिरून एकच गर्दी झाली. आपला निभाव लागत नाही असे पाहून कर्नल मॅनसन् तबूच्या दुसऱ्या दरवाज्याने मारुतीच्या देवळात शिरला व त्याने देवळाचे दार लावून घेतले.

बाहेर हाणामारी चालूच होती, काही गोरे शिपाई तेथून पळून जाऊन घोड्यावरून त्यानी तार ऑफिस गाठले व बेळगाव मराठा पलटणीच्या सेनाधिकाऱ्याला तार दिली. इकडे नरगुदच्या शिपायानी देवळाचा दरवाजा फोडून आत प्रवेश केला. मॅनसन् समोर दिसेल त्याला गोळी घालून ठार करीत होता, पण अखेर नरगुदच्या एका हवालदाराने आपल्या तरवारीने त्याचे मुडके उडविले व नरगुदच्या राजाचा जयजयकार केला आता लढाई सपलीच होती, हवालदाराने ते मुडके श्रीमताना नजर केले. काही शिपायानी ते मुडके भाल्याच्या टोकाला अडकवून नरगुद शहरातून मिरवणूक काढली. शहरात आनदी आनद मावेना !

श्रीमत बाबासाहेबाना कल्पना होतीच की या बडखोरीचा मोड करण्यासाठी ब्रि. ई. इ. कपनी मोठे सैन्य पाठवील, त्यासाठी त्यानी आपल्या किल्ल्यावर दारूगोळा, अन्नसामुग्री याचा साठा केला आणि आपल्या सैन्याची जय्यत तयारी केली. दक्षिणेतील सस्थानिकाना स्वातत्र्यासाठी लढा देण्याची आव्हानपत्रे पाठवून कुमकही मागवली. श्रीमत नानासाहेब पेशवे याच्याकडेही एक शिष्टमडळ पाठवून थोडी मदत मागितली व आपला बचाव करून लवकरच आपल्याला मिळतो असे पत्रही पाठविले !

जून १८५७ मध्ये बेळगावहून कर्नल मालकम् मोठी फौज व तोफखाना घेऊन नरगुदकरावर चालून आला. बाबासाहेब आपल्या किल्ल्यावरून, आपल्या चिमुकल्या सैन्यानिशी काही दिवस लढले. कोणत्याही सस्थानिकाने या बाजूला, ब्रिटिशाविरुद्ध उठाव केला नाही ! रगोबापूजीच्या मदतीची बाबासाहेब अपेक्षा करीत होते, पण ती वेळेवर आली नाही. तोफांच्या माऱ्याने किल्ल्याचा तटाला खिंडारे पडली, मालकम्चे सैन्य नरगुद शहरात जाळपोळ, लुटालूट करू लागले, तरी किल्ल्यावरून प्रतिकार चाललाच होता.

बाबासाहेबाची धर्मपत्नी ' राणी सावित्री ' हिने असा सल्ला दिला की, " आपण किल्ल्यातील भुयारी वाटेने काही निवडक लोकासह वेषातर करून बाहेर पडावे व नानासाहेब पेशव्याना जाऊन मिळावे व एक जोरदार लढाई या ब्रिटिशाशी द्यावी." आपली प्रजा व एकनिष्ठ सैनिक ब्रिटिश लाडग्याच्या तोडात देऊन भ्याडासारखे एकटेच निसटून जाण्याची कल्पना त्याना मानवली नाही. पण सावित्रीबाई म्हणाल्या, " इथे मूठभर सैन्यासह लढून जिवंत पकडले जाण्यापेक्षा किंवा कुत्र्याच्या मौतीने मरण्यापेक्षा, जिवंत राहून एक मातब्बर लढा शत्रूशी देऊन नशिबाची परीक्षा पाहणे बरे. आम्ही दोघी – मी आणि आपल्या मातोश्री – येथून रामदुर्गकर भावे याच्या आश्रयाला मध्यरात्री निघून पुढे जाऊ. "

पत्नीचे म्हणणे अखेर त्याना पटले व पाच सहा विश्वासू लोक बरोबर घेऊन काही हत्यारे व बरेच द्रव्य बरोबर घेऊन वैराग्याच्या वेषात ते भुयार मार्गे बाहेर पडले. सावित्रीबाईने सर्व जडजवाहिर, दागदागिने व खजिन्यातील शिल्लक एका भक्कम लोखडी सदूकमध्ये घालून ती पेटी लोखडी साखळदंडाच्या सहाय्याने किल्ल्यातील विहिरीत सोडली आणि आपल्या सासूबरोबर रामदुर्गच्या मार्गाला दोन विश्वासू सैनिकासह चालू लागली.

इकडे किल्ला ब्रिटिशानी जमीनदोस्त केला. लुटीचे व जाळपोळीचे सत्र चालूच होते, पण आता मालकमने श्रीमंत बाळासाहेबाचा कसून शोध चालू केला, ते सापडत नाहीत असे पाहून त्याने बाबासाहेबाचा पत्ता सागणारास दोन हजाराचे बक्षिस लावले व पकडून दिल्यास पाच हजार रु. बक्षीस देण्यात येतील अशी दवडी देऊन नरगुदच्या चारी वाटावर लष्करी ठाणी व कडक पहारा बसविला. जाणाऱ्या येणाऱ्याची कसून झडती घेण्यात येऊ लागली.

सात आठ मैल अरण्यातून चालल्यावर सासुबाई थकल्या व सावित्रीलाही विश्रातीची जरूर वाटली. त्या एका झाडाखाली बसल्या तेव्हा तेथून जवळच सागलगाव म्हणून एका खेड्यात आपल्या दूर नात्यातील एक गृहस्थ राहतो व तो मोठा सावकार आहे व त्याचा वाडाही भक्कम आहे याची त्याना आठवण झाली; तेव्हा एक दिवस तेथे राहून पुढे रामदुर्गला जाण्यासाठी त्यांच्या मदतीने गाडीची व्यवस्था करावी असे त्याना वाटले. आपल्याबरोबर असलेल्या शभू नावाच्या नोकराला गावात जाऊन माधवराव सावकाराचे घर शोधून आपण दोघी येत आहोत असा निरोप सांगण्याला पाठविले व त्या झाडाखाली विश्राती घेत पडल्या.

शभूने माधवराव सावकाराचा वाडा शोधून काढून माधवरावाना नरगुदच्या राणीसाहेब व त्याच्या सासुबाई आपल्याकडे मुक्कामाला येत आहेत असे सागितले. हे ऐकून त्याची पत्नी कडाडली, ' आपले वाटोळे झाले आता आमच्याकडे येऊन आम्हालाही सकटात टाकणार वाटते ?' माधवराव तिला बप्प बसण्याची खूण करीत होते ते सुद्धा शातपणे शभूला म्हणाले, ' नरगुदची सर्व हकीगत आम्हाला बाजारात समजली, आम्ही त्याना आश्रय देणे म्हणजे...

शभू एकदम म्हणाला, ' अहो, त्या आपल्या नातलग आहेत आजचा दिवस राहून त्या उद्या रामदुर्गला जाणार आहेत ', तेव्हा...

माधवरावांनी काही न बोलता त्याना घेऊन येण्यास सागून आपल्या पत्नीस त्यांच्या चहापाण्याची व भोजनाची व्यवस्था ताबडतोब करण्यास बजावले आणि गड्याला सागून त्याच्यासाठी गाद्यागिर्द्या घालून एक खोली सज्ज करण्यास सागितले.

काही वेळाने शभू त्या दोघी मालकीणीना घेऊन माधवरावांच्या वाड्यात आला व त्याने माधवरावाना त्या आल्याची वर्दी दिली. त्याना पाहून माधवरावाची पत्नी पुन्हा कडाडली. ' तिकडे नरगुंद पेटले आणि आता आमच्या वाड्याला या पेटविणार ! दुसरे काय ?' सावित्रीच्या सासूने हे शब्द ऐकले आणि त्याही अवस्थेत ती रागाने

म्हणाली 'काय ग, माझ्या मुलाने या तुझ्या वाड्यासाठी व सावकारीसाठी 'पचवीस हजार रुपये' माधवाला दिले होते हे तू विसरलीस वाटते ? म्हणे आमचा वाडा !'

माधवराव हात जोडून म्हणाला 'बाईसाहेब. माफ करा, तिचे बोलणे आपण लक्षात घेऊ नका, यावे आत, घर आपलेच आहे, आपली सर्व व्यवस्था करणं माझं कर्तव्य आहे.'

राणी सावित्री व तिची सासू आता त्या खोलीत आल्या, एका शागिर्दाने ऊनपाणी पाय धुण्यासाठी दिले व लगेच दुधाचे दोन पेले पुढे ठेवले. म्हातारी सासू श्रमाने थकली होती तिला गादीवर पडल्याबरोबर गाढ झोप लागली; बरोबरचे नोकर माधवरावाच्या नोकराच्या खोल्यात गेले, तेथे त्याची व्यवस्था केली होती.

सावित्रीला मात्र झोप येईना. ती बिछान्यावर तळमळत होती. काही वेळाने एका मुलीने दोन पत्रावळीवर भोजन वाढून आणले आणि तांब्या व दोन फुलपात्रे ठेवून ती मुकाट्याने निघून गेली. एखाद्या मोलकरणीला पान वाढून देतात त्याप्रमाणे तो भोजन प्रबंध पाहून सावित्रीबाईंना मनस्वी संताप आला व दुःखाने त्यांच्या तोंडून एक शब्दही बाहेर पडला नाही !

त्या विमनस्क स्थितीत त्या आपल्या खोलीबाहेर पडल्या, पहाटेचा कोंबडा आरवला. इतक्यात बाबासाहेबाबरोबर गेलेला शंकर नावाचा नोकर वाड्याकडे येत असलेला त्यांनी पाहिला. आपली मालकीण शाल पांघरून एकटीच अंगणात उभी असल्याचे पाहून त्याला चमत्कारिक वाटले, पण तो तसाच पुढे येऊन सावित्रीबाईंच्या पायावर कोसळून रडू लागला. तो म्हणाला, 'तोरगलच्या डोंगरांत सोजिरांनी चहूबाजूने घेरा घातला तेव्हा धनी म्हणाले, 'हा मोत्याचा हार ही तुझ्या मालकाची शेवटची देणगी म्हणून सावित्रीकडे जा आणि तिला सांग, 'स्वातंत्र्यासाठी तुझ्या पतीचे बलिदान होत आहे, तेव्हा तू जन्मसावित्रीप्रमाणे रहा. आपला जीव वाचीव आणि ही शेवटची माझी आज्ञा मान.' असे रडत सांगून तो मोत्याचा कंठा त्याने सावित्रीबाईपुढे ठेवला. सावित्रीने पुढे काय होणार याचे भाकित करून तिने तो हार तोडून मोती वेगळे केले व म्हणाली, 'शंकर, तुम्ही चौघेजण आहात, तेव्हा हे मोती सारखे वाटून घ्या, होणारे चुकत नाही. आपल्या धन्याची हीच आठवण ! आज संध्याकाळी आपण येथून रामदुर्गला निघू.' आता माधवरावांच्या खोलीत शंभू आहे तिथं जाऊन विश्रांती घे. काही वाईट वाटून घेऊ नकोस. सर्वांनाच यश मिळत नाही, म्हणून प्रयत्नाची किंमत कमी होत नाही, जा आता.'

शंकर नाईलाजाने डोळे पुशीत शंभूच्या खोलीकडे गेला. सावित्रीबाईंनी थोडा विचार करून आपल्या सासूला उठवून 'चला आता' असे म्हटले. सासूने पाहिले तो पहाटेचा अंधुक प्रकाश होता. सकाळ झाली नव्हती. 'इतक्या लवकर आपण निघायच ?' कुठं जायच ? सासूबाई म्हणाल्या. 'जिथे आपल्याला कायम आसरा मिळेल अशा ठिकाणी, चला आता वेळ घालवून उपयोगी नाही.' असे म्हणून सावित्रीने सासूच्या अंगावर शाल घातली आणि बरोबर आणलेली व्यंकटेशाची मूर्ती तिने बरोबर घेतली. जाताना रात्री आणलेल्या अन्नाला नमस्कार करून त्या दोघी मागील दरवाजाने बाहेर पडल्या.

अजून रस्त्यावर विशेष रहदारी नव्हती. त्या दोघी चालू लागल्या व काही वेळाने मलप्रभा नदीच्या काठावर आल्या. सावित्रीबाईंनी सासूला घाटाच्या पायऱ्या उतरायला सांगितले. तेव्हा सासूबाई म्हणाल्या, 'सावित्री, तू आत्महत्या करणार ? या नदीच्या पाण्यात बुडी मारणार ? म्हणजे आपण रामदुर्गला...

'आता रामदुर्ग नाही अन् नरगुद नाही. सगळे संपले. आता हेच आपलं निवासस्थान' असे म्हणून ती व्यंकटेशाची मूर्ती तिने सासूबाईच्या पाठीशी बांधली आणि दोघी त्या नदीच्या पाण्यात पुढे जाऊ लागल्या. सावित्री म्हणाली, 'हे गंगे, मला माझ्या पतीकडे शक्य तितक्या लवकर ने. ते माझी वाट पहात असतील'

त्या अथांग पाण्यात थोडे बुडबुडे आले, विश्वातील सर्व वस्तू पहाणाऱ्या प्रतापी सूर्यालासुद्धा त्या दिवशी त्याचे दर्शन झाले नाही.

बक्षिसाच्या आशेने कोणीतरी बाबासाहेब वेषांतर करून अमक्या रस्त्याने जात आहेत, ही बातमी कर्नल मालकमला कळविली. बाबासाहेबांना पकडून १२ जून १८५७ रोजी बेळगावच्या लष्करी छावणीत राजद्रोही म्हणून जाहीर रीतीने फाशी दिले !

माधवरावांनी त्या दोघी राजस्त्रियांच्या पत्ता काढून त्यांना मलप्रभा नदीच्या घाटावर मंत्राग्नी दिला. त्या ठिकाणी त्याचे स्मारक म्हणून दोन दगडी चौथरे होते.

□ □


शनवारवाड्यातील शमादान

ब. मो. पुरंदरे

किंमत साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे ३०

पुस्तके

# स्मृतिचित्रांची ' अभिनव ' आवृत्ती

' माझे चरित्र लिहायचे झाले तर ते घडले तसे लिहा ' असे कवी ना. वा. टिळकांनी म्हटले होते आणि श्री. लक्ष्मीबाईंनी ' स्मृतिचित्रे ' लिहिली त्यात ते तसेच रेखाटले गेले आहे त्याचा पहिला भाग दि. १५ डिसेंबर ३४ ला प्रसिद्ध झाला त्यानंतर दुसरा आणि तिसरा भाग यथाक्रम प्रसिद्ध झाले. हे भाग वाचीत असताना वाचकांना लक्ष्मीबाईंबद्दल विलक्षण कुतूहल वाटू लागले आणि त्याच लिखाणाच्या ओघात चवथा भाग लिहिला गेला. दुर्दैवाने या भागाची अकराच प्रकरणे श्री. लक्ष्मीबाई स्वत: पुरी करू शकल्या. उरलेली प्रकरणे त्याचे चिरजीव दे. ना. टिळक यानी लिहून तो भाग दि. १५ डिसेंबर ३६ ला प्रसिद्ध केला.

या स्मृतिचित्रानी मराठी वाचकाना वेड लावले. त्यात टिळकाचे जीवन जसे रंगवले गेले तसे तत्कालीन महाराष्ट्रातल्या समाजाचे चित्रही मनोरमतेने रेखाटले आहे. हिंदु धर्मातल्या जाचक आणि भ्रामक रूढीनी पोळलेला समाज पाहून अत करण कळवळून त्यातून नवा जागतिक धर्म स्थापन करण्याचा विचार ना. वा. टिळक यांच्या मनात आला व त्याचे पर्यवसान त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यात झाले. परतु त्याचे व त्याच्या पत्नीचे पूर्वसस्कार व हिंदू मन मात्र तसेच राहिले होते. या पति-पत्नीच्या व्यक्तिमत्त्वाचे मनोरम दर्शन स्मृतिचित्रात घडते.

स्मृतिचित्रानी अमाप लोकप्रियताही मिळवली. त्याच्या ४ आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या व त्याच्या वर्धापन दिनी दि. १५ डिसेंबर ७३ ला त्या स्मृतिचित्राची ' अभिनव आवृत्ती ' लक्ष्मीबाईंचे नातू अशोक दे. टिळक यानी मोठ्या परिश्रमपूर्वक प्रसिद्ध केली आहे. ही एक फार चागल्या योगायोगाची आणि मराठी वाङ्मयात अनमोल भर टाकणारी अशी घटना घडली आहे.

चरित्रग्रथात आत्मचरित्र हा प्रकार बराचसा दुर्मिळ. मराठीत तर तो आधुनिक काळातीलच आहे असे म्हणावयास हरकत नाही. मराठीमध्ये, रमाबाई रानडे यांनी १९१० मध्ये ' आमच्या आयुष्यातील काही आठवणी ' लिहिल्या. या मधुर आठवणींनी न्यायमूर्तींच्या चारित्र्यावर आणि लोकप्रियतेवर बराच प्रकाश पडला. त्यानतर बऱ्याच वर्षांनी लक्ष्मीबाईंची स्मृतिचित्रे प्रसिद्ध झाली. आणि त्यानी मराठी वाचकांची चागलीच पकड घेतली व मराठी वाङ्मयात कायमचे स्थान मिळवले

आत्मचरित्र लिहीत असताना ते लिहिणाऱ्याला काही तरी सांगण्यासारखे असले पाहिजे, त्या सागण्याला वैचारिक अधिष्ठान पाहिजे, तटस्थ वृत्तीने आणि अतर्मुख होऊन ते लिहिले पाहिजे. स्वत च्या कृत्यांचे, विचाराचे समर्थन करणे, स्वत:च्या दोषावर पाघरूण घालणे, स्वत:ची बढाई मारणे अशा प्रकारचे स्वरूप त्याला येऊ देता कामा नये. या कसोटीवर स्मृतिचित्रे अतिशय ठळकपणे आणि उठावदारपणे प्रकाशतात. स्मृतिचित्रानी मराठी भाषेत अलौकिक आणि अनन्यसाधारण अशी भर घातली आहे. त्याची भाषा घरगुती. सहजस्फूर्त ओघवती आणि आकर्षक अशी आहे या स्मृतिचित्रानी अनेक लहान थोराना मोहून टाकलेले आहे. त्यावर काही अभिप्राय देणे म्हणजे ' अव्यापारेषु व्यापार करणे आहे.

मला मुख्यत: श्री. अशोकराव टिळकांचे मन:पूर्वक अभिनदन करायचे आहे ते या अभिनव आवृत्तीसाठी. एखाद्या घटनेकडे पहाण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन एकच असू शकत नाही ज्याच्या त्याच्या बुद्धीप्रमाणे, अनुभवाप्रमाणे आणि त्या त्या वेळच्या सदर्भाप्रमाणे तो वेगळा असतो. त्यामुळे स्मृतिचित्रे लिहिताना, नकळत, अजाणतेपणे, काही विपरीत मते बनवणारी किंवा गैरसमज करणारी विधाने केली गेली असली तर त्यावर अधिक प्रकाश टाकावा या हेतूने त्यानी ही अभिनव आवृत्ती सपादित केली आहे. त्यात ते यशस्वीही झाले आहेत.

माहिती गोळा करण्यासाठी ते अनेक ठिकाणी हिंडले अनेकाच्या प्रत्यक्ष गाठी घेऊन त्याच्याशी त्यानी चर्चा केली. अनेकाशी पत्रव्यवहार करून त्याच्याकडून काही काही घटनाविषयी सविस्तर माहिती मिळविली. आणि या सगळ्याचा परिपाक म्हणजे त्यानी स्वत च म्हटल्याप्रमाणे ' स्मृती चित्रातल्या कितीतरी व्यक्ती अधिक स्पष्टपणे दिसू लागल्या. कितीतरी लहानमोठ्या शका, कुशंका, आशका उलगडल्या. लक्ष्मीबाईंनी माडलेल्या कित्येक गोष्टींची त्यांनी न पाहिलेली बाजू दृग्गोचर झाली.' अभिनव आवृत्ती ' ही 'स्मृतिचित्रावर ' अभिनव ' प्रकाश टाकणारी ठरली.

लक्ष्मीबाई आणि स्मृतिचित्रे यांच्याविषयी देवसदृश आदर बाळगणाऱ्या किंवा काही एक आत्मीयता असणाऱ्याना कदाचित हा प्रयत्न आवडणार नाही. परतु जसा जसा काल जाईल तसा तसा अशा प्रकारचा प्रकाशझोत हा आवश्यक आहे. नव्या पिढीला त्या योगे त्या काळातील घटनांचे सत्यदर्शन होईल आणि त्यांचे रसग्रहण अधिक डोळसपणे करता येईल. त्यादृष्टीने परिशिष्टामधील ' पूरके ' हा भाग खरोखरीच आवश्यक आहे त्या योगे मूळ सौंदर्याला कोठेही बाधा आल्यासारखे वाटत नाही. आत्मचरित्राना अशा प्रकारची प्रपूरके जोडली गेली तर सत्यदर्शनास मदत होईल व त्यामुळे मूळ कलाकृतीचा कस ठरण्यास मदत होईल.

मूळ स्मृतिचित्रे, प्रपूरके आणि श्री. अशोक टिळक ह्याच्याकडील इतर साधनसामुग्री याच्या सहाय्याने कै. ना. वा. आणि लक्ष्मीबाई टिळक याचे जीवनकार्य आणि जीवन-

निष्ठा यावर एक सुसंगत चरित्र लिहिणे आता सहज शक्य होईल.

तेच या अभिनव आवृत्तीचे खरे यश. ¤

—ले. कर्नल केतकर

## रात्रकाळोखी

माणसाच्या जीवनातील अनावर वासना आणि तिच्या परिणामी पराकोटीचा द्वेष वा तिरस्कार, बलात्कार, सूड आणि प्रसंगी खून या रूपांतील तिचा उद्रेक हा विषय कथा कादंबरीला आता नवा राहिलेला नाही. नवोदितांपासून प्रथितयशांपर्यंत हा विषय अनेकांनी हाताळलेला आहे आणि आपापल्या कमीअधिक कुवतीनुसार त्यांच्या वाट्याला यशापयश आलेले आहे. या विषयाचे 'खळबळजनक' स्वरूप नवोदित लेखकाला सहजपणे आकर्षित करू शकते. 'रात्रकाळोखी' या छोटेखानी कादंबरीत प्रल्हाद पाढारकरांनीही याच विषयाला हात घातला आहे. लेखक नवोदित आहे. परंतु विषयाचे खळबळजनक स्वरूप चित्रित करण्याचा मोह लेखकाने टाळला आहे, ही उल्लेखनीय बाब आहे.

कामवासना हा मानवी मनोव्यापारातील एक प्रमुख घटक आहे. त्याबद्दलच्या विकृत तिरस्काराने तो काही काळ दबून–दडपून राहिला, तरी एका बाजूने तो आकार घेतच राहातो आणि एखाद्या क्षणी अनावर स्वरूपात तो त्वेष, सूड, बलात्कार याद्वारे बाहेर पडतो आणि सारे आयुष्य उध्वस्त करून टाकतो. 'रात्रकाळोखी 'चा नायक यल्लाप्पा याच्याही जीवनाचे हेच होते, वासनेची रात्रकाळोखी त्याचे अवघे जीवन व्यापते आणि ती सपते ती त्याच्या आयुष्याचे मोल घेऊन, त्याच्यापुरती पण, पुन्हा ती भरून राहाते बकुळीच्या आयुष्यात. फक्त इथे सदर्भ बदलतो. बकुळीच्या आयुष्यात त्यानंतर भयाणतेखेरीज, अंधाराखेरीज काही उरत नाही. ही तिच्या आयुष्यातली 'रात्रकाळोखी 'च !

ही छोटेखानी कादबरी तीन भागात उलगडते. रेणू ही नायक यल्लाप्पाची आई. क्षयी नागप्पामुळे अतृप्त राहिल्याने रगाचारू वाण्याशी सबंध ठेवणारी. तिच्या बदफैलीपणाचा अतोनात तिरस्कार करणारा यल्लाप्पा तिरिमिरीत तिचा खून करतो. इथे पहिला भाग संपतो. यापुढे यल्लाप्पाचे भटके आयुष्य सुरू होते. पण त्यांच्यातली वासना त्याला स्वस्थ बसू देत नाही आणि परिणामी राणू या अर्धांगाने पीडलेल्या भिकारणीवर तो बलात्कार करतो; पण कालातराने तिच्या गर्भांकुराची जाणीव झाल्यावर तेथून, भिऊन सटकतो आणि खाणकामगाराच्या वस्तीत येऊन राहातो. तिथे भागी ही वेश्या आणि मॅनेजरची बायको सावित्री याच्याशी त्याचे 'सबध' येतात. इथेच कोडू नावाच्या त्याच्या सहकाऱ्याचा बकुळी या आणखी एका स्त्रीवरून तो द्वेष ओढवून घेतो. बकुळी त्याच्या मनात सलत राहाते आणि एक दिवस तो तिचाही बळजबरीने भोग घेतो. इथे दुसरा भाग सपतो. यानंतर बकुळी यल्लाप्पाकडेच राहू लागते पण अखेरीस कोंडूची आणि त्याची मारामारी होते त्यात कोडू यल्लाप्पाला ठार मारतो आणि बकुळीवर जबरदस्ती करून सूड घेतो. इथे तिसरा भाग संपतो आणि कादंबरीही सपते.

तिन्ही भागात सर्वत्र 'रात्रकाळोखी' व्यापून राहिली आहे, हे यावरून स्पष्ट होते. फक्त अखेरीस तिचा सदर्भ बदलतो इतकेच.

या कादबरीत वासनेच्या पिसाटपणाचे स्थान प्रामुख्याने यल्लाप्पाच्या आयुष्यात असले, तरीही तिचीच आणखी रूपे यल्लाप्पाची आई रेणू, त्याचा 'बाप' रगाचारू, कोळसा खाणीच्या मॅनेजरची वासनाअतृप्त पत्नी सावित्री आणि यल्लाप्पाच्या वासनेचे भक्ष्य झालेली बकुळी याच्या व्यक्तिरेखातही स्पष्ट होतात. धर्मशाळेतील तो एक साधू आणि लमाणी पोर याच्या शृगारातही याचेच क्षीण रूप दिसते. या सर्वांच्या आयुष्यात ही 'रात्रकाळोखी' भरून राहिली आहे. यापैकी रेणू, मुलाच्या मनात तिच्या बदफैलीपणातून निर्माण झालेल्या तिरस्कारातून त्याच्याच हातून खुनाला बळी पडते. तर स्वत. यल्लाप्पाचे आयुष्य या रात्रकाळोखीतून निर्माण झालेल्या द्वेष, बलात्कार, सूड या चक्रात सापडून उध्वस्त होते; त्याचाच एक खाण कामगार मित्र कोडू त्याचा खून करतो. पण परिणामी ही रात्रकाळोखी त्याच्याबरोबर राहाणाऱ्या बकुळीच्या जीवनात प्रवेश करून तिचेही आयुष्य आपल्या अस्तित्वाने भरून टाकते ! या वासनेचे काहीसे वेगळे स्वरूप सावित्रीच्या व्यक्तिरेखेत दिसते आपल्या अतृप्त वासना ती यल्लाप्पाकडून पूर्ण करून घेत राहाते; पण गर्भाची चाहूल लागल्यानतर यल्लाप्पाला निग्रहाने दूर करते. रात्रकाळोखीचे हे रूप या ठिकाणी एकदम एक वेगळा पदर गुंफते हे खरे; पण ते अगदी स्पर्शस्वरूपातच राहते आणि म्हणून प्रयत्नपूर्वक लक्षात ठेवावे


# साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : (जलमार्गे)

पंचावन्न रुपये

लागते. एरवी ते वासनेच्या भडक रगात गुदमरूनच जाते.

या साऱ्या व्यक्तींच्या आणि प्रामुख्याने यल्लाप्पाच्या आयुष्यातल्या 'रात्र काळोखी' चे चित्रण करताना श्री. पाढारकरांनी आपल्या लेखणीवर संयम ठेवला आहे हे नि संशयपणे लक्षणीय आहे. प्रथमच कादंबरी लिहिताना, तीही एका खळबळजनक विषयावर, अशा प्रकारे सयम बाळगणे ही कठीण बाब आहे. आणि ते वैचारिक प्रौढपणाचे एक गमक आहे असे मानायला हवे. श्री. पाढारकराच्या एकूण लेखनातच नवेपणाचा आढळ होत नाही; आणि स्वतःच्या लेखनाबद्दल 'विश्वास' असल्याखेरीज हा नवेपणा झडत नाही. लेखकाची शैली विषयाशी सुसवाद साधणारी आहे. क्वचितप्रसगी ती काव्यात्मकतेकडेही झुकली आहे. रेणूने नागप्पाच्या डोळ्याला डोळा प्रथमच भिडवला आणि तिची जी अवस्था झाली तिचे वर्णन लेखक असे करतो: 'आता मात्र तिच्या शरीरभरच डोळे फुटले होते. अगागाला फुटलेले डोळे सारखे भिरभिरत होते. सुखाचा शोध घेऊ बघत होते. जे सुख घोघावल्या वादळासारखे शरीरावर झेपावूनही मधाळ नि गहिरे दंश करते त्या सुखाचा शोध!'

श्री. पांढारकरांच्या लेखनातला संयमही वाखाणण्याजोगा आहे याचा उल्लेख केला आहेच. त्याचे उदाहरण म्हणून राणूवर यल्लाप्पाने केलेल्या बलात्काराचे (पृ. ३२) किंवा यल्लाप्पा आणि सावित्री यांच्या शृंगाराचे (पृ. ५६–५७) चित्रण किंवा यल्लाप्पाने बकुळीवर केलेला बलात्कार (पृ ६६–६७) या प्रसगांचा उल्लेख करावा लागेल. 'रात्र काळोखी' या सज्ञेतून सूचीत होणारा अर्थ लेखकाने सतत पकडून ठेवला आहे. भागी आणि यल्लाप्पा यांच्या शृंगाराचे दर्शन दोन तीन ओळीत लेखकाने नेटकेपणाने केले आहे. 'रात्र चढत होती. रगत होती. झिगत होती. अधाराच्या काळ्या निळ्या लाटा क्षितिजाच्या किनाऱ्यावर बेहोषपणे फुटत होत्या. फुटून फेसाळत होत्या.'

मला लेखकाच्या शैलीत खटकलेली बाब एकच आणि ती म्हणजे सावित्री, दासप्पासारखे अपवाद वगळता सर्वच व्यक्ती समाजाच्या तळच्या थरात राहून देखील स्वच्छ भाषा बोलतात. ज्या वातावरणात ही कादबरी घडते आहे. तिच्याशी ही भाषा विसंवादी वाटते. श्री. पांढारकरांच्या या कृतीचा अधिक खोलवर विचार करण्याचे मात्र कारण नाही. विषयाची सयमशील आणि धिटाईने केलेली हाताळणी एवढेच तिचे श्रेय. एरव्ही तीत या भावभावनाचेही ढोबळ आणि वरवरचे चित्रणच आहे. एकमेकांच्या भावनाची गुतागुंत आणि तिच्यातून फुलणारे भीषण नाटय यांचा एकवट ठसा उमटवण्यास ही कादबरी असमर्थ ठरली आहे! पण एवढयाने लेखकाने निराश होण्याचे मात्र कारण नाही. त्यानी अधिकाधिक दमदारपणे चालत रहावे ही प्रामाणिक इच्छा! ◻

# सत्तेचा विजय असो!

'सत्तेचा विज असो!' हे प्रा. श्रीकृष्ण पुणेकर यांनी लिहिलेले नाटक. नाटय अध्यापन, – लेखन – अभिनय आणि दिग्दर्शन असे चतुरस्र व्यक्तित्व असलेले हे प्राध्यापक मजकूर आहेत. अर्थात यापैकी नाटय लेखनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही अगाचा विचार या पुस्तकावरून करता येणार नाही. खेदाची बाब अशी की त्यांच्या या अगाचा विचार अभावात्मक भाषेतच करावा लागेल.

नाटकाचा विषय अपरिचित नाही; 'अश्रूंची झाली फुले' सारख्या नाटकातून तो यापूर्वीच येऊन गेला आहे. फरक एवढाच आहे की पूर्वोक्त नाटकात तो किमानपेक्षा चातुर्याने माडला आहे. आणि या नाटकात तितकाच भडकपणे, बटबटीत, ढोबळस्वरूपात माडला आहे.

एक अत्यंत सरळमार्गी, 'तत्त्वनिष्ठ' प्राचार्य शहाणे, त्यांचे 'मित्र कम् ब्रूटस' सहकारी गोडे सर (!) आणि त्याच्या (गोडयांच्या) सहाय्याने शहाण्याना सहकुटुब नेस्तनाबूत करणारे राजकारणी, अतर्बाह्य खलपुरुष रामराव याच्यातील सामन्याचे (म्हणजे निवडणूकी) कथानक प्रा. पुणेकरयांनी या नाटयविषयासाठी रचले आहे. रामरावाचे व्यक्तिचित्र उभे करताना जितका म्हणून काळया रगाचा वापर करता येईल तितका सढळपणे लेखकाने केला आहे! शहाण्याच्या व्यक्तिचित्रातही असाच, एकाच रगाचा मुक्त वापर, तर गोडे एक 'टाइप्ड' व्हीलन! परिणामी सारीच लहानथोर पात्रे अत्यत सपाट झाली आहेत. आपापले व्यक्तिमत्व घेऊन ती उभीच राहात नाहीत. वरे बोलतात तीही किती शब्दबबाळ!

दुसऱ्या अकातल्या पहिल्या प्रवेशाच्या सुरवातीचाच भाग आणि दुसरा सपूर्ण प्रवेश तद्दन अप्रस्तुत आहे. अर्थात नाटकाचा एकूण पोत ढोबळ आणि बटबटीत असल्याने त्याच्याशी मात्र तो सुसवादी आहे! अर्थात नाटकाची बाधणी कशी असू नये याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे हे नाटक. नाटकाला एक किमान बांधेसूदपणा, घट्टपणा अवश्य असतो याचे भानही लेखकास आहे किंवा नाही अशी शका यावी, इतके लेखन सैल आहे. भाषेचा कृत्रिमपणा आणि बालीशपणा नाटकाच्या प्राथमिक बाळबोध स्वरूपात भरच टाकतो.

इत्यलम्! ◻

–जयवंत चुनेकर

रात्रकाळोखी
प्रल्हाद पाढारकर
प्रकाशिका. सौ. निर्मला पाढारकर,
साळवे बिल्डिंग, चंद्रपूर
किंमत : चार रुपये

सत्तेचा विजय असो
लेखक प्रा. श्रीकृष्ण पुणेकर
प्रकाशक : श्री. शशिकात जावडेकर
५२८ शनिवार, मेहुणपुरा, पुणे, ३०
किंमत : सहा रुपये.

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. १ जून ७४ ते ७ जून ७४**

### भारतीय सत्तास्थानात महत्त्वाच्या घटना

रेल्वेसंपात अपेक्षित श्रेय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी स्वतःकडे घेतील हे मी व्यक्त केलेले भाकीत प्रत्ययाला आलेच आहे. याच अनुषंगाने केंद्रस्थानी जनतेला धक्का बसणाऱ्या घटना घडू लागणार आहेत. रेल्वेसंपात कडवटपणा आला होता तो दूर होऊन त्यांना अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. मंत्रीमंडळातून कुणाला बाहेर काढावयाचे याचा विचार पंतप्रधानांच्या मनात सुरू होईल. राष्ट्रपती गिरी मंत्रीमंडळाला नकोसे वाटू लागतील. महाराष्ट्रात मराठवाड्यात काही नवे घडू लागेल. नव्या नेतृत्वाचा शोध लागणार आहे. बॅ. अंतुले अनुकूल रंगमंचावर येण्याची शक्यता आहे. गफूर यांच्या स्थानाला पुनश्च धोका. ¤

**मेष** : कल्पकतेला वाव

मंगळासारख्या पुरुषार्थाचा धर्म असलेल्या ग्रहाला तुमची रास स्वामी मानते. हा मंगळ सध्या तुम्हाला इतका छान आहे की कोणतीही नवी योजना, नवी कल्पना तुम्हाला जर प्रत्यक्षात आणावयाची असेल तर इतका छान काळ दुसरा नाही याची तुम्ही जाणीव ठेवा. सोमवार ते गुरूवार तुमची स्वप्ने साकार होतील. तुमची हेतूपूर्ती होईल. एखादी मागे पडलेली योजना आर्थिक व तांत्रिक साहाय्य मिळून कार्यान्वित होईल. लेखकांनी लेखणी जपून चालवावी. नोकरदारांना बदलीबढतीचा योग. **महिलांस** : तुमच्या अंगी काही कलागुण असतील तर त्याला योग्य क्षेत्र लाभेल.

**वृषभ** : मित्राची मदत

गेले अनेक दिवस तुमच्या प्रगतीचा गाडा जरा जरा रेंगाळत चालला आहे. कोणतेही काम करावयाचे ठरवा, कोठेही जा, अपयश आणि दिरंगाई हेच तुमच्या वाट्याला येईल मित्र हो, मला कळवायला आनंद वाटतो की हा अपयशी कालखंड आता इतिहास जमा होत असून तुमच्या प्रगतीची प्रभात याच आठवड्यापासून सुरू होत आहे. प्रामुख्याने रविवार ते मंगळवार एका धनिक मित्राचे तुम्हाला सर्वच क्षेत्रात सहकार्य लाभेल. नोकरीत कडवटपणा येऊ देऊ नका. **महिलांस** : दुरावलेली श्रीमंत मैत्रिण पुन्हा सहवासात येईल. प्रवासाचा योग.

**मिथुन** : विरोध मावळेल.

रविसारखा 'ग्रहराज' तुम्हाला प्रतिकूल होता तो आता अनुकूल झाला आहे. शनी तर राशीतच आहे. साडेसातीला एवढे घाबरता कशाला ? ताठ मानेने कोणत्याही क्षेत्रात पाऊल टाका. यश हाती लागल्याखेरीज राहणार नाही. मात्र अजून काही काळ तरी तब्येतीला थोडीफार कटकट आहे. तेवढी काळजी घ्या. नोकरीत तुमच्या विरुद्धची कटकारस्थाने संपुष्टात येतील व विरोधकांच्या सहकार्याचे नवे पर्व सुरू होईल. उद्योग-व्यवसायात प्रगतीकड पाऊल पडेल. आर्थिक समस्याही सुटू लागतील. **महिलांस** : तुम्ही लेखिका असाल तर तुमच्या साहित्याचे कौतुक होईल. लोकप्रियता लाभेल.

**कर्क** : तब्येत सुधारेल.

चंद्राचे वर्चस्व तुमच्या मनःस्थितीवर व भावनेवर असते. कोणतीही मनाविरुद्ध घटना तुम्ही सहन करू शकत नाही. शरीर आणि मन याच कारणामुळे मधून मधून आजारी पडते. सध्या शनीने चंद्राला ग्रासले आहे. पण तेवढ्यामुळे निराश होण्याचे मुळीच कारण नाही. बुध, शुक्र व राहू हे ग्रह अनुकूल आहेत. त्यामुळे शनीवार ते मंगळवार या काळात तब्येतीला अनुकूल वळण लागेल. मनाला उत्साहही वाटू लागेल. पैसा उधळू नका. **महिलांस** : आठवडा तसा वाईट नाही. मात्र नोकरीत स्तुतीने भाळून जाऊ नका.

**सिंह** : मनासारखे घडेल

आठवड्याची सुरुवात तूळेच्या चंद्राने होत आहे. त्यामुळे आपला जीवनमार्ग या आठवड्यात सुकर होणार आहे. शनिवार ते मंगळवार नोकरीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण घटना घडतील. बढती, बदली वा बदल संभवतो. पगारवाढ व इतर मागण्या मान्य होतील. कलाक्षेत्राशी संबंध यावा. गुरुवार, शुक्रवार या दृष्टीने नोंदून ठेवावे. कापड, सोने, सौंदर्य प्रासाधने याच्याशी संबधीत असा व्यापार वा इतर उद्योग करा. **महिलांस** माहेरपण घडेल. आवडत्या माणसांच्या सहवासात वेळ जाईल.

**कन्या** : कौटुंबिक अडचणी

तुम्हाला तसे हे दिवस सध्या वाईट नाहीत. पण ज्याला समाधान–सुख म्हणतात तसे अजून काही काळ तरी मिळण्याची शक्यता नाही. पती-पत्नीत मनाविरुद्ध घटना घडून वारंवार संघर्ष निर्माण होणार आहे. सासुरवाडीची माणसे सरळ वागणार नाहीत. त्यांच्याकडून आलेल्या पत्राने तुमचे मन नाराज होईल. बुधवार ते शुक्रवार हे दिवस अपेक्षापूर्तीचे आहेत. नोकरीत शुभवार्ता. आर्थिक लाभ. प्रतिष्ठा वाढेल.

**महिलांस :** सतापून उपयोग नाही. जमवून घ्यावे लागेल. स्वत:च्या चुका सुधारा.

### तूळ : वैचारिक यश

आजपासून सुरू होणाऱ्या आठवड्यात चद्र तुमच्या राशीत हर्शलजवळच आहे गुरूची कृपा आहे. दैवी उपासना व लेखन करणाऱ्यांना हा काळ फार अनुकूल आहे उपासकाना आत्म साक्षात्कार घडून प्रकाश दिसेल तत्त्वज्ञान, मनोविश्लेषणात्मक लेखन करणाऱ्याना स्फूर्ति मिळेल. सोमवार व गुरूवार या दिवसाची मुद्दाम नोद घ्या. शनिवार, रविवार नोकरीत अनुकूलता. नवी प्रतिष्ठा वाढवणारी जबाबदारी अगावर पडेल. मन प्रसन्न राहील. **महिलास :** या वेळी कुमारिकाचे विवाह सहज जमावेत. संसारात पुत्र लाभ.

### वृश्चिक : आर्थिक व्यवहार नको

माणसाला दैव काही चागले अनुभव देते, काही प्रतिकूल देते. जीवन यातून प्रगतीकडे जात असते. हा आठवडा जसा अनुकूल नाही तसाच तो अगदी प्रतिकूलदेखील नाही. हर्शल बारावा आहे. त्याच्या जोडीला पहिले दोन दिवस चंद्र बारावा आहे या दोन दिवसात कोणताही आर्थिक देवघेवीचा व्यवहार करू नका. कर्ज काढण्याचे टाळा. येणारे पैसे लाबणीवर पडतील. मगळवार ते शुक्रवार नोकरीत कामाचा ताण वाढेल. पण तुमच्या कर्तृत्वाचे चीज होईल. **महिलांस :** स्वत:च्या जागेत राहाण्याची मनीषा पुरी होईल. नोकरी मिळेल.

### धनू : निराशा संपेल

तूळेचा चद्र–हर्शल स्थानी मनी नमताना आर्थिक स्थितीत क्रमश: अशी सुधारणा करील लॉटरी, रेस या मार्गाने देखील पैसा मिळेल. कौटुंबिक स्थितीत अनुकूल बदल होईल. पत्नीचा आजार कमी होईल. इतर जर काही विक्षेप संसारात आले असतील तर ते दूर होतील. नोकरीत असलेली निराशेची परिस्थिती आता उरणार नाही. काळजी एकदम दूर झाली नसली तरी ती निश्चित कमी होईल. सोमवार ते गुरुवार व्यवसायात अगर उद्योगधद्यात शुभ घटना. **महिलास :** पतीचे प्रेम लाभेल. निसर्गाच्या सान्निध्यात राहाण्याचा योग आहे.

### मकर : तडजोड वृत्ती ठेवा.

हट्ट व दुराग्रह याचा प्रभाव सर्वात जास्त मकर राशीवरच असतो. शनी प्रधान असलेल्या या राशीला सहावा शनी आहे तो कोणत्याही क्षेत्रात तुम्हाला विरोध उरू देणार नाही. तरीपण हेतू व अपेक्षा याच्या प्राप्तीसाठी या आठवड्यात तडजोडीची वृत्ती ठेवा. नोकरीत वरिष्ठाच्या कलाने घ्यावे. स्वत:चे शहाणपण जरा दूर ठेवा. ज्यांना अपेक्षित नोकरी मिळवायची असेल त्याने रविवार ते बुधवार या दरम्यान मध्यस्थामार्फत प्रयत्न करावेत जमून जाईल. आर्थिकदृष्टया उधळपट्टी होण्याची शक्यता आहे. **महिलांस** . दुसरा गुरू व दहावा चद्र-हर्शल मनाला आल्हाद देणाऱ्या घटना घडवतील.

### कुंभ : प्रतिष्ठा वाढेल

आठवडयाच्या सुरुवातीसच गुरूचा हर्शल-चंद्राशी होणारा वैशिष्टयपूर्ण त्रिकोण तुम्हाला बरेच काही देऊन जाईल. राजकारण, समाजकारण, नोकरी व्यवसाय, प्रवास वगैरे सर्वच क्षेत्रात महत्त्वाच्या गोष्टी घडवील. यावेळी कोणत्याही निवडणुकीत तुम्ही उभे राहाल तर तुमचे यश निश्चित असेल. एखाद्या अत्यत महत्त्वाच्या स्थानावर तुमची आश्चर्यकारक अशी नियुक्ती होईल. तुम्ही खासदार, आमदार यापैकी कुणी असाल तर राज्यपालपद वा मंत्रीपद यासारखे केंद्रस्थान तुमच्याजवळ येईल. नोकरीत तुमचे महत्त्व व प्रतिष्ठा वाढेल. तुमचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. आर्थिक स्थिती उत्तम राहील. **महिलांस :** पतीराजाबरोबर सन्मानाचा व दूरच्या प्रवासाचा महत्त्वपूर्ण योग येईल.

### मीन : पैसा मिळण्याचा योग

अकस्मात अर्थप्राप्ती होण्याचा महत्त्वाचा योग आठवडयाच्या सुरुवातीसच आहे. लॉटरीचे तिकीट काढा. रेस खेळणाऱ्या लोकांना पहिले दोन-तीन दिवस अतिशय अनुकूल आहेत. जमीन वा इतर स्थावरासंबंधीचा वाद चालू असेल तर मगळवार ते गुरुवारपर्यंत तो तुमच्या मनासारखा होईल. नोकरीत वाईट नाही पण चालू कामाबद्दल नाराजी वा दुःख अगर विरोध आपल्या मित्रापाशीदेखील व्यक्त करू नका. वरिष्ठाचे मन जिंकण्याचा प्रयत्न करा. नोकरीत बदल करू नका. उपासनेत अडथळे येतील. वैराग्याचे विचार मनी घोळू लागतील. **महिलांस :** वृद्ध स्त्रियांना तीर्थयात्रा घडेल. नोकरीत मात्र त्रास आहे. ☐ ☐

**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

ब. मो. पुरंदरे

किंमत सात रुपये

राजहंस प्रकाशन




# आशा-पडद्यावरील धुमाकूळ

ही आशा सचदेव ही बाई कुछ काम की आहे की नाही ?

परवा ' दो चट्टाणे ' पाहयला. त्यात अरुणा इराणी आणि आशा सचदेव दोघींनीही धुमाकूळच घातला होता. या दोघी कोळणी बनल्या आहेत. काष्टघाच्या साडीमध्ये दोघीही ग्रेट दिसतात. हा सिनेमा पाहिल्यानंतर आपल्या बायकांनी पुन्हा काष्ट्याची साडी नेसायला सुरुवात करावी. आशा तर परफेक्ट दिसते. तिच्या साऱ्या अंगातून टपटपीत मांसाचा गर झिरपतो. फायटिंगच्या प्रसंगात ती दोन्ही पाय फाकवून उभी राह्यली नी एखाद्या मवाल्याला ये साले ऽऽ ' म्हणून तिने आवाज दिला तर समजावं आता आपली भरली. पुरुषांशी एरवी फाईट करणाऱ्या बायकांमध्ये हेमा आणि आशाच खऱ्या वाटतात.

एकूण धुमाकूळ घालण्यासाठी आशा सचदेव सिनेमावाल्यांच्या कामाला येईल असे दिसते. ' हिफाजत, ' ' कशमकश ' आणि आता ' दो चट्टाणे ', तिन्ही पिक्चरमध्ये तिने अक्षरशः धुमाकूळच घातला आहे.


' हिफाजत 'मध्ये आशा ही हिरॉईन आहे आणि विनोद मेहेरा हिरो. विनोद मेहेराचा प्रत्येक प्रेमप्रसंगात तिने असा दम काढलाय की बोलायची सोय नाही. ते पिक्चर पहाताना असं वाटायचं को ही प्रेमाची अदाकारी नाही ही प्रेमाची कुस्ती आहे.

' कशमकश 'मध्ये तिला छोटीशीच भूमिका आहे. ती शत्रुघ्न सिन्हाची प्रेयसी आहे. या दोघांचं एक द्वंद्वगीत आहे. किंवा द्वंद्वच आहे. ' तेरे सो है दीवाने ' शत्रु म्हणजे स्टाईलबाज हिरो, कधी वाकणार नाही–मोडणार नाही. आशा त्याला अशी काही घुमवते की वाटू लागतं शत्रुला अखेर कोणीतरी भेटली. शेवटी दिग्दर्शक फिरोज चिनॉय याने शत्रुने, तिला आवाज देऊन जीपमध्ये चुपचाप बसवण्याची आयडिया केली नसती तर आशाने तो द्वंद्वगीताचा प्रसंग खाऊन टाकला असता.

' दो चट्टाणे 'मध्ये तिने असाच विक्रमला घुमवलाय. पण, अरुणा इराणीला ' फूटेज ' जास्त मिळाले, त्यामुळे पिक्चर तीच खाऊन गेली. बरोबर आहे. अरुणा निर्मात्याची (जोगिंदर) हिरॉइन आहे.

' डबल क्रॉस 'मध्ये आशाने काही काम करून दाखवलंय ! कबूल ! त्या पिक्चरमध्ये तिचा रेखाशी मुकाबला होता. पण, त्यापेक्षाही विजय आनंद समोर तिला उभं रहायचं होतं. ' अय्यो ' या हलक्या फुलक्या गीताच्यावेळी, तिला मोकळेपणाने काम करता आले असते पण बऱ्याच संयमाने तिने ते काम केलंय. पण सर्वात म्हणजे ती.' माँ ' होणार असते आणि विजय आनंदला ते ती सांगते, त्यावेळी ती त्याची चांगलीच छेड काढते.
एकूण या पोरगीने काही तरी करावंसं वाटतं. पडद्यावर जेव्हा जेव्हा मी या पोरीचं पिक्चर बघायला जातो त्या त्या वेळी हिचं काहीतरी अफलातून काम बघायला मिळेल अशी वाट पहात असतो. तनुजाच्या पिक्चरलाही असाच जायचो ! तनुजा ही बाई काय ग्रेट होती ते सांगायला हवं काय ? लेकीन वो किस्सा फिर कभी.


आशा तनुजाची जागा घेईल काय ? तनुजा रिटायर होणार म्हणून रणधीर कपूरने सांगितलं. तेव्हापासून पोटात एक खळगा पडलाय नी आपण आशाकडे पहातोय. ' दो नंबर के अमीर 'मध्ये ती



प्रेमाची ही अदाकारीच का? ...

वैतागले त्यावेळीं तो
सती असे वाटते. आशाचा
ग नाही. तो वरच्या

षॉट घेतले, हे ती सांगेल.
किशोर कुमारला ती अफ
मत होते. आपले टेक्निशि



डिंपल – चिंतु स्टाईलने
एकमेकावर मरणारी
'आलिंगन'ची जोडी
रोमेश शर्मा – जाहिरा


## सुचित्रा सेनची निवडणूक

'इनसे मिलिये'! या आहेत श्रीमती सुचित्रासेन. बंगालच्या श्रेष्ठ अभिनेत्री. सुमारे सात आठ वर्षापूर्वी तुम्ही हिचा डबल रोल असलेला 'ममता' हा चित्रपट पाह्यला असेल तर विसरला नसाल! 'मॉं और बेटी'च्या भूमिकेत या बाईने कमाल करून सोडली होती. आता आठ वर्षांनी या बाई पुन्हा मुंबईच्या सिनेमा क्षेत्रात पाऊल टाकताहेत. हिंदी सिनेमात त्यांचे पुनरागमन नव्हे निवडणूक. निर्माते श्री. जे. ओमप्रकाश यांची आयडीया आहे ही. म्हणूनच त्यांनी अखबारवाल्यांना सुचित्रा बाईंच्यासाठी दिलेल्या पार्टीसाठी पाठवलेल्या आमंत्रणामध्ये म्हटलं आहे, सुचित्राबाईंनी मुंबईला आपले मतदानक्षेत्र म्हणून पसंत केले आहे. निवडणूक यंत्रणा श्री. गुलझार (दिग्दर्शक) सांभाळणार आहेत. आर. डी. बर्मन हे रणशिंग फुंकणार आहेत. वगैरे. मतदानाचा दिवस ठरला आहे. त्या दिवशी 'सन अँड सँड' मध्ये येऊन तुम्ही ब्लॅक अँड व्हाईट व्हिस्कीचा आस्वाद व त्यानंतर भोजन घेतलेत की तुमचे मत पोहोचले.

सिनेमा काढणे म्हणजे निवडणूक लढवणेच आहे ही ओमजींची आयडिया ग्रेट आहे. खरोखरच निवडणुकीत पब्लिकचा भरंवसा देता येत नाही त्याप्रमाणेच सिनेमाचंही आहे.

अर्थात ओमजींना ही निवडणुकीची आयडिया सुचली असावी त्यांच्या पिक्चरच्याच स्टोरीवरून. त्यांच्या पिक्चरचे नाव आहे 'आंधी' (वादळ.) यात सुमित्राबाईचे काम आहे एका बेवा पोलिटिकल लीडरचे (इंदिराजींशी या बाईचं साम्य आहे म्हणतात!) पण तरीसुद्धा या पिक्चरमधल्या कुठल्याही व्यक्तीचं किंवा प्रसंगाचं प्रत्यक्षातील व्यक्तिशी किंवा घटनेशी साम्य नाही' अशी ओमजींची नोटीस पड्यावर येणारच.

सुमित्राबाईचं वय आहे ४५. (त्यांची मुलगीही आता चांगली



ओमप्रकाश नेहमीच्या स्टाईलमध्ये हेमाजींना काहीतरी सुनावत आहेत...

वयात आली आहे) बंगाली बाई जशी नसते तशी सुचित्रा दिसते. सडपातळ, उंच गोरीपान स्वतःची खानदानी शान असलेली बाई. एरव्ही बंगाली बाई आपण पाह्यली आहे. राखी, शर्मिला, मौशुमी वगैरे. त्यांना घरेलु खुबसूरती आहे. आपल्या घरात त्यांच्याशी आपले लगीन नाही झाले तरी वाटतं की भाभी, बहु फार काय बहेन म्हणून तरी त्या वावराव्यात. पण सुचित्रासेन बाईचा खाक्याच वेगळा. त्यांची खुबसूरती तुम्हाला गुलाम बनवते. त्यांच्या पर्सनॅलिटीमध्ये तसा खानदानी वचक आहे.

असं म्हणतात की पहिल्या काही शूटिंगच्या प्रसंगात मुंबईचा ग्रेट ॲक्टर संजीवकुमारलाही त्यांचा वचक जाणवला. या बाईच्या अभिनयाच्या वचकापुढे तो नर्व्हस झाला होता म्हणे. बाई खरोखरच इंदिरासारखी कडक असली पाह्यजे !

### ' बॉबी 'चे पहिले उत्पादन

' एक ' बॉबी ' हिट झाले म्हणजे बॉबीचे उत्पादन काढा !' अर्थशास्त्रज्ञ डॉ. वि. म. दांडेकरांचे उद्गार आमच्या सिनेमावाल्यांनी खरे करायचे ठरवले आहेत. पुढील आठवडयात दिग्दर्शक सी. एल. धीर यांचे ' बॉबी ' चित्र ' आलिंगन ' प्रकाशित होत आहे. आपले चित्र ' बॉबी ' युगातले कसे ? दिग्दर्शक धीर म्हणतात, ' बॉबी का हिट झाला याचा विचार करा !' ' बॉबी ' हिट झाला याचे कारण असे आहे की राजकपूर यांनी भूतकाळात जगण्याचे सोडून दिले व तरुण-कोवळ्या पिढीच्या भविष्यकाळात तो जगू लागला आहे !' समझे ! नही समझे !... आपल्यालाही समजले नाही. एव्हढे मात्र समजले की ' आलिंगन 'चा नायक रमेश शर्मा आणि नायिका जाहिरा एकमेकावर मरत असतात. अगदी डिंपल-चिंटू स्टाईलने. असे धीर सांगतात.

रमेश शर्मा हा फिल्म इन्स्टिटयूटचा सुवर्णपदक विजेता नट. खूप ऐकून आहे त्याच्याबद्दल ! पण, असे फिल्म इन्स्टिटयूटमधल्या पोरांबद्दल ऐकून काय उपयोग ? आम्ही विजय अरोराबद्दल काय कमी ऐकले होते !...आपण ' शाईन ' झालो नाहीतर गावी जाऊन शेती करू असे विजय अरोराने म्हणून ठेवले आहे. रोमेश शर्माने पण असे काहीतरी म्हटले आहे काय ? □ □

MANOOS ( Weekly ) : 100 Paise : Regd. No. PNC - 68

लवकरच प्रकाशित होत आहे

# श्रीग्रामायन

श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०|२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले स. श्री. ग. माजगावकर